**आरबीआय/२००७-२००८/१८**

**महापरिपत्रक क्र.०२/२००७-०८**

**जुलै २, २००७**

प्रति,
सर्व प्रवर्ग-१ अधिकृत डिलर बँका
**महोदया/महोदय**

**भारतातील विदेशी गुंतवणुकीवर महापरिपत्रक**

भारतातील विदेशी गुंतवणुकीवरील महापरिपत्रक भारतातील विदेशी गुंतवणूक वेळोवेळी दुरुस्त केल्याप्रमाणे अधिसूचना क्र. एफइएमए २०/२००० - आरबी दिनांक मे ३, २००० सह वाचावयाच्या विदेशी विनिमय व्यवस्थापन अधिनियम, १९९९ च्या कलम ६ च्या उपकलम(३) ने शासित आहेत. या महापरिपत्रकात नियामक चौकट आणि सूचना एकत्रित करण्यात आल्या आहेत. उक्तव्यतिरिक्त, या महापरिपत्रकात खालील क्षेत्रेसुध्दा समाविष्ट आहेत.

**(१)** अधिसूचना क्र. एफइएमए २१/२०००-आरबी दिनांक मे ३, २००० सह वाचावयाच्या विदेशी विनिमय व्यवस्थापन अधिनियम, १९९९ च्या कलम ६(३) (१) नुसार **नियमित स्थावर मालमत्ता प्राप्त करणे.**

**(२) भारतात शाखा/संपर्क कार्यालये स्थापन करणे**, जे अधिसूचना क्र. एफइएमए २२/२०००-आरबी दिनांक मे ३, २००० सह वाचावयाच्या विदेशी विनिमय व्यवस्थापन अधिनियम, १९९९ च्या कलम ६(६) च्या अटीनुसार नियामित आहे.

**(३)** अधिसूचना क्र. एफइएमए २४/२०००-आरबी दिनांक मे ३, २००० सह वाचावयाच्या विदेशी विनिमय व्यवस्थापन अधिनियम, १९९९ च्या कलम ४७ च्या कलम २(एच) नुसार नियमित **भागीदारी फर्म्स किंवा मालकीच्या कन्सर्न मध्ये भांडवलाची गुंतवणूक**.

२. हे महापरिपत्रक उक्त सर्व क्षेत्रांशी संबंधित भारतीय रिझर्व्ह बँकेने एपी (डीआयआर मालिका) परिपत्रके आणि एफइएमए अधीन अधिसूचनांद्वारे निर्गमित केलेल्या विद्यमान सूचना एका ठिकाणी एकत्रित करते. या खाली येणाऱ्या परिपत्रकांची / अधिसूचनांची सूचि परिशिष्टात दिली आहे.

३. हे महापरिपत्रक एक वर्षाच्या सूर्यास्त कलमासह निर्गमित करण्यात येत आहे. हे परिपत्रक जुलै १, २००८ रोजी मागे घेण्यात येईल आणि त्याच्या जागी या विषयावरील नवीन अद्यतन परिपत्रक येईल .

आपला विश्वासू,

**(सलीम गंगाधरन)**

**मुख्य महाव्यवस्थापक**

**अनुक्रमणिका**

भाग -१ ----------------------------------------------------------------------१

भारतातील विदेशी गुंतवणूक-योजनापूर्वक प्रतिनिधीत्व------------------------ १

भारतातील विदेशी गुंतवणूक १
भारतातील विदेशी गुंतवणुकीच्या प्रवेशाचे मार्ग १
भारतात गुंतवणुकीला मनाई ---------------------------------------------- २
भारतात गुंतवणूक करण्यासाटी पात्रता---------------------------------------- २
साधनांचे प्रकार----------------------------------------------- ३
लघु उद्योग युनीटसमध्ये गुंतवणूक-----------------------------------------------४
इओयूज/एफटीझेडस/इपीझेडस/एचटीपीज आणि एसटीपीज मध्ये गुंतवणूक-------- ४
ॲसेट रिकंस्ट्रक्शन कंपन्यां(एआरसीज)मध्ये गुंतवणूक------------------- ४
प्रतिभूती बाजारातील पायाभूत सुविधा कंपन्यात गुंतवणूक --------५
राइटस्/बोनस समभागांचे निर्गमन ५
पूर्वाश्रमींच्या ओसीबीजना राइटस् निर्गम----------------------------------------- ५
निवासींकडून अनिवासींकडे राइटसचा त्याग----------------------------------------६
विलीनीकरणाच्या/एकत्रीकरणाच्या योजनेखाली समभागांचे संपादन----------------६
एम्प्लॉइज स्टॉक ऑप्शन योजनेखाली समभागांचा निर्गम ६
एफडीआयचा अहवाल देणे ७
निर्गमाची किंमत ------------- ९
विदेशी चलन खाते ९
समभाग आणि परिवर्तनीय कर्जरोख्याचे हस्तांतरण------------------------------ ९
समभागाच्या आणि परिवर्तनीय कर्जरोख्याच्या हस्तांतरणाच्या काही प्रकरणात आरबीआयची पूर्वानुमति ११
इसीबी/एकरकमी शुल्क/स्वमित्वाचे समभागात रुपांतर १२
अहवालाच्या गरजा -----------------------------------------------------१३
विक्रीच्या उत्पन्नाचे वित्तप्रेषण---------------------------------------------------- १४
कंपन्या गुंडाळल्यानंतर/दिवाळ्यात गेल्यानंतर वित्तप्रेषण-----------------------------१४
एडीआर/जीडीआर खाली भारतीय कंपन्यांद्वारे समभागांचा निर्गम-------------------१५
द्विमार्गी फंगिबिलिटी योजना -------------------------------------१७
प्रायोजित एडीआर /जीडीआर निर्गम-----------------------------------------------१८
खंड -२ ः विदेशी पोर्टफोलिओ गुंतवणूक १९
पोर्टफालिओ गुंतवणूक योजना १९
पीआयएस खाली एफआयआयजची गुंतवणूक १९
एफआयआजच्या गुंतवणुकीचा अहवाल देणे २३
गुंतवणुकीच्या स्थितीचे आरबीआयद्वारे संनियंत्रण २५
समुद्रपार कॉर्पोरेट बॉडीज(ओसीबीज) द्वारा गुंतवणूक २६
खंड ३ः विदेशी व्हेंचर कॅपिटल गुंतवणूक २७
व्हेंचर कॅपिटल फंडसद्वारा गुंतवणूक २७
खंड ४ ः अन्य विदेशी गुंतवणूक २८
अनिवासीद्वारा अन्य प्रतिभूतींची खरेदी २८
एफआयआयद्वारा अन्य प्रतिभूतींची खरेदी २८
एमडीबीज द्वारा गुंतवणूक २९

भाग २ ३१
भारतात स्थावर मालमत्तेचे संपादन आणि हस्तांतरण ३१
विदेशी राजदूतावास/मुत्सद्दी/मुख्य वाणिज्य दूतावास यांच्या द्वारे स्थावर
मालमत्तेची खरेदी/विक्री ३२
अनुज्ञेय कार्य करण्यासाठी स्थावर मालमत्ता प्राप्त करणे----------------------- ३२
विक्रीच्या उत्पन्नाचे प्रत्यावर्तन --------------------------------------------- ३३
विशिष्ट देशांच्या नागरिकांनी भारतात स्थावर मालमत्ता
प्राप्त करण्यासाठी किंवा हस्तांतरित करण्यासाठी पूर्वानुमति---------------------- ३३

भाग- ३ ३४
भारतात शाखा/संपर्क कार्यालये/प्रकल्प कार्यालये स्थापन करणे ३४
आरबीआयला अर्ज करणे ३४
संपर्क कार्यालये ३४
विदेशी विमा कंपन्यांची संपर्क कार्यालये ३५
शाखा कार्यालये ३५
एसइझेडमध्ये शाखा कार्यालये ३६
बँकांच्या शाखा ३७
१. भारताबाहेरील निवासी व्यक्तीने भारतातील फर्ममध्ये किंवा
मालकीच्या कन्सर्न मध्ये गुंतवणूक करणे----------------------------------------२६
२. एकमेव मालकीच्या कन्सर्न / भागीदारी संस्थेत प्रत्यावर्तनाच्या
लाभासह गुंतवणूक-----------------------------------------------------------२६
३. एनआरआयज/पीआयाओज व्यतिरिक्त अन्य अनिवासीद्वारा गुंतवणूक-------------२६

४. बंधन-----------------------------------------------------------------२६
परिशिष्ट - १------------------------------------------------------------२७
परिशिष्ट - २ ----------------------------------------------------------२८


परिशिष्ट - ३ -------------------------------------------------------३९

परिशिष्ट - ४ -------------------------------------------------------४५

परिशिष्ट - ५------------------------------------------------------------४६

परिशिष्ट- ६ ------------------------------------------------
परिशिष्ट - ७ ------------------------------------------------
परिशिष्ट - ८ ---------------------------------------------
परिशिष्ट - ९ ----------------------------------------------

**भारतातील विदेशी गुंतवणुकी- योजनाबद्ध सादरीकरण**



विदेशी गुंतवणुकी
विदेशी थेट गुंतवणुकी
विदेशी पोर्टफोलिओ गुंतवणुकी
विदेशी उद्योगातील भांडवली गुंतवणुकी
इतर गुंतवणुकी
अप्रत्यावर्तनीय पायावरील गुंतवणुकी
स्वयंचलित मार्ग
सरकारी मार्ग
एफ आय आय
एन आर आय, पीआयओ
सेबी-पंजीकृत एफव्हीसीआय
जी-सेक्, एनसीडी इत्यादि
एन आर आय, पीआयओ
व्हीसीएफ, आयव्हीसीयु
एफ आय आय
एन आर आय, पीआयओ

**भाग -१**
**थेट विदेशी गुंतवणूक**

**भारतातील थेट विदेशी गुंतवणूक**
भारतातील थेट विदेशी गुंतवणूक विदेशी विनिमय व्यवस्थापन अधिनियम(एफइएमए) १९९९, च्या तरतुदींनी आणि भारत सरकारने घोषित केलेल्या एफडीआय धोरणाने शासित आहेत. भारतीय रिझर्व्ह बँकेने अधिसूचना क्र. एफइएमए २०/२००-आरबी दिनांक मे ३, २००० निर्गमित केली आहे, ज्यात या संबंधातील सूचनांचा समावेश आहे. ही अधिसूचना वेळोवेळी दुरुस्त करण्यात आली आहे.

**भारतातील गुंतवणुकीच्या प्रवेशाचे मार्ग**
विदेशी थेट गुतवणुकीला जवळजवळ सर्वच क्षेत्रात मुक्त परवानगी आहे. थेट विदेशी गुंतवणूक दोन मार्गांनी करता येईल- स्वयंचलित मार्ग आणि सरकारी मार्ग. स्वयंचलित मार्गाखाली, विदेशी गुंतवणूकदाराला किंवा भारतीय कंपनीला गुंतवणुकीसाठी रिझर्व्ह बँकेच्या किंवा भारत सरकारच्या मंजुरीची गरज नाही. सरकारी मार्गाखाली विदेशी गुंतवणूक प्रवर्तन मंडळ(एफआयपीबी), वित्त मंत्रालय, भारत सरकार यांच्या पूर्वानुमतिची आवश्यकता आहे. विदेशी गुंतवणूकदारांसाठी प्रवेशाचे मार्ग त्याचप्रमाणे भारतातील क्षेत्र-निहाय मर्यादा परिशिष्ट २ मध्ये दिल्या आहेत.
एफडीआय धोरण भारत सरकार ठरविते. भारतात एफडीआयच्या संबंधात धोरण आणि कार्यपद्धती ***"दि मॅन्युअल ऑन इन्व्हेस्टिंग इन इंडिया- फॉरिन डायरेक्ट इन्व्हेस्टमेंट, पॉलिसी अँड प्रोसिजर्स"*** मध्ये उपलब्ध आहेत. हा दस्ताऐवज सार्वजनिक ठिकाणी उपलब्ध आहे आणि तो औद्योगिक धोरण आणि प्रवर्तन विभाग, व्यापार आणि उद्योग मंत्रालय यांच्या www.dipp.nic.in या वेबसाइटवरून डाउनलोड करता येईल. एफइएमए नियमने गुतवणूकीच्या पद्धती विहीत करतात म्हणजेच निधी स्वीकृतीच्या पद्धती, समभाग / परिवर्तनीय कर्जरोखे आणि अधिमान समभागां[१] चे निर्गमन आणि गुंतवणुकीचा अहवाल रिझर्व्ह बँकेला देणे.
*१ येथे हे स्पष्ट करण्यात येत आहे कि ह्या परिपत्रकात नमूद केलेले "समभाग" म्हणजे समभाग, "परिवर्तनीय कर्जरोखे" म्हणजे संपूर्ण आणि बंधनकारकपणे परिवर्तनीय असलेले कर्जरोखे आणि " अधिमान समभाग" म्हणजे संपूर्ण आणि बंधनकारकपणे परिवर्तनीय असलेले अधिमान समभाग. सीएफ. एपी (डीआयआर मालिका) परिपत्रक क्र. ७३ आणि ७४ दिनांक जून ८, २००७.*

**२. भारतातील गुंतवणुकीला मनाई**
भारतातील कोणत्याहि कंपनीत किंवा भागीदारी फर्म किंवा मालकीची कन्सर्न किंवा एकक, अंगीकृत केलेले किंवा न केलेले (जसे विश्वस्त संस्था), जे खालील कार्यात व्यस्त आहे किंवा व्यस्त होण्याचे प्रस्तावित आहे, त्यात विदेशी गुंतवणुकीला मनाई आहे.

(१) चीट फंडाचा व्यवसाय, किंवा
(२) निधी कंपनी, किंवा
(३) शेतीविषयक किंवा लागवड कार्य किंवा
(४) स्थावर मालमत्ता व्यवसाय, किंवा फार्म हाऊसचे बांधकाम
(५) हस्तांतरणीय विकास हक्कातील(टीडीआरस) व्यवहार

हे स्पष्ट करण्यात येत आहे कि स्थावर मालमत्तेच्या व्यवसायात नगरांचा विकास, निवासी/व्यापारी जागा, रस्ते आणि पूल यांचे बांधकाम समाविष्ट नाही. पुढे असेही स्पष्ट करण्यात येत आहे कि, एफइएमए नियमनांप्रमाणे गुंतवणूक असलेल्या भागीदारी फर्मस मालकीच्या कन्सर्नस यांना मुद्रित माध्यम क्षेत्रात कार्यशील होण्यास परवानगी नाही. उक्त व्यतिरिक्त सुद्धा, काही क्षेत्रात एफडीआरच्या स्वरुपातील गुंतवणुकीला मनाई आहे, ती अशीः

(१) किरकोळ व्यापार

(२) अणू उर्जा

(३) लॉटरी व्यवसाय

(४) जुगार आणि बेटिंग

शेती (नियंत्रित स्थितीच्या अधीन फुलबागायत, उद्यान, बियाण्यांचा विकास, पशुपालन, मत्स्यसंवर्धन आणि भाज्यांची लागवड, अळंबी वगैरे आणि शेती आणि तत्सम क्षेत्राशी संबंधित सेवा आणि लागवड (चहा मळ्यांव्यतिरिक्त) वगळता).

## ३. भारतात अनुज्ञेय गुंतवणूक

उक्त मनाई केलेल्या क्षेत्रांव्यतिरिक्त, भारत सरकार, वित्त मंत्रालय, विदेशी गुंतवणूक प्रवर्तन बोर्ड (एफआयपीबी) यांच्या खास पूर्वानुमतिने किंवा स्वयंचलित मार्गाने गुंतवणूक करता येईल. विदेशी गुंतवणूकदारांसाठी प्रवेश मार्ग तसेच विशिष्ट क्षेत्रातील गुंतवणुकीवर भारतातील मर्यादा परिशिष्ट-२ मध्ये दिल्या आहेत.

एफइएमए नियमनांमध्ये गुंतवणूक कार्याचे स्वरुप विहीत केलेले आहे तर, या कार्याचा आवाका, विशेषतः अनिवासी गुंतवणूकदारांद्वारा सरकारी मंजूरी मार्गाधीन गुंतवणुकींच्या बाबतीत, भारतातील गुंतवणुकीवरील सरकारी पुस्तिकेत सविस्तर दिला आहे.

थेट विदेशी गुंतवणूक. धोरण आणि कार्यपध्दती.

हा दस्ताऐवज सार्वजनिक क्षेत्रात उपलब्ध आहे आणि तो औद्योगिक धोरण आणि प्रवर्तन विभाग, व्यापार आणि उद्योग मंत्रालय यांच्या www.dipp.nic.in या वेबसाइटवरून डाऊनलोड करता येईल.

## भारतात गुंतवणूक करण्यासाठी पात्रता

भारताबाहेरील निवासी व्यक्ती[2] (पाकिस्तान किंवा बांगलादेशाच्या नागरिकांव्यतिरिक्त) किंवा भारताबाहेर अंगीकृत एकक (पाकिस्तान किंवा बांग्लादेशात अंगीकृत एककांव्यतिरिक्त) यांना भारत सरकारच्या एफडीआय धोरणाच्या अधीन भारतात गुंतवणूक करता येईल.

*२ एफइएमए (कलम २ यु ) खाली ''व्यक्ती'' ची व्याख्या अशी करण्यात आली आहे.*

*(ए) एक व्याक्ति*

*(बी) हिंदू अविभक्त कुटुंब*

*(सी) एखादी कंपनी*

*(डी) एखादी फर्म*

*(इ) व्यक्तींची संघटना किंवा व्यक्तींची संस्था, अंगीकृत असो वा नसो..*

*(एफ) प्रत्येक कृत्रिम ज्युरिडिकल व्यक्ती, आधीच्या कोणत्याही उपकलमांखाली न येणारी, आणि*

*(जी) अशा व्याक्तिच्या मालकीची कोणतीही एजन्सी, कार्यालय, किंवा शाखा.*

- *" भारताबाहेरील निवासी व्यक्ती " म्हणजे जी व्यक्ती भारताची निवासी नाही.*
- *" भारतातील निवासी व्यक्ती " म्हणजे-*

*(१) अशी व्यक्ती जी आधीच्या आर्थिक वर्षाच्या काळात एकशे ब्याऐंशी दिवसांहून अधिक काळ भारतात राहिली आहे. पण पुढील समाविष्ट नाही-*

ज्या ओसीबीजनी स्वतःला भारताबाहेर अंगीकृत कंपन्या म्हणून रुपांतरित केले आहे त्या रिझर्व्ह बँकेच्या / सेबीच्या विपिरत सूचनेअधीन नसतील तर त्यांना एफडीआय योजनेखाली भारतात नवीन गुंतवणूक करता येईल.

**साधनांचे प्रकार**

भारतीय कंपन्यांना समभाग/अधिमान समभाग/परिवर्तनीय कर्जरोखे निर्गमित करण्यासाठी एफइएमए नियमानांच्या अधीन विहीत केलेल्या मूल्यांकनाच्या नियमांअधीन मुक्त परवानगी आहे. अपरिवर्तनीय, परिवर्तनाचा पर्याय असणारे किंवा अंशिक परिवर्तनीयता असणाऱ्या अशा अन्य प्रकारच्या अधिमान समभागाचा निर्गम हे कर्ज मानले जाईल. त्यामुळे, अशा निर्गमाला बाह्य व्यवसायिक कर्जांना (इसीबी) लागू असणारे म्हणजेच पात्र ऋणको, मान्यताप्राप्त कर्जदार, रक्कम आणि मुदतपूर्ती, अंतिम उपयोगाचे नियम वगैरे लागू होतील. ही साधने रुपयात अभिधानित असल्यामुळे, रुपयातील व्याज लिबॉर सममूल्य स्वॅप अधिक इसीबीच्या तदनुरूप मुदतपूर्तीसाठी अनुज्ञेय स्प्रेडच्या आधारावर असेल. रोख्यांच्या संबंधात, केवळ तेच जे विलिर्दिष्ट काळात संपूर्ण आणि बंधनकारकपणे समभागात परिवर्तनीय असतील, तेच एफडीआय धोरणाच्या अधीन समभागांचा भाग म्हणून मान्य करण्यात येतील.

(ए) कोणत्याही एका प्रकरणात व्याक्ति भारताबाहेर गेली आहे किंवा भारताबाहेर रहात आहे.-

(ए) भारताबाहेर नोकरीसाठी किंवा ती स्वीकारण्यासाठी

(बी) भारताबाहेर व्यवसाय करण्यासाठी किंवा सुटी भारताबाहेर घालविण्ासाठी

(सी) कोणत्याही अन्य हेतूने ज्या परिस्थितीतून त्याचा अनिश्चित कालावधीसाठी भारताबाहेर राहण्याचा हेतू दिसून येतो.

(बी) खालील पैकी कोणत्याही व्यतिरिक्त, भारतात येणारी किंवा राहणारी व्याक्ति-

(ए) भारतात नोकरी स्वीकारल्यामुळे किंवा नोकरीसाठी, किंवा

(बी) भारतात व्यवसाय करण्यासाठी किंवा सुटी घालविण्यासाठी, किंवा

(सी) कोणत्याही अन्य हेतूने , अशा परिस्थितीत, ज्यातून त्याचा अनिश्चित कालासाठी भारतात राहण्याचा हेतु निदर्शित होईल.

(२) कोणतीही व्याक्ति किंवा संस्था जी भारतात नोंदणीकृत किंवा अंगीकृत आहे,

(३) भारताबाहेरील निवासी व्याक्तिच्या मालकीचे किंवा तिच्या नियंत्रणाखालीलभारतातील कार्यालय, शाखा किंवा एजन्सी,

(४) भारतातील निवासी व्यक्तीच्या मालकीचे किंवा तिच्या नियंत्रणाखालील भारताबाहेरील कार्यालय, शाखा किंवा एजन्सी,

**लघु औद्योगिक युनीटसमधील गुंतवणूक**

विदेशी गुंतवणूकदार कोणत्याही लघु औद्योगिक युनीटमध्ये गुंतवणूक करू शकतो, जर ते एफडीआय धोरणाखाली मनाई असलेल्या कोणत्याही कार्यात व्यस्त् नसेल. अशी गुंतवणूक भारतीय कंपनीच्या/एसएसआय युनीटच्या पूर्ण भरणा केलेल्या भांडवलाच्या २४% च्या मर्यादेच्या अधीन असेल. एखादे एसएसआय युनीट त्याच्या पूर्ण भरणा केलेल्या भांडवलाच्या

२४% अधिक समभाग/संपूर्ण परिवर्तनीय अधिमान समभाग/संपूर्ण परिवर्तनीय कर्जरोखे निर्गमित करू शकते जरः
ए) त्याने आपला लघु उद्योग हा दर्जा सोडून दिला असेल,
बी) ते लघु उद्योगासाठी राखीव असलेल्या बाबींच्या उत्पादनात व्यस्त नसेल किंवा व्यस्त होण्याचे प्रस्तावित नसेल, आणि
सी) ते परिशिष्ट २ मध्ये विनिर्दिष्टित केलेल्या क्षेत्रीय मर्यादेची पूर्तता करीत असेल.
हे स्पष्ट करण्यात येत आहे कि, कंपनीने/एसएसआय युनीटने आपला एसएसआय हा दर्जा सोडून दिल्याचे मानण्यात येईल, जर संयंत्र आणि यंत्रसामग्रीतील गुंतवणूक मायक्रो, स्मॉल अँड मिडियम एन्टरप्राइझेस अधिनियम, २००६ अधीन विहीत मर्यादेच्या बाहेर जात असेल.

**इओयूज/एफटीझेडस/इपीझेडस/एचटीपीज आणि एसटीपीज मध्ये गुंतवणूक**
एखादे निर्यातीभिमुख युनीट किंवा मुक्त व्यापार विभागातील किंवा निर्यात प्रक्रिया विभाग किंवा सॉफ्टवेअर पार्क किंवा इलेक्ट्रॉनिक टेक्नॉलॉजी पार्क मधील युनीट परिशिष्ट-२ मध्ये विनिर्दिष्टीत केलेल्या मर्यादेच्या अधीन पूर्ण भरणा केलेल्या भांडवलाच्या २४% बाहेर समभाग/ परिवर्तनीय कर्जरोखे/अधिमान समभाग निर्गमित करू शकते.

**मत्ता पुनरुभारणी कंपन्या (एआरसीज) मध्ये गुंतवणूक**

भारताबाहेरील निवासी व्यक्ती (विदेशी संस्थात्मक गुंतवणूदार(एफआयआयज वगळता)ना भारतीय रिझर्व्ह बँकेकडे नोंदणीकृत असलेल्या मत्ता पुनरुभारणी कंपन्यांच्या(एआरसीज) भाग भांडवलात सरकारी मार्गाने गुंतवणूक करण्याची परवानगी आहे. अशा गुंतवणुकीसाठी स्वयंचलित मार्ग उपलब्ध नाही. अशा गुंतवणुकी काटेकोरपणे एफडीआयच्या स्वरूपात असाव्यात आणि एफआयआयजद्वारा गुंतवणकींना परवानगी नाही. एफडीआयवर एआरसीच्या पूर्ण भरणा केलेल्या भागभांडवलाच्या ४९ % ची मर्यादा आहे.
परंतु, सेबीकडे नोंदणीकृत असलेल्या एफआयआयज रिझर्व्ह बँकेकडे नोंदणीकृत असलेल्या एआरसीजनी निर्गमित केलेल्या सिक्युरिटी रिसीटस(एसआरस) मध्ये गुंतवणूक करू शकतात. एसआरसच्या योजनेतील प्रत्येक ट्रॅचेमधील एका एफआयआयची गुंतवणूक निर्गमाच्या १० % च्या बाहेर नसण्याच्या अटीअधीन एसआयसच्या योजनेतील प्रत्येक ट्रॅचेमध्ये एफआयआयज ४९ % पर्यंत गुंतवणूक करू शकतात.

**प्रतिभूती बाजारातील पायाभूत सुविधा कंपन्यात गुंतवणूक**
स्टॉक मार्केटस, डिपॉझिटरीज आणि क्लियरिंग कॉर्पोरेशन्स अशा प्रतिभूती बाजारातील पायाभूत सुविधा कंपन्यात, सेबीच्या नियमनांच्या पूर्ततेच्या आणि खालील अटींच्या अधीन विदेशी गुंतवणुकीला परवानगी आहे.ः
१) विदेशी थेट गुंतवणुकी(एफडीआय) साठी २६%आणि विदेशी संस्थात्मक गुंतवणुकीसाठी २३% अशा स्वतंत्र मर्यादेत ह्या कंपनांमध्ये पूर्ण भरणा झालेल्या भागभांडवलाच्या ४९% पर्यंत विदेशी गुंतवणुकीला परवानगी आहे.,
२) एफआयबीपीच्या विशिष्ट पूर्वानुमतिने एफडीआयला परवानगी दिली जाईल, आणि
३) एफआयआयज केवळ दुय्यम बाजारातील खरेदीमार्फत गुंतवणूक करू शकतील.

**नेपाळ आणि भूतानमधून गुंतवणूक**

नेपाळ आणि भूतानमधील अनिवासी तसेच नेपाळ आणि भूतानच्या नागरिकांना प्रत्यावर्तनाच्या तत्त्वावर, एफडीआय योजनेखाली भारतीय कंपन्यांच्या समभागात आणि परिवर्तनीय कर्जरोख्यात गुंतवणूक करण्यास, अशा व्यवहारासाठी प्रदान करायची रक्कम केवळ सामान्य बँकिंग मार्गाने मुक्त विदेशी चलनातील आवक वित्तप्रेषणाद्वारे किंवा अनिवासीच्या एनआरइ/एफसीएनआर(बी) खात्यातील वजावटीद्वारेच प्रदान करण्याच्या अटीअधीन परवानगी आहे.

**राइट्स /बोनस समभागांचे निर्गम**

भारतीय कंपन्यांना क्षेत्रीय मर्यादा काही असल्यास तिच्या पालनाच्या अधीन विद्यमान अनिवासी समाभाग धारकांना मुक्तपणे राइट्स/बोनस समभाग निर्गमित करण्यासाठी एफइएमएच्या तरतुदींनी परवानगी दिलेली आहे. परंतु असे बोनस/राइट्स समभागांचे निर्गम कंपन्या अधिनियम, १९५६, सेबी(उघड करणे आणि गुंतवणूकदारांचे संरक्षण) मार्गदर्शक तत्त्वे(सूचीबद्ध कंपन्यांच्या बाबतीत) वगैरें सारख्या कायद्यांच्या/धटनांत्मक तरतुदींच्या अनुसार असले पाहिजेत. भारतीय कंपन्यांद्वारे अनिवासी समभागधारकांना राइट तत्त्वावर देऊ करण्यात येणारे समभाग निवासी समभागधारकांना देऊ करण्यात येणाऱ्या किंमतीपेक्षा कमी किंमतीत देण्यात येऊ नये.

**पूर्वाश्रमींच्या ओसीबीजना राइटस् निर्गम**

त्यामुळे, समुद्रपार कॉर्पोरेट संस्था (ओसीबीज)ना राइट्स समभागांचा हक्क आपोआप प्राप्त होत नाही. ओसीबीजची गुंतवणूकदारांचा वर्ग म्हणून मान्यता १६ सप्टेंबर, २००३ पासून प्रभावाने काढून घेण्यात आली आहे. त्यामुळे, अशा ओसीबीजना राइटस समभाग निर्गमित करू इच्छिणाऱ्या कंपन्यांना रिझर्व्ह बँकेकडून[3] विशेष परवानगी घ्यावी लागेल.

तथापि, ओसीबीजना बोनस समभाग निर्गमित करता येतील.

*[3] मुख्य महाव्यवस्थापक, भारतीय रिझर्व्हबँक, विदेशी विनिमय विभाग, विदेशी गुंतवणूक खंड, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई याना संभोधिक केलेले.*

विद्यमान अनिवासी समभाग धारकांना, त्यांच्या राइट्स समभागांच्या हक्कांच्या व्यतिरिक्त समभाग किंवा अधिमान समभाग किंवा परिवर्तनीय कर्जरोखे यांच्या निर्गमासाठी अर्ज करण्याची परवानगी आहे. गुंतवणूक स्वीकारणारी कंपनी अंशदान न झालेल्या समभागातून, कंपनीच्या एकूण पूर्ण भरणा झालेल्या भाग भांडवलातील अनिवासींना समभागांचे एकूण निर्गम क्षेत्रीय मर्यादेच्या बाहेर जाणार नाही या अटीच्या अधीन, असे अतिरिक्त समभाग निर्गमित करू शकते.

**निवासींनी अनिवासीना राइट्स सोडून देणे**

विद्यमान अनिवासी समभाग धारकांना त्यांच्या राइट्स च्या पात्रतेच्या वर अतिरिक्त समभाग-परिवर्तनीय कर्जरोखे-अधिमान समभागांसाठी अर्ज करण्यास परवानगी आहे. गुंतवणूक स्वीकारणारी कंपनी, कंपनीच्या पूर्ण भरणा झालेल्या भांडवलातील अनिवासीना एकूण समभागांचा निर्गम क्षेत्रीय मर्यादांच्या बाहेर जाता नये या अटीच्या अधीन, अंशदान न झालेल्या समभागातून अतिरिक्त राइट्स निर्गमित करू शकते.

**एकत्रीकरणाच्या/विलीनीकरणच्या योजनेखाली समभागांची प्राप्ती**

भारतात कंपन्यांचे विलीनीकरण किंवा एकत्रीकरण साधारणपणे, एकत्रित होणाऱ्या/विलीन होणाऱ्या कंपन्यानी सादर केलेल्या योजनेच्या आधारावर सक्षम न्यायालयाने निर्गमित केलेल्या आदेशाने शासित असते. एकदा, दोन किंवा अधिक कंपन्यांची एकत्रीकरणाची किंवा विलीलीकरणाची योजना न्यायालयाने मंजूर केली कि, हस्तांतरिती कंपनी किंवा नवीन कंपनी हस्तांतरक कंपनीच्या भारताबाहेरील निवासी समभाग धारकांना, हस्तांतरिती किंवा नवीन

कंपनीला हस्तांतरक कंपनीच्या भारताबाहेरील निवासी समभागधारकाना समभाग निर्गमित करण्याची खालील अटींच्या अधीन परवानगी आहेः

(१) भारताबाहेरील निवासींची हस्तांतरिती कंपनी किंवा नवीन कंपनीतील समभाग धारणेतील टक्केवारी क्षेत्रीय मर्यादेच्या बाहेर जाणार नाही.
(२) हस्तांतरिती कंपनी किंवा हस्तांतरक कंपनी किंवा नवीन कंपनी एफडीआय धोरणांतर्गत मनाई असलेल्या कार्यात व्यस्त नाही.

**एम्प्लॉइज स्टॉक ऑप्शन योजनेखाली समभागांचा निर्गम**

सूचीबद्ध भारतीय कंपन्याना त्यांच्या कर्मचाऱ्यांना किंवा तिच्या विदेशातील संयुक्त साहस किंवा संपूर्ण मालकीच्या उपकंपनीच्या, पाकिस्तानचे नागरिक वगळता, असलेल्या कर्मचाऱ्यांना एम्पलॉइज स्टॉक ऑप्शन योजनेखाली(इएसओपीज)समभाग निर्गमित करण्यास परवानगी आहे. इएसपीओज खालील समभाग थेट किंवा न्यासामार्फत, खालील अटींच्या अधीन निर्गमित करता येतील.ः

(१) भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळाने निर्गमित केलेल्या संबंधित नियमनांच्या अटींनुसार योजना तयार करण्यात आली आहे, आणि
(२) योजनेखाली अनिवासी कर्मचाऱ्यांना वाटप करण्यात येणाऱ्या समभागांचे दर्शनी मूल्य, निर्गमन करणाऱ्या कंपनीच्या पूर्ण भरणा झालेल्या भांडवलाच्या ५ टक्क्यांच्या बाहेर जाता कामा नये.
कंपनी सूचीबद्ध नसेल तर तिने कंपन्या अधिनियम, १९५६ च्या तरतुदींचे पालन करणे आवश्यक आहे. भारतीय कंपनी, पाकिस्तान आणि बांगलादेशाचे नागरिक वगळता, भारताबाहेरील निवासी असणाऱ्या कर्मचाऱ्यांना इएसपीओज निर्गमित करू शकते. निर्गमन करणाऱ्या कंपनीने अशा निर्गमाचा तपशील इएसपीओजखाली समभाग निर्गमित केल्याच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत रिझर्व्ह बँकेच्या विभागीय कार्यालयाला सादर करणे आवश्यक आहे.

**एफडीआयचा अहवाल देणे**

**अंतःप्रवाहाचा अहवाल देणेः**

एफडीआय योजनेखाली समभागांच्या/परिवर्तनीय कर्जरोख्यांच्या/अधिमान समभागांच्या निर्गमासाठी भारताबाहेरून गुंतवणूक प्राप्त होणाऱ्या भारतीय कंपनीने, अंतःप्रवाहाचा तपशील प्राप्तीच्या तारखेपासून ३० दिवसांपेक्षा उशिरा नाही असा रिझर्व्ह बँकेला सादर कळविणे आवश्यक आहे. कळवायचा तपशील असा आहेः

(१) विदेशी गुंतवणूदाराचे/गुंतवणूकदारांची नावे आणि पत्ता,
(२) विदेशी चलनात निधी प्राप्त झाल्याची तारीख आणि त्याचे रुपयातील सममूल्य
(३) ज्या अधिकृत डिलर मार्फत निधी प्राप्त झाला त्याचे नाव आणि पत्ता, आणि
(४) गुंतवणुकीसाठी सरकारी मान्यतेचा तपशील, जर काही असेल.

**समभागांच्या निर्गमाचा अहवाल देणे**

समभागांच्या/परिवर्तनीय कर्जरोख्यांच्या/अधिमान समभागांच्या निर्गमानंतर भारतीय कंपनीने समभाग निर्गमित केल्याच्या तारखेपासून ३० दिवसांपेक्षा उशिरा नाही अशा प्रकारे, परिशिष्ट-६ मध्ये जोडलेल्या नमुना एपसी-डीपीआर मध्ये दाखल केला पाहिजे. हा नमुना रिझर्व्ह बँकेच्या

http://www.ri.org.in/Scripts/BS ViewFemaForms.Aspx ह्या वेबसाइटवरून डाउनलोड करता येईल.

नमुना एफसी-डीपीर चा भाग ए योग्य प्रकारे भरून आणि अधिकृत स्वाक्षरीकर्त्याने सही करून कंपनीच्या अधिकृत डिलरकडे सादर केला पाहिजे जो, नमुना पुढे रिझर्व्ह बँकेला सादर करील. नमुना पुढे पाठविताना, अधिकृत डिलर, विदेशी गुंतवणूकदारासंबंधी केवायसी अहवाल जोडील. एपसी-जीपीआर नमुन्यासमवेत कंपनीने खालील कागदपत्रे जोडली पाहिजेतः

(१) कंपनीच्या कंपनी सचिवाचे प्रमाणपत्र कि,

(ए) कंपन्या अधिनियम, १९५६ च्या सर्व गरजा पूर्ण केल्या आहेत,

(बी) सरकारी मान्यतेच्या अटी आणि शर्ती, काही असल्यास, त्यांची पूर्तता केली आहे

(सी) ह्या नियमनांअधीन समभाग निर्गमित करण्यास कंपनी पात्र आहे, आणि

(डी) व्यवहाराच्या रकमेचा पुरावा म्हणून कंपनीकडे भारतातील अधिकृत डिलरने निर्गमित केलेली सर्व मूळ प्रमाणपत्रे आहेत.

(२) भारताबाहेरील निवासी व्याक्तिंना निर्गमित केलेल्या समभागांची किंमत निश्चीत करण्याची पध्दत दर्शविणारे संविधानिक लेखापरिक्षकाचे किंवा चार्टर्ड अकाउंटंटचे प्रमाणपत्र.

कंपनीचे नोंदणीकृत कार्यालय रिझर्व्ह बँकेच्या ज्या विभागीय कार्यालयाच्या अधिकारितेत येते त्या कार्यालयाला उक्त दोन्ही अहवाल सादर केले पाहिजेत.

एफसी-जीपीआर चा भाग बी वार्षिक तत्त्वावर रिझर्व्ह बँकेकडे[४] दाखल करावा. एफडीआयच्या मार्गाने तसेच पोर्टफोलिओ अन्य गुंतवणूक आणि आधीच्या एप्रिल ते मार्च कालावधीसाठी अर्जित रकमेच्या पुनर्गुंतवणूकीच्या मार्गे सर्व थकित गुंतवणुकीसाठी दाखल करणे दर वर्षीच्या जूनमध्ये करण्यात आले पाहिजे. (उदाहरणार्थ, सर्व भारतीय कंपन्या, ज्यांना एप्रिल २००६ ते मार्च २००७ या कालावधीत विदेशी गुंतवणूकदारांकडून एफडीआय. पोर्टफोलिओ गुंतवणूक, अन्य गुंतवणूक (जसे रोखे, कर्जरोखे वगैरे) प्राप्त झाली आहे, त्यांनी ती त्या कालावधीत ठेवून घेतलेल्या अर्जित रकमेबरोबर एफसी-जीपीआर च्या भाग बी मध्ये जून २००७ च्या महिन्यात कळविली पाहिजे.)

*४ समंत्रक, बॅलन्स ऑफ पेमेंटस स्टॅटिस्टीकल डिविजन, डिपार्टमेंट ऑफ स्टॅटीस्टीकल ॲनालायसिस ॲंड कॉम्प्यूटर सर्विसेस, भारतीय रिझर्व्ह बॅंक, सी९, ८ वी मजला, बांद्रा-कुर्ला संकुल, बांद्रा(पूर्व), मुंबई – ४०० ०५१ याना संबोधित करून.*

उपरोक्त तीन पायऱ्यांच्या अहवाल देण्याच्या पध्दतीचे जेथे जेथे गुंतवणुकीच्या हेतूने सामान्य बँकिंग वाहिन्या किंवा एनआरइ एफसीएनआर खात्यातील वजावटीद्वारे अंतःप्रवाह असेल तेथे अनुसरण केले पाहिजे. त्याशिवाय, भारताबाहेरील निवासी व्याक्तिला थेट किंवा विद्यमान भारतीय कंपनीबरोबर एकत्रीकरण . विलीनीकरणाद्वारे बोनस . राइटस् समभागांचे किंवा स्टॉक ऑप्शन्स, निर्गमन त्याचप्रमाणे इसीबी स्वामित्व एकरकमी तांत्रिक ज्ञान शुल्क यांच्या रुपांतरामुळे समभागांचे निर्गमन नमुना एफसी-जीपीआर मध्ये कळविले पाहिजे.

**निर्गम किंमत**

एफडीआय योजनेखाली भारताबाहेरील निवासी व्याक्तिला निर्गमित करण्यात आलेल्या समभागांची किंमत, सेबीच्या सूचिबद्ध कंपन्यांच्या बाबतीतील मार्गदर्शक तत्त्वांच्या आधारे निश्चीत करण्यात येईल. सूचिबद्ध नसलेल्या कंपन्यांच्या बाबतीत, पूर्वाश्रमींच्या कंट्रोलर ऑफ कॅपिटल इश्शूजने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार चार्टर्ड अकाउंटंटने समभागांचे मूल्यांकन केले पाहिजे.

**विदेशी चलन खाते**

एफडीआय योजनाखाली भारताबाहेरील निवासी व्यक्तीला समभाग निर्गमित करण्यास पात्र असलेल्या कंपन्यांना समभागाच्या अंशदानातील विदेशी चलन खात्यातील रक्कम ठेवून घेण्यास आरबीआयच्या पूर्वानुमतिने परवानगी असेल.

**समभाग आणि परिवर्तनीय कर्जरोख्यांचे हस्तांतरण**

विदेशी गुंतवणूकदार भारतीय समभागधारकांकडून किंवा अन्य अनिवासी समभागधारकांकडून विद्यमान समबाग खरेदी करून संपादन करून सुध्दा भारतीय कंपन्यात गुंतवणूक करू शकतात. खालील अटींच्या अधीन हस्तांतरणाच्या मार्गाने समभाग संपादन करण्यास अनिवासींना एनआरआयजना सर्वसाधारण परवानगी देण्यात आलेली आहेः-

-भारताबाहेरील निवासी व्यक्ती (एनआरआय आणि ओसीबी वगळता) भारताबाहेरील निवासी असलेल्या कोणत्याही व्यक्तीला (अनिवासींसह) विक्री किंवा देणगीच्या मार्गाने समभाग किंवा परिवर्तनीय कर्जरोखे हस्तांतरित करू शकते.

एनआरआयज आणि पूर्वाश्रमींच्या ओसीबीज त्यांनी धारण केलेले समभाग किंवा परिवर्तनीय कर्जरोखे विक्री किंवा देणगीच्या मार्गाने अन्य एनआरआला हस्तांतरित करू शकतात.

उक्त दोन्ही प्रकरणात, ज्या कंपनीचे समभाग हस्तांतरित केले जात आहेत ती कंपनी ज्या क्षेत्रात व्यस्त आहे त्याच क्षेत्रात हस्तांतरितीचा भारतात गुंतवणूक तांत्रिक सहकार्य व्यापारी चिन्ह करार या द्वारे आधीचे व्हेंचर किंवा सामंजस्य असेल, तर त्याला समभाग संपादन करण्यापूर्वी एसआयए एफआयपीबी ची पूर्वानुमति प्राप्त करणे आवश्यक आहे. परंतु हे बंधन, आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थाना (म्हणजेच एडीबी, आयएफसी, सीडीसी, डीइजी) आणि माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात व्यास्त असणाऱ्या भारतीय कंपन्याना समभाग हस्तांतरित करण्यास लागू नाही.

- भारताबाहेरील निवासी व्याक्ति भारतातील निवासी व्याक्तिला कोणतीही प्रतिभूती देणगीच्या मार्गाने हस्तांतरित करू शकते.

- भारताबाहेरील निवासी व्याक्ति एखाद्या भारतीय कंपनीचे समभाग किंवा परिवर्तनीय कर्जरोखे नोंदणीकृत दलालामार्फत भारतातील मान्यताप्राप्त स्टॉक एक्स्चेंजवर विकू शकते.

- भारतातील निवासी व्याक्ति आर्थिक सेवा क्षेत्राव्यतिरिक्त(म्हणजेच बँका, एनबीएफसी, विमा, एआरसीज, आणि स्टॉक एक्स्चेंजेस, क्लियरिंग कॉर्पोरेशन्स वगैरे सारख्या प्रतिभूती बाजारातील पायाभूत सेवा पुरविणारे) अन्य क्षेत्रातील भारतीय कंपन्यांचे समभाग परिवर्तनीय कर्जरोखे(अंशदात्याच्या समभागांच्या हस्तांतरणासहित), परिशिष्ट ३ मध्ये दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांच्या अधीन खाजगी व्यवस्थेखाली भारताबाहेरील निवासी व्यक्तीला विकू किंवा हस्तांतरित करू शकते.

- भारताबाहेरील निवासी व्यक्तीद्वारे भारतातीतल निवासी व्यक्तीला खाजगी व्यवस्थेखाली विक्रीच्या मार्गाने, परिशिष्ट ३ मध्ये दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांच्या अधीन, समभागांच्या परीवर्तनीय कर्जरोख्यांच्या हस्तांतरणासाठी सर्वसाधारण परवानगी सुध्दा उपलब्ध आहे.

उक्त सर्वसाधारण परवानगीत, पूर्वी सरकारी मार्गाखाली येणाऱ्या पण आता आरबीआयच्या स्वयंचलित मार्गाखाली येणाऱ्या कार्यात व्यस्त असणाऱ्या एखाद्या भारतीय कंपनीचे समभाग परिवर्तनीय कर्जरोखे निवासी द्वारा अनिवासीला हस्तांतरित करणे त्याचप्रमाणे अनिवासीद्वारा एखाद्या भारतीय कंपनीला बाय-बॅक आणि किंवा कंपनीच्या भांडवल कमी करण्याच्या योजनेखाली हस्तांतरित करणेसुद्धा समाविष्ट आहे. तथापि ही सर्वसाधारण परवानगी, एखाद्या आर्थिक सेवा क्षेत्रातील (म्हणजेच बँका, एनबीएफसीज, एआरसीज, विमा आणि स्टॉक एक्सचेंजेस, क्लियरिंग कॉर्पोरेशन्स वगैरेसारख्या प्रिभूती बाजारातील पायाभूत सुविधा पुरविणारे) कोणत्याही कार्यात व्यस्त असणाऱ्या एककाच्या समभागाच्या कर्जरोख्यांच्या हस्तांतरणासाठी उपलब्ध नाही.

निवासी आणि अनिवासी यांच्या दरम्यानचे आणि उलटया बाजूने समभागांचे हस्तांतरण नमुना एफसी-टीआरएस(परिशिष्ट-७ मध्ये जोडला आहे) कळवायचे आहे. हा नमुना एडी बँकेला सादर करणे आवश्यक आहे, जी तो तिच्या लिंक कार्यालयाकडे पाठवील. लिंक कार्यालय सर्व नमुने एकत्रित करील आणि आरबीआयला अहाल सादर करील.

एडी प्रवर्ग – १ बँकाना खुल्या प्रस्तावांसाठी एक्झिट प्रस्तावांसाठी आणि समभाग सूचिबद्धतेतून काढून टाकण्यासाठी अनिवासी कॉर्पोरेटसद्वारा एस्क्रो खाती आणि विशेष खाती उघडण्यासाठी सर्वाधारण परवानगी देण्यात आली आहे. संबंधित सेबी(एसएएसटी) नियमने किंवा लागू असणारी अन्य कोणतीही सेबी नियमने कंपन्या अधिनियम, १९५६ च्या तरतूदी लागू असतील.

**समभागांच्या परिवर्तनीय कर्जरोख्यांच्या हस्तांतरणाच्या काही प्रकरणात आरबीआयची पूर्वानुमति**

भारतातील निवासी एखादी व्यक्ती, जी देणगीच्या मार्गाने कोणतीही प्रतिभूती भारतातबाहेतील निवासी व्याक्तिला हस्तांतरित करू इच्छित असेल, तर तिंला त्यासाठी रिझर्व्ह बँकेची[५] पूर्वानुमति घ्यावी लागेल. अशा अर्जांच्या प्रक्रियेच्या वेळी रिझर्व्ह बँक खालील बाबी विचारात घेईलः

-हस्तांतरिती (देणगी स्वीकारणारा) अशी प्रतिभूती धारण करण्यास वेळोवेळी दुरुस्त केल्याप्रमाणे अधिसूचना क्र. एफइएमए २०-२०००-आरबी दिनांक मे ३, २००० च्या परिशिष्ट १, ४ आणि ५ अधीन पात्र आहे.

-देणगी भारतीय कंपनीच्या पूर्ण भरणा झालेल्या-कर्जरोख्यांच्या प्रत्येक मालिकेच्या म्युच्युअल फंडाच्या प्रत्येक योजनेच्या ५ टक्क्याहून अधिक नसेल.

-लागू असलेल्या क्षेत्रीय मर्यादेचा भारतीय कंपनीतील थेट विदेशी गुंतवणुकीच्या(एफडीआय) चा भंग केलेला नसेल.

५ मुख्य महाव्यवस्थापक, भारतीय रिझर्व्ह बँक, विदेशी विनिमय विभाग, विदेशी गुंतवणूक खंड, ११ वा मजला, फोर्ट, मुंबई- ४०० ००१ याना परिशिष्ट-४ मध्ये विहीत केलेल्या कागदपत्रांसहित संबोधित केलेले.

-हस्तांतरक(दाता) आणि हस्तांतरिती(स्वीकारणारा) हे वेळोवेळी दुरुस्त केल्याप्रमाणे, कंपन्या अधिनियम, १९५६ च्या कलम ६ मध्ये केलेल्या व्याख्येनुसार जवळचे नातेवाईक आहेत. चालू सूची परिशिष्ट ५ मध्ये पुनरुत्पादित केली आहे.

-हस्तांतरित करावयाच्या प्रतिभूतीचे मूल्य, हस्तांतरितीने आधीच देणगीद्वारे भारताबाहेरील निवासी कोणत्याही व्याक्तिला हस्तांतरित केलेल्या कोणत्याही प्रतिभूतीसहीत एका दिनदर्शिका वर्षात यूएस डॉलर २५,००० च्या रुपयातील सममूल्यापेक्षा अधिक नसेल.

-रिझर्व्ह बँक वेळोवेळी सार्वजनिक हिताच्या दृष्टीने ठरवून देईल त्या अन्य अटी.

निवासीकडून अनिवासीकडे समभागांच्या विक्रीच्या मार्गाने हस्तांतरणाच्या खालील घटनांत आरबीआयची पूर्वानुमति आवश्यक आहेः

-आर्थिक क्षेत्रात(म्हणजे बँका, एनबीएफसीज, मत्ता पुनरुभारणी कंपन्या, विमा, आणि स्टॉक मार्केट, क्लियरिंग कॉर्पोरेशन वगैरेसारख्या प्रतिभूती बाजारात पायाभूत सेवा पुरविणारे) कार्यरत असणाऱ्या एखाद्या भारतीय कंपनीच्या समभागांचे किंवा परिवर्तनीय कर्जरोख्यांचे हस्तांतरण.

-असा व्यवहार ज्याला सेबी(सबस्टँशियल ॲक्विझिशन ऑफ शेअर्स अँड टेकओव्हर्स) नियमने, १९९७ लागू होतात.

निवासीकडून अनिवासीकडे समभागांच्या विक्रीच्या किंवा अन्य मार्गाने हस्तांतरणाच्या खालील घटनात आरबीआयची परवानगीनंतर सरकारची मंजूरी आवश्यक आहेः

-सरकारी मंजूरी मार्गाखाली येणाऱ्या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या कंपन्यांच्या समभागांचे हस्तांतरण,

-लागू असलेल्या क्षेत्रीय मर्यादेचा भंग करून भारतीय कंपनीत विदेशी गुंतवणुकीत परिणत होणारे समभागांचे हस्तांतरण.

**इसीबी एकरकमी शुल्क स्वमित्वाचे समभागात रुपांतर**

भारतीय कंपन्याना खालील अटींच्या आणि अहवाल देण्याच्या आवश्यकतेअधीन, बाह्य व्यवसायिक ऋणांचे (इसीबी) समभागत अधिमान समभागात रुपांतर करण्यास सर्वसाधारण परवानगी देण्यात आली आहे.

१) कंपनीचे कार्य एफडीआयसाठी स्वयंचलित मार्गाखाली येत असावे किंवा कंपनीने कंपनीत विदेशी समभागांसाठी सरकारची मंजूरी प्राप्त केलेली असावी.
२) इसीबीचे समभागात रुपांतर केल्यानंतर विदेशी समभाग, क्षेत्रीय मर्यादा, काही असल्यास तिच्या आत असावे,
३) जसे प्रकरण असेल त्याप्रमाणे सूचीबध्द किंवा असूचीबध्द कंपन्यांच्या बाबतीत, समभागांची किंमत सेबी नियमने पूर्वाश्रमींच्या सीसीआय मार्गदर्शक तत्त्वांनुसार केलेली असावी.
४) लागू असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याखाली किंवा नियमनांखाली विहीत केल्याप्रमाणे आवश्यकतांची पूर्तता.
रुपांतराची सुविधा स्वयंचलित किंवा मंजूरी मार्गाचा अधीन प्राप्त केलेल्या इसीबीसाठी उपलब्ध आहे. देय आहेत अथवा नाही हे विचारात न घेता, त्याचप्रमाणे अनिवासी सहयोगींकडून प्राप्त केलेल्या प्रतिभूत अप्रतिभूत ऋणांसाठी सुद्धा हे लागू आहे. सर्वसाधारण परवानगी स्वयंचलित मार्ग किंवा एसआयए एफआयपीब मार्गाखालील एकरकमी तांत्रिक ज्ञान शुल्क, स्वामित्व यांच्या समक्ष समभागांच्या अधिमान समभागांच्या निर्गमासाठी सुद्धा सेबी सीसीआयच्या किंमत ठरविण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वांच्या आणि लागू असलेल्या करविषयक कायद्यांच्या पूर्ततेच्या अधीन उपलब्ध आहे.
विशेष आर्थिक विभागातील (एसइझेडस) युनीटसना खालीलच्या अधीन भांडवली मालाच्या आयातीसमक्ष अनिवासींना समभाग निर्गमित करण्यास परवानगी आहेः-
ए) मूल्यांकनाची विकास आयुक्त आणि उचित कस्टम्स अधिकाऱ्यांचा समावेश असलेल्या समितीद्वारा पडताळणी करण्यात यावी.
बी) उक्त प्रकारे समभाग निर्गमित करणाऱ्या एसइझेड युनीटने निर्गमित केलेल्या समभागांचा तपशील नमुना एफसी-जीपीआर मध्ये कळवावा.

**अहवाल देण्याच्या आवश्यकता**

इसीबीच्या रुपांतरासमक्ष निर्गमित केलेल्या समभागांचा तपशील खाली दर्शविल्याप्रमाणे रिझर्व बँकेच्या संबंधित विभागीय कार्यालयाला कळविला पाहिजेः
१) इसीबीचे समभागात पूर्ण रुपांतर केल्याच्या बाबतीत, कंपनीने नमुना एफसी-जीपीआर मध्ये रिझर्व्ह बँकेच्या संबंधित विभागीय कार्यालयाला तसेच नमुना इसीबी-२ मध्ये डिपार्टमेंट ऑफ स्टॅटिस्टीकल ॲनालायसिस अँड कॉम्प्यूटर सर्व्हिसेस (डीइएसएसीएस), भारतीय रिझर्व्ह बँक, बांद्रा कुर्ला संकुल, मुंबई -४०० ०५१ याना ज्या महिन्याशी ते संबंधित असेल त्याच्या समाप्तीपासून सात दिवसांच्या आत कळविले पाहिजे. समभागात पूर्णपणे रुपांतरित इसीबी असे शब्द इसीबी नमुन्याच्या वरील बाजूस स्पष्टपणे दर्शवावेत. एकदा कळविल्यानंतर, त्यानंतरच्या महिन्यात इसीबी-२ नमुना दाखल करणे आवश्यक नाही.
२) इसीबीच्या अंशतः रुपांतराच्या बाबतीत, कंपनीने रुपांतरित भाग नमुना एफसी-जीपीआर मध्ये तसेच इसीबी-२ नमुन्यात रुपांतर न केलेला भाग रुपांतरित भागापासून पूर्णपणे वेगळा करून संबंधित विभागीय कार्यालयाला कळविला पाहिजे. अंशतः रुपांतर केलेली इसीबी असे शब्द इसीबी-२ नमुन्याच्या वरच्या बाजूला स्पष्टपणे दर्शवावेत. त्यानंतरच्या महिन्यात, इसीबीचा राहिलेला भाग डीइएसएसीएसला इसीबी-२ नमुन्यात कळवावा.

**विक्री उत्पन्नाचे वित्तप्रेषण**

अधिकृत बँक समभागांच्या भारताबाहेरील निवासी विक्रेत्याला प्रतिभूतीच्या विक्रीचे उत्पन्न (लागू असलेल्या करांच्या नक्त) वित्तप्रेषित करण्यास, प्रतिभूती प्रत्यावर्तन तत्त्वावर धारण केलेली

असल्यास, प्रतिभूतीची विक्री विहीत मार्गदर्शक तत्त्वांनुसार केलेली असल्यास आणि एनओसी कर निपटारा प्रमाणपत्र हजर केल्यास परवानगी देऊ शकते.

**कंपनी बंद केल्यानंतर तिच्या परिसमापनानंतर वित्तप्रेषण**

एडीना कंपन्या अधिनियम, १९५६ अधीन परिसमापनाखाली असणाऱ्या भारतीय कंपन्यांच्या मत्तेतून वित्तप्रेषणासाठी कंपनी बंद करण्याच्या न्यायालयाच्या किंवा अधिकृत परिसमापकाच्या कोणत्याही आदेशाच्या अधीन किंवा स्वेच्छेने बंद करण्याच्या बाबतीत परिसमापकाच्या आदेशाच्या अधीन आणि करांच्या पूर्ततेअधीन सुद्धा परवानगी देण्यात आलेली आहे. एडीनी वित्तप्रेषणाला अर्जदाराने खालील सादर केल्यास परवानगी द्यावीः-

(ए) वित्तप्रेषमासाठी आयकर अधिकाऱ्यांचे ना-हरकत किंवा कर निपटारा प्रामाणपत्र.

(बी) लेखा परिक्षकाचे प्रमाणपत्र कि भारतातील सर्व उत्तरदायित्वे पूर्ण प्रदान केलेली आहेत किंवा त्यासाठी पुरेशी तरतूद केलेली आहे.

(सी) लेखा परिक्षकाचे अशा प्रभावाचे प्रमाणपत्र कि बंद करणे कंपन्या अधिनियम, १९५६ च्या तरतुदींच्या अनुसार आहे.

(डी) न्यायालयाद्वारे व्यातिरिक्त अन्य प्रकारे बंद करण्याच्या प्रकरणात, लेखा परिक्षकाचे अशआ प्रभावाचे प्रमाणपत्र कि अर्जदाराविरुद्ध किंवा परिसमापनाखालील कंपनीविरुद्ध भारतातील कोणत्याही न्यायालयात कोणतीही कायदेशीर कार्यवाही प्रलंबित नाही किंवा वित्तपेरषमाला परवानगी देण्यात कोणतीही कायदेशीर अडचण नाही.

**भारतीय कंपन्यांद्वारे एडीआर जीडीआर अधीन समभागांचे निर्गमन**

डिपॉझिटरी रिसीटस(डीआरस) या भारतीय कंपन्यांच्या वतीने एखाद्या डिपॉझिटरी बँकेने भारताबाहेर निर्गमित केलेल्या वाटाघाटीयोग्य प्रतिभूती असतात, ज्या भारतातील परिरक्षक बँकेने ठेव म्हणून कंपनीच्या धारण केलेल्या स्थानिक रुपयातील अभिधानित समभागांचे प्रतिनिधित्व करतात. डीआरसची यूएस, सिंगापूर, लक्झेंबर्ग वगैरे ठिकाणच्या स्टॉक मार्केटमध्ये देवाणघेवाण होते. यीएस मार्केटमध्ये सूचीबद्ध असलेल्या डीआरस अमेरिकन डिपॉझिटरी रीसीटस्(एडीआरस) म्हणून ओळखल्या जातात आणि ज्या अन्यत्र सूचीबद्ध असतात आणि ज्यांची देवाणघेवाण होते त्या ग्लोबल डिपॉझिटरी रीसीटस्(जीडीआरस) म्हणून ओळखल्या जातात. भारतीय संदर्भात. डीआर या एफडीआय समजल्या जातात.

भारतीय कंपन्या, विदेशी चलनातील परिवर्तनीय रोख्यांच्या निर्गमनासाठी योजना आणि सामान्य समभाग(डिपॉझिटरी रीसीट मेकॅनिझम मार्फत) योजना १९९३ नुसार आणि त्याखाली केंद्र सरकारने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार विदेशात एडीआरस जीडीआरस च्या निर्गमानाद्वारे विदेशी चलनाचे स्रोत उभारू शकतात.

कंपनी जर एफडीआयखाली भारताबाहेरील निवासी व्यक्तीला समभाग निर्गमित करण्यास पात्र असेल तर एडीआरस जीडीआरस निर्गमित करू शकते. तथापि, भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळाने (सेबी) प्रतिभूती बाजारात व्यवहार करण्यास बंदी घातलेल्या कंपनीसह भारतीय भांडवल बाजारातून निधी उभारण्यास पात्र नसलेली सूचीबध्द भारतीय कंपनी एडीआर जीडीआर निर्गमित करण्यास पात्र असणार नाही.

असूचीबद्ध कंपन्या, ज्यांनी आतापर्यंत आंतरराष्ट्रीय बाजारात भांडवल उभारण्यासाठी एडीआर/जीडीआर चा उपयोग केलेला नाही, त्यांना अशी समुद्रपार साधने निर्गमित करण्यापूर्वी किंवा त्याचवेळी स्थानिक बाजारात सूचीबध्द होणे आवश्यक असेल. ज्या असूचीबध्द कंपन्यांनी आधीच आंतरराष्ट्रीय बाजारात एडीआर/जीडीआर निर्गमित केल्या आहेत, त्यांनी नफा मिळविल्यानंतर किंवा अशा एडीआर जीडीआर च्या निर्गमनापासून तीन वर्षाच्या आत, यापैकी जे आधी असेल, त्यावेळी स्थनिक बाजारात सूचीबध्द झाले पाहिजे.

निर्गमाच्या लीड मॅनेजर बरोबर समंत्रणा करून काढलेल्या प्रमाणाच्या आधारावर भारतीय कंपन्या एडीआरस जीडीआरस निर्गमित करतात. अशा प्रकारे उभारलेले उत्पन्न भारतात त्याची

प्रत्यक्ष गरज भासेपर्यंत विदेशात ठेवले पाहिजे. उत्पन्नाचे प्रत्यावर्तन किंवा विनियोग प्रलंबित असताना भारतीय कंपन्या निधीची गुंतवणूक खालीलप्रमाणे करू शकतात-

- स्टँडर्ड अँड पुअर, फिच, आयबीसीए किंवा मोडीज वगैरेनी श्रेणीकरण केलेल्या आणि असे श्रेणीकरण रिझर्व्ह बँकेने ह्या हेत्वर्थ वेळोवेळी ठरवून दिलेल्या श्रेणीकरणाच्या खाली नसलेल्या बँकांनी देऊ केलेल्या ठेवी किंवा ठेवीचे प्रमाणपत्र,
- भारतातील अधिकृत डिलरच्या भारताबाहेरील शाखेत ठेवी, आणि
- राजकोष पत्रे आणि साधनाची मुदतपूर्ती न संपलेली मुदतपूर्ती एक वर्ष किंवा त्याहून कमी असलेली अन्य आर्थिक साधने.

या बाबतीत तैनातीवरील बंदी अशा निधीची रियल इस्टेट किंवा स्टॉक मार्केटमध्ये गुंतवणूक करण्यावर बंदी या व्यतिरिक्त कोणतीही अंतिम वापर बंधने नाहीत. एखादी भारतीय कंपनी ज्या मर्यादेपर्यंत अशी एडीआरस जीडीआरस उभारू शकते यावर कोणतीही आर्थिक मर्यादा नाही.

निर्गमित केलेल्या समभागांवर मतदानाचा हक्क कंपन्या अधिनियम, १९५६ च्या तरतूदीनुसार आणि अशा पद्धतीत ज्यात एडीआर जीडीआर निर्गमावर घातलेल्या मतदानाच्या हक्कावरील बंधने कंपनी कायद्याच्या तरतूदीशी अनुरुपता राखणारी असावीत. बँकिंग कंपन्यांच्या बाबतीत मतदानाचा हक्क बजावणाऱ्या सर्व समभाग धारकांसाठी मतदानाच्या हक्काबाबची आरबीआयची मार्गदर्शक तत्त्वे लागू राहतील.

पूर्वाश्रमींच्या ओसीबीज ज्या पोर्टफोलिओ मार्गाने भारतात गुंतवणूक करण्यास पात्र नाहीत आणि सेबीने प्रतिभूतींची खरेदी, विक्री किंवा व्यवहार करण्यास प्रतिबंध केलेली एकके भारतीय कंपन्यानी निर्गमित केलेल्या एडीआरस जीडीआरसना अंशदान करण्यास पात्र नाहीत.

एडीआर/जीडीआर निर्गमाची किंमत ठरविताना ती खालील दोन सरासरींच्या पैकी उच्चतम असलेल्यापेक्षा कमी नसावीः

(१) संबंधित तारखेच्या आधीच्या सहा महिन्यात स्टॉक एक्स्चेंजेसवर पुकारण्यात आलेल्या संबंधित समभागाच्या बंद किंमतीच्या साप्ताहिक उच्च आणि निम्न किंमतींची सरासरी,
(२) संबंधित तारखेच्या आधीच्या दोन आठवड्यात स्टॉक एक्स्चेंजेसवर पुकारण्यात आलेल्या संबंधित समभागाच्या बंद किंमतीच्या साप्ताहिक उच्च आणि निम्न किंमतींची सरासरी.

संबंधित तारीख म्हणजे कंपन्या अधिनियम, १९५६ च्या कलम ८१(१ए) नुसार प्रस्तावित निर्गमाचा विचार करण्यासाठी समभाग धारकांची सर्वसाधारण सभा घेण्यात आलेल्या तारखेच्या तीस दिवस आधीची तारीख.

एडीआर जीडीआरचे उत्पन्नाचा विनियोग सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांच्या उद्योगांच्या निर्गुंतवणूक प्रक्रियेत समभागांच्या संपादनाच्या पहिल्या टप्प्यासाठी आणि त्यांच्या धोरणात्मक महत्त्वाच्या दृष्टीकोनातून बंधनकारक असलेल्या जनतेसाठी दुसऱ्या टप्प्यात सुद्धा करता येईल.

**द्विमार्गी फंगिबिलीटी योजना**

भारत सरकारने मर्यादित द्विमार्गी फंगिबिलीटी योजना एडीआरस जीडीआरससाठी आणली आहे.

या योजनेखाली, सेबीकडे नोंदणीकृत असलेला भारतातील स्टॉक ब्रोकर, समुद्रपार गुंतवणूकदाराकडून प्राप्त झालेल्या सूचनांच्या आधारावर एडीआरस जीडीआरस मध्ये रुपांतर करण्यासाठी भारतीय कंपनीचे समभाग खरेदी करू शकतो.

एडीआरस पुनर्निर्गमासाठी त्याखालील समभागात विमोचित केलेल्या भारतीय बाजारात विकलेल्या एडीआरस जीडीआरसच्या मर्यादेपर्यंत परवानगी देण्यात येईल.

**प्रायोजित एडीआर जीडीआर निर्गम**

एखादी भारतीय कंनी एडीआर जीडीआर प्रायोजित सुद्धा करू शकते. या पद्धती खाली, कंपनी तिच्या निवासी समभाग धारकाना त्यांचे समभाग कंपनीला परत देण्याचा पर्याय देते

जेणेकरून अशा समभागांच्या आधारावर विदेशात एडीआरस जीडीआरस निर्गमित करता येतील.

एडीआर जीडीआरचे उत्पन्न भारतात वित्तप्रेषित करण्यात येते आणि ज्या निवासी गुंतवणूकदारानी त्यांचे रुपया अभिधानित समबाग रुपांतारसाठी देऊ केले होते त्यांच्यात वाटले जाते. हे उत्पन्न ज्या निवासी समभाग धारकांनी एडीआर जीडीआरमधील रुपांतरासाठी असे समभाग परत केले होते, त्यांना भारतातील निवासी विदेशी चलन(स्थानिक) खात्यात ठेवता येईल.

**एडीआर जीडीआर निर्गम कळविणे**

एडीआर जीडीआर निर्गमित करणाऱ्या भारतीय कंपनीने निर्गम बंद झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत, अशा निर्गमाचा तपशील परिशिष्ट-८ मध्ये जोडलेल्या प्रपत्रात रिझर्व्ह बँकेला कळविला पाहिजे. कंपनीने परिशिष्ट-९ मध्ये जोडलेल्या प्रपत्रात तीमाही अहवालसुद्धा दिनदर्शिका तिमाही बंद झाल्यापासून १५ दिवसांच्या आत रिझर्व्ह बँकेला कळविला पाहिजे.

**खंड-२ ः विदेशी पोर्टफोलिओ गुंतवणुकी**

**पोर्टफोलिओ गुंतवणूक योजना**

सेबीकडे नोंदणीकृत असलेल्या विदेसी संस्थात्मक गुंतवणीकदार (एफआयआयज) आणि अनिवासी भारतीय पोर्टफोलिओ गुंतवणूक योजने(पीआयएस)खाली भारतीय कंपन्यांद्वारे निर्गमित करण्यात येमारे समभाग आणि परिवर्तनीय कर्जरोखे खरेदी करण्यास पात्र आहेत.

ज्या एफआयआयजची नोंदणी सेबीने मंजूर केली आहे त्यानी, विदेशी चलन खाते आणि किंवा अनिवासी विशेष रुपया खाते उघडण्यासाठी त्यांच्या संबोधित अधिकृत डिलर बँकेकडे(परिरक्षक बँक म्हणून ओळखली जाणारी) जावे.

अनिवासींनी गुंतवणूक वळविण्यासाठी योजनेखाली एनआरइ एनआरओ खाते उघडण्याच्या परवानगीसाठी पोर्टफोलिओ गुंतवणूक योजनेच्या प्रशासनासाठी आरबीआयने अधिकार दिलेल्या कोणत्याही एडी बँकेच्या संबोधित शाखेकडे जावे.

**पीआयएस खाली एफआयआयजद्वारा गुंतवणूक**

रिझर्व्ह बँकेने सेबीकडे नोंदणीकृत एफआयआयजना उपखात्यांना पीआयएसखाली गुंतवणूक करायला सर्वसाधारण परवानगी दिलेली आहे.

***समभागधारणा***

या योजनेखाली एफआयआयजचे उपखात्याची एकूण भागधारणा भारतीय कंपनीने निर्गमित केलेल्या परिवर्तनीय कर्जरोख्यांच्या प्रत्येक मालिकेच्या पूर्ण भरणा झालेल्या भांडवलाच्या १० पेक्षा किंवा पूर्ण भरणा झालेल्या मूल्याच्या १० च्या वर असता कामा नये.

सर्व एफआयआयज उपखाती मिळून एकूण धारणा परिवर्तनीय कर्जरोख्यांच्या प्रत्येक मालिकेच्या पूर्ण भरणा झालेल्या भांडवलाच्या किंवा पूर्ण भरणा झालेल्या मूल्याच्या २४ पेक्षा अधिक नसावी. ही २४ मर्यादा संबंधित भारतीय कंपनीला लागू असलेल्या क्षेत्रीय मर्यादेपर्यंत संविधिक मर्यादेपर्यंत, तिच्या संचालक मंडळाकडून ठराव मंजूर करून आणि त्यानंतर तिच्या सर्वसाधारण सभेकडून त्या प्रभावाचा विशेष ठराव मंजूर करून, वाढविचा येईल.

उपखात्याच्या निधीच्या व्यवस्थापनासाठी एफआयआय म्हमून सेबीकडे नोंदणी केलेल्या स्थानिक मत्ता व्यवस्थापन कंपनीला किंवा पोर्टफोलिओ व्यवस्थापकाला, खालीलच्या वतीने योजनेखाली गुंतवणूक करता येईलः

(१) भारताबाहेरील निवासी व्याक्ति जी विदेशी राज्याची नागरिक आहे, किंवा

(२) भारताबाहेर नोंदणीकृत असलेली ऐएखादी बॉडी कॉर्पोरेट

जर अशी गुंतवणूक उभारलेल्या किंवा गोळा केलेल्या किंवा सामान्य बँकिंग माध्यमातून बाहेरून आणलेल्या निधीतून केलेली असेल. अशा एककांद्वारे गुंतवणूक, भारतीय कंपनीने निर्गमित केलेल्या परिवर्तनीय कर्जरोख्यांच्या प्रत्येक मालिकेच्या एकूण पूर्ण भरणा झालेल्या भाग भांडवलाच्या ५ पेक्षा किंवा पूर्ण भरणा झालेल्या मूल्याच्या ५ पेक्षा अधिक असता कामा नये आणि ती एफआयआयसाठी विनिर्दिष्टीत केलेल्या एकूम मर्यादेपेक्षाही अधिक असता कामा नये.

**गुंतवणुकीवर मनाई**

एफआयआयजना मत्ता व्यवस्थापन कंपन्यानी निर्गमित केलेल्या समभागात गुंतवणूक करण्यास परवानगी नाही. त्यांना खालील कार्यात व्यस्त असणाऱ्या किंवा व्यस्त होण्याचे प्रस्तावित असणाऱ्या कोणत्ाही कंपनीत सुद्धा गुंतवणूक करण्यास परवानगी नाहीः

१) चीट फंडाचा व्यवसाय, किंवा
२) निधी कंपनी, किंवा
३) शेतीविषयक किंवा लागवडविषयक कार्य, किंवा
४) रियल इस्टेट व्यवसाय, किंवा फार्म हाऊसेसचे बांधकाम
५) हस्तांतरणीय विकास हक्कांमधील(टीडीआरस्) व्यवहार

*वर नमूद केलेल्या रियल इस्टेट व्यवसायात नगरांचा विकास, निवासी व्यावसायिक जागा, रस्ते, पूल यांची बांधकामे यांचा समावेश नाही.*

**एक्स्चेंज ट्रेडेड डेरिव्हेटिव्हजचे करार**

सेबीकडे नोंदणीकृत असलेल्या एफआयआयजना भारतातील मान्यताप्राप्त एक्स्चेंजेसवर एक्स्चेंज ट्रेडेड डेरिव्हेटिव्हज करारात व्यवहार करण्यास सेबीने वेळोवेळी विहीत केलेल्या स्थितीच्या मर्यादेच्या अधीन परवानगी आहे. सेबीकडे नोंदणीकृत असलेल्या सर्व एपआययआयज उपखाती त्यांच्या विशेष अनिवासी रुपया खात्यामार्फत वेगळे खाते उघडू शकतात ज्यातून एक्स्चेंज ट्रेडेड डेरिव्हेटिव्हज करारातील व्यवहाराची गुंतवणुकीची सर्व प्रदाने आणि प्राप्ती करण्यात येतील (प्रारंभीची मूळ रक्कम आणि मार्क टू मार्केट सेटलमेंट, व्यवहाराचे आकार, दलाली वगैरेसह). त्याशिवाय, विशेष अनिवासी रुपया खाते आणि एक्स्चेंज ट्रेडेड डेरुव्हेटिव्हज करारातील व्यवहारासाठी ठेवलेले वेगळे खाते यांच्या दरम्यानचे हस्तातरण मुक्तपणे करता येईल. तथापि, रुपयातील रकमेचे प्रत्यावर्तन केवळ त्यांच्या विशेष अनिवासी रुपया खात्यातून संबंधित करांच्या प्रदानाच्या अधीन केले जाईल. अधिकृत डिलर बँकाना उपरोक्त वेगळ्या खात्याच्या योग्य नोंदी ठेवाव्या लागतील आणि जेव्हा केव्हा गरज लागेल तेव्हा रिझर्व्ह बँकेला सादर कराव्या लागतील.

एफआयआयजना डेरिव्हेटिव्हज विभागातील त्यांच्या व्यवहारासाठी भारतातील मान्यातप्राप्त स्टॉक एक्स्चेंजेसना सांपार्श्विक म्हणून एएए श्रेणी असलेल्या फॉरिन सॉव्हरिन सिक्युरिटीज सेबीच्या मार्गदर्शक तत्त्वांच्या अधीन देऊ करता येतील. सिक्युरिटीज सांपार्श्विक म्हणून स्वीकारण्यासाठी, मान्यताप्राप्त स्टॉक एक्स्चेंजेसना एफइएमए अधीन आरबीआयची पूर्वानुमति घ्यावी लागेल.

**वायदा संरक्षण आणि रद्द करणे आणि परत बुकिंग करणे**

एडी बँका एफआयआयजना रोखीकरणकृत गुंतवणुकीच्या नक्त एकूण अंतर्गत वित्तप्रेषणाच्या मर्यादेपर्यंत वायदा संरक्षण देऊ शकतात. एफआयआयजच्या समभाग आणि किंवा ऋण यातील भारतातील संपूर्ण गुंतवणुकीच्या बाजारी मूल्याच्या २ मर्यादेपर्यंत रद्द केलेल्या वायदा करारांचे परत बुकिंग करण्याची परवानगी आहे. परत बुकिंगसाठी पात्रतेच्या मर्यादेचा हिशोब करणे आर्थिक वर्षाच्या(एप्रिल-मार्च) आरंभी असल्याप्रमाणे पोर्टफोलिओच्या बाजारी मूल्यावर अवलंबून असेल. बाकी असलेले करार नेहमीच त्याखाली असणाऱ्या प्रकटीकरणाने योग्य प्रकारे समर्थित केले पाहिजेत. एडी बँक प्रवर्ग -१ नो खात्री केली पाहिजे कि (१) एकूण वायदे करार पोर्टफोलिओच्या बाजारी मूल्यापेक्षा अधिक असणार नाहीत, आणि (२) परत बुकिंगसाठी परवानगी दिलेले वायदा करार, आर्थिक वर्षाच्या आरंभी निश्चीत केलेल्या बाजारी मूल्याच्या
२ हून अधिक असणार नाहीत. वायदा संरक्षणाचे संनियंत्रण पाक्षिक तत्त्वावर केले पाहिजे.

**मूळ रकमेच्या गरजा**

सेबीकडे नोंदणीकृत असलेल्या एफआयआयजना- उपखात्यांना ट्रेडिंग मेंबर-क्लियरिंग मेंबर यांच्याकडे एक्स्चेंज क्लियरिंग हाऊसने विहीत केलेली मूळ रक्कम सामावून घेण्यासाठी पर्याप्त रक्कम ठेवायला परवानगी आहे आणि अशा रकमा तातडीची गरज भागविण्यासाठी आवश्यक समजता येतील.

**एडीकडील खाती**

या हेतूसाठी एफआयआयज उपखाती विदेशी चलन अभिधानित खाती आणि किंवा विशेष अनिवासी रुपया खाती उघडू शकतील. सेबी(एफआयआय) नियमने, १९९५ नुसार प्रतिभूतींमध्ये खरोखर गुंतवणूक करण्यासाठी त्या विदेशी चलन खात्यातून रुपया खात्यात रक्कम हस्तांतरित करू शकतील. ही रक्कम विदेशी चलन खात्यातून रुपया खात्यात सध्याच्या बाजारातील दराने हस्तांतरित करता येईल आणि अधिकृत डिलर बँका प्रत्यावर्तनीय उत्पन्न (करांच्या प्रदानानंतर)

रुपया खात्यातून विदेशी चलन खात्यात हस्तांतरित करू शकतील. विशेष अनिवासी रुपया खात्यात समभागांच्या कर्जरोख्यांच्या, दिनांक सरकारी प्रतिभूती, राजकोष पत्रे वगैरेंच्या विक्रीचे उत्पन्न, लाभांश, व्याजाच्या, बुकिंग केलेल्या वायदा कराराच्या वगैरे मार्गाने प्राप्त झालेले उत्पन्न-समभागांच्या राइटस् प्रस्तावांच्या संन्यसना विक्रीपोटी प्राप्त झालेली भरपाई आणि सेबीच्या सिक्युरिटीज लेंडिंग योजना, १९९७ खाली कर्जाऊ दिलेल्या प्रतिभूतीवर प्राप्त झालेले उत्पन्न, उचित करांच्या कपातीनंतर, काही असल्यास, जमा करता येईल. अशी जमा करण्यास, अधिकृत डिलर बँकेने गुंतवणूक करणाऱ्या संबंधित कंपनीकडून एफआयआयकडून जेथे कोठे आवश्यक आहे तेथे, आयकर अधिनियमानुसार, समभाग कर्जरोखे सरकारी प्रतिभूती धारकाला देय असलेल्या लाभांशाच्या देय व्याजाच्या मान्यताप्राप्त उत्पन्नाच्या ढोबळ रकमेतून स्रोतातून कर कापून घेण्यात आला आहे याची पुष्टी करून घेण्याच्या अटीच्या अधीन परवानगी आहे. विशेष रुपया खात्यातून समभागांच्या कर्जरोख्यांच्या दिनांक सरकारी प्रतिभूतींच्या, राजकोष पत्रांच्या वगैरेंच्या खरेदीसाठी आणि अर्जदार एफआयआयच्या स्थानिक चार्टर्ड अकाउंटंट कर सल्लागाराच्या शुल्काच्या प्रदानासाठी, जेथे असे शुल्क त्यांच्या गुंतवणूक प्रक्रियेचा एकात्मिक हिस्सा आहे, वजावट करण्यास परवानगी आहे.

**एफआयआयकडे खाजगी गुंतवणूक**

सेबीकडे नोंदणी असलेल्या एफआयआयजना ऑफर खाजगी गुंतवणुकीद्वारे एखाद्या भारतीय कंपनीचे समभाग परिवर्तनीय कर्जरोखे खरेदी करण्यास, उक्त विहीत मर्यादेच्या अधीन म्हणजेच प्रत्येक एफाआयआय खाते -भारतीय कंपनीच्या पूर्णभरणा झालेल्या भांडवलाच्या १० आणि एफआयआय उपखाते एकत्र करून-२४ , परवानगी देण्यात आलेली आहे. भारतीय कंपनीला असे समबाग निर्गमित करण्यासाठी परवानगी देण्यात आलेली आहे जरः

(१) सार्वजनिक प्रस्तावांच्या बाबतीत, निर्गमित करण्यात येणाऱ्या समभागांची किंमत निवासीना ज्या किंमतीला समभाग निर्गमित करण्यात आले त्यापेक्षा कमी असता कामा नये आणि

(२) खाजगी गुंतवणुकीच्या बाबतीत, किंमत सेबी मार्गदर्शक तत्त्वांच्या किंवा पूर्वाश्रमींच्या कंट्रोलर ऑफ कॅपिटल इश्शूज ने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांच्या आधार, जसे लागू असेल त्याप्रमाणे, ठरविण्यात आलेल्या किंमतीपेक्षा कमी असता कामा नयेत. पीसीडीज/ एफसीडीज/ उचित त्याग/ वॉरंटस्/ स्थानिक म्युच्युअल फंड योजनेची युनीटस् यांचीही खरेदी करता येईल.

**निधीचे वाटप**

सेबी नोंदणीकृत एफआयआयने एकूण गुंतवणुकीचे वाटप तिच्या भारतीय भांडवली बाजारातील समभाग आणि ऋणे यांच्या दरम्यान ७०ः३० या प्रमाणात मर्यादित ठेवावे. एफआयआय १०० ऋण निधी निर्माण करू शकते आणि अशा निधी सेबीकडे नोंदणी करू शकते.

एफआयआयज द्वारा ऋण प्रतिभूतीतील गुंतवणूक, या बाबतीत सेबीने काही मर्यादा ठरवून दिल्या असल्यास, तिच्या अधीन असेल.

**एफआयआय गुंतवणुकीचा अहवाल देणे**

एखादी एफआयआय एखाद्या भारतीय कंपनीच्या विशिष्ट समभागाच्या निर्गमात एकतर एफडीआय योजनेखाली किंवा पोर्टफोलिओ गुंतवणूक योजनेखाली गुंतवणूक करू शकते. एडी बँकानी खात्री करावी कि ज्या एपआयआय विशेष रुपया खात्यातील वजावटीद्वारे समभागांची खरेदी करतील त्यांचा तपशील स्वतंत्रपणे एलइसी(एफआयआय) विवरणपत्रात कळविला जाईल.

ज्या भारतीय कंपनीने एफडीआय योजनेखाली (ज्यासाठी कंपनीच्या खात्यात थेट प्रदान प्राप्त झाले आहे) आणि पोर्टफोलिओ गुंतवणूक योजनेखाली (ज्यासाठी भारतातील अधिकृत डिलर बँकेत एफआयआयने ठेवलेल्या खात्यातून प्रदान प्राप्त झाले आहे) एफआयआयला समभाग

निर्गमित केले आहेत तिने हे आकडे स्वतंत्रपणे प्रपत्र एफसी-जीपीआऱ च्या बाब क्र. ५ खाली कळवावे(निर्गमपश्चात समभाग धारणेची पध्दत) जेणेकरून तपशीलाचा संख्याशास्त्रीय संनियंत्रणाच्या हेतूने उचित प्रकारे मेळ घालता येईल.

परिरक्षक बँकेने सर्व व्यवहारांच्या बाबतीतील दैनिक विवरणपत्र (डेरिव्हेटिव्हज ट्रेड वगळता)फ्लॉपी सॉफ्ट कॉपीत एकूण मर्यादा क्षेत्रीय मर्यादा संविधिक मर्यादा यांच्या संनियंत्रणासाठी विहीत नमुन्यात थेट रिझर्व्ह बँकेला[६] सादर केले पाहिजे.

**अनिवासी भारतीयां(एनआरआयज़)द्वारे गुंतवणूक**

एनआरआयजना पीआयएस खाली मान्यताप्राप्त स्टॉक एक्स्चेंजेसमध्ये सूचीबद्ध भारतीय कंपन्यांच्या समभआगात गुंतवणूक करण्यास परवानगी आहे. एनआरआयज फीआयएस मार्गाखाली सूचीबद्ध भारतीय कंपन्यांच्या कर्जरोख्यांच्या प्रत्येक मालिकेच्या पूर्ण भरणा झालेल्या भांडवलाच्या पूर्ण भरणा झालेल्या मूल्याच्या ५ पर्यंत गुंतवणूक करू शकतात. सर्व एनआरआयजनी खरेदी केलेल्या समभागांचे परिवर्तनीय कर्जरोख्यांचे एकूण पूर्ण भरणा झालेले मूल्य कंपनीच्या पूर्ण भरणा झालेल्या भांडवलाच्या कंपनीच्या कर्जरोख्यांच्या प्रत्येक मालिकेच्या पूर्ण भरणा झालेल्या मूल्याच्या १० पेक्षा अधिक असू शकत नाही. भारतीय कंपनीच्या सर्वसाधारण सभेने जर तशा प्रभावाचा विशेष ठराव मंजूर केला तर ही १० ची मर्यादा २४ पर्यंत वाढविता येईल.

एनआरआय गुंतवणूकदाराने खरेदी केलेले समभाग ताब्यात घेतले पाहिजेत आणि विकलेल्या समभागांची पोचवणी केली पाहिजे.

प्रत्यावर्तन तत्त्वावरील समभाग आणि किंवा कर्जरोख्यांच्या खरेदीसाठी प्रदान सामान्य बंकिंग माध्यमातून विदेशी चलनाच्या अंतर्गत वित्तप्रेषणाद्वारे किंवा भारतात ठेवलेल्या एनआरइ एफसीएनआर खात्यात धारण केलेल्या निधीतून केले पाहिजे. समभाग जर अप्रत्यावर्तन तत्त्वावर खरेदी केले असतील तर, अनिवासी उक्त व्यतिरिक्त त्यांच्या एनआरओ खात्यात धारण केलेल्या निधीचा सुध्दा उपयोग करू शकतात.

एडी बँकेच्या संबोधित शाखेच्या लिंक कार्यालयाने रिझर्व्ह बँकेला[७], तिने हाती घेतलेल्या पीआयएस व्यवहाराच्या आधारावर दैनिक तत्त्वावर अहवाल दिला पाहिजे, असा अहवाल ऑन-लाइन किंवा फ्लॉपीवर आरबीआयला देता येईल.

६ मुख्य महाव्यवस्थापक, विदेशी विनिमय विभाग, भारतीय रिझर्व्ह बँक, विदेशी गुंतवणूक खंड, मध्यावर्ती कार्यालय, मध्यवर्ती कार्यालय बिल्डिंग, मुंबई ४०० ००१, याना संबोधित करून

७ मुख्य महाव्यवस्थापक, विदेशी विनिमय विभाग, भारतीय रिझर्व्ह बँक, विदेशी गुंतवणूक खंड, मध्यावर्ती कार्यालय, मध्यवर्ती कार्यालय बिल्डिंग, मुंबई ४०० ००१, याना संबोधित करून

**अनिवासींनी स्टॉक एक्स्चेंजवर पीआयएस खाली खरेदी केलेले समभाग खाजगी व्यवस्थेखाली किंवा देणगीच्या मार्गाने भारतातील किंवा भारताबाहेरील निवासी व्यक्तीला आरबीआयच्या पूर्वानुमतिशिवाय हस्तांतरित करता येणार नाहीत.**

अनिवासींना सेबीने वेळोवेळी मान्यता दिलेल्या एक्स्चेंज ट्रेड डेरिव्हेटिव्हज करारात, सेबीच्या मार्गदर्शक तत्त्वांच्या अधीन भारतात धारण केलेल्या रुपया निधीतून अप्रत्यवर्तन तत्त्वावर गुंतवणूक करण्यास परवानगी आहे.

**गुंतवणुकीच्या स्थितीचे आरबीआयद्वारा संनियंत्रण**

रिझर्व्ह बँक, परिरक्षक बँकांनी दैनिक तत्त्वावर प्रपत्र एलइसी(एफआयआय) आणि एलइसी(एनआरआय) मध्ये कळविलेल्या एफआयआय एनआरआयच्या सूचीबध्द कंपन्यातील गुंतवणुकीच्या स्थितीचे संनियंत्रण करते.

**सावधानता सूची**

जेव्हा योजनेखालील एफआयआयज एनआरआयज ची एकूण धारणा धोक्याची मर्यादा गाठते, जी लागू मर्यादेच्या २ खाली आहे, रिझर्व्ह बँक अधिकृत डिलर बँकांच्या सर्व संबोधित शाखांना

असे प्रतिपादन करणारी सूचना पाठवील कि विशिष्ट कंपनीच्या यापुढील अधिक समभागांच्या खरेदीसाठी रिझर्व्ह बँकेची पूर्वानुमति आवश्यक असेल. (रु. १००० कोटी आणि त्याहून अधिक पूर्ण भरणा झालेले भांडवल असणाऱ्या कंपन्यांसाठी, धोक्याची मर्यादा लागू मर्यादेच्या ०.५. ही असेल.) सावधानता सूचीत समाविष्ट केलेल्या कंपन्यांच्या समभागांच्या खरेदीसाठी आरबीआय प्रकरण-प्रकरणानुसार एफआयआयजना परवानगी देईल. हे प्रथम येणाऱ्यास प्रथम सेवा तत्त्वावर करण्यात येईल.

**बंदी सूची**

एफआयआयस एनआरआयजच्या समभागधारणेने एकदा एकूण मर्यादा क्षेत्रीय मर्यादा संविधिक मर्यादा गाठली कि, रिझर्व्ह बँक कंपनीला बंदी सूचीत ठेवील. एकदा कंपनी बंदी सूचीत गेली कि कोणतीही एफआयआय एनआरआय पोर्टफोलिओ गुंतवणूक योजनेखाली कंपनीचे समभाग खरेदी करू शकत नाही.

**समुद्रपार कॉर्पोरेट संस्थां (ओसीबीज) द्वारे गुंतवणूक**

नोव्हेंबर २९, २००१ पासून प्रभावाने ओसीबीजना पीआयएस खाली भारतात गुंतवणूक करण्यास परवानगी देण्यात येणार नाही. त्यापुढे, ज्या ओसीबीजानी आधीच पोर्टफोलिओ इन्व्हेस्ट्मेंट योजनेखाली गुंतवणूक केली आहे त्या असे समभाग/ परिवर्तनीय कर्जरोखे ते स्टॉक एक्स्चेंजवर विकले जाण्याच्या वेळेपर्यंत धारण करू शकतील. सप्टेंबर १६, २००३ पासून प्रभावाने ओसीबींची भारतातील गुंतवणूकदार वर्ग म्हणून मान्यता काढून घेण्यात आली आहे.

**खंड-३ः विदेशी व्हेंचर कॅपिटल गुंतवणुकी**
**व्हेन्चर कॅपिटल फंडसद्वारे गुंतवणूक**

एफइएमए अधीन आरबीआयची विशिष्ट परवानगी असलेल्या, सेबीकडील नोंदणीकृत फॉरिन व्हेन्चर कॅपिटल इन्व्हेस्टर (एफव्हिसीआय), इंडियन व्हेन्चर कॅपिटल अंडरटेकिंग (आयव्हीसीयु) किंवा व्हेन्चर कॅपिटल फंड (व्हीसीएफ) किंवा अशा आयव्हीसीएफनी आणलेल्या योजनात अशी व्हीसीएफ सुध्दा सेबीकडे नोंदणीकृत असण्याच्या अटीवर गुंतवणूक करू शकतात.
एका आयव्हीसीयूची व्याख्या अशी केली आहे कि भारतात अंगीकृत केलेली कंपनी जिचे समभाग भारतातील मान्यताप्राप्त स्टॉक एक्स्चेंजवर सूचीबध्द नाहीत आणि जी सेबीने विनिर्दिष्टीत केलेल्या निगेटीव सूचीतील कार्यात व्यस्त नाही. एका व्हीसीएफची व्याख्या अशी केलेली आहे कि, एखादा न्यास, बॉडी कॉर्पोरेटसहित एखाद्या कंपनीच्या स्वरुपात स्थापन केलेला आणि सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया(व्हेंचर कॅपिटल फंड) नियमने, १९९६ खाली नोंदणी केलेला निधी, ज्याच्यापाशी सदरहू नियमनात विनर्दिष्टीत केलेल्या पध्दतीने उभारलेल्या भांडवलाचा संकोष आहे आणि जो सदरहू नियमनानुसार व्हेंचर कॅपिटल उपक्रमात गुंतवणूक करतो.
एफव्हीसीआय एखाद्या आयव्हीसीयुचे किंवा व्हीसीएफचे समभाग/इक्विटी लिंकड इंस्ट्रुमेंटस/डेब्ट/डेब्ट इंस्ट्रुमेंटस, कर्जरोखे सार्वजनिक निर्गमाद्वारे किंवा व्हीसीएफनी स्थापन केलेल्या योजनेच्या/निधीच्या युनीटसमधील खाजगी ठेवीद्वारे खरेदी करू शकतात. मंजूरी देण्याच्या वेळी, आरबीआय एफव्हीसीआयला अधिकृत डिलर बँकेच्या नियुक्त शाखेत विदेशी चलन खाते किंवा रुपया खाते उघडण्यास परवानगी देऊ शकते.
समभाग, कर्जरोखे, युनीटस यांची खरेदी/विक्री खरेदीदार आणि विक्रेता/निर्गम करणारा यांना परस्परांना स्वीकार्य किंमतीला करता येईल.
अधिकृत डिलर एफव्हीसीआयजना एकूण आवक वित्तप्रेषणाच्या मर्यादेपर्यंत वायदे संरक्षण देऊ शकतात. जर एफव्हीसीाआयने काही गुंतवणुकीचे रोखीकरण करून कोणतेही वित्तप्रेषण केले असेल, पात्र संरक्षणातून गुंतवणुकीचा मूळ खर्च वजा केला पाहिजे.

**खंड-४ ः अन्य विदेशी गुंतवणूक**

**अनिवासीद्वारा अन्य प्रतिभूतींची खरेदी**

**१. अप्रत्यावर्तन तत्त्वावरः**

अनिवासी कोणत्याही मर्यादेविना एखाद्या भारतीय कंपनीने अप्रत्यवर्तन तत्त्वावर निर्गमित केलेले समभाग-परिवर्तनीय कर्जरोखे खरेदी करू शकतात. अशा खरेदीसाठी किंमतीची रक्कम विदेशातून सामान्य बँकिंग माध्यमातून आवक वित्तप्रेषणाद्वारे किंवा एडी बँकेकडे ठेवलेल्या एनआरइ एफसीएनआर एनआरओ खात्यात धारण केलेल्या निधीतून प्रदान केली जाईल. अनिवासी, कोणत्याही मर्यादेशिवाय, अप्रत्यावर्तन तत्त्वावर दिनांक सरकारी प्रतिभूती, राजकोष पत्रे, स्थानिक म्युच्युअल फंडाची युनीटस्, मनी मार्केट म्युच्युअल फंडाची युनीटस् सुध्दा खरेदी करू शकतात. भारत सरकारने अधिसूचित केले आहे कि पीपीएफसहित कोणत्याही अल्पबचत योजनात गुंतवणूक करण्यास अनिवासींना परवानगी नाही. अ-प्रत्यावर्तन तत्त्वावरील गुंतवणुकीच्या बाबतीत विक्रीचे उत्पन्न एनआरओ खात्यात जमा करण्यात येईल. योजनेखाली केलेली गुंतवणुकीची रक्कम आणि त्यावरील वृध्दी विदेशात प्रत्यावर्तित करण्यास परवानगी दिली जाणार नाही.

**२. प्रत्यावर्तन तत्त्वावरः**

एखादा अनिवासी भारतीय प्रत्यावर्तन तत्त्वावर, कोणत्याही मर्यादेशिवाय, सरकारी दिनांक प्रतिभूती,(धारक प्रतिभूतींव्यतिरिक्त) किंवा राजकोष पत्रे किंवा स्थानिक म्युच्युअल फंडाची युनीटस्, भारतातील सार्वजनिक उपक्रमाने (पीएसयू) निर्गमित केलेले रोखे आणि भारत सरकार निर्गुंतवणूक करीत असलेल्या सार्वजनिक उद्योगातील समभाग, खरेदी बोली आमंत्रित करणाऱ्या सूचनेत ठरवून दिलेल्या अटी आणि शर्तींनुसार असेल तर, खरेदी करू शकतो.

**एफायआयजद्वारा अन्य प्रतिभूतींची खरेदी**

विदेशी संस्थात्मक गुंतवणूकदार दिनांक सरकारी प्रतिभूती राजकोष पत्रे, भारतीय कंपन्यानी निर्गमित केलेले सूचीबद्ध अपिरवर्तनीय कर्जरोखे रोखे आणि स्थानिक म्युच्युअल फंडाची युनीटस् थेट किंवा असा प्रतिभूतींच्या निर्गमकाराकडून किंवा नोंदणी असलेल्या स्टाक ब्रोकरकडून भारतातील मान्यताप्राप्त स्टॉक एक्स्चेंजवर खरेदी करू शकतात. या खरेद्या सेबीने अधिसूचित केलेल्या मर्यादेच्या अधीन आहेत.

**एमडीबीज द्वारा गुंतवणूक**

एखादी मल्टीलॅटरल डेवलपमेंट बँक(एमडीबी) जिला भारत सरकारने भारतात रुपया रोखे आणण्यासाठी विशिष्ट परवानगी दिली आहे, सरकारी दिनांक प्रतिभूती खरेदी करू शकते.

**भारतातील बँकांनी निर्गमित केलेल्या टीयर १ आणि टीयर २ साधनात विदेशी गुंतवणूक**

सेबीकडे नोंदणीकृत असलेल्या एफआयआयजना आणि अनिवासी भारतीयांना भारतातील बँकांनी निर्गमित केलेल्या पर्पेच्युअल डेब्ट साधनात (टीयर १ भांडवल म्हणून समावेशास पात्र) आणि डेब्ट कॅपिटल साधनात (टीयर २ भांडवल म्हणून समवेशास पात्र) ना अंशदान करण्यास खालील अटींच्या अधीन परवानगी दिलेली आहे.

ए) सर्व एफआयआयजची पर्पेच्युअल डेब्ट साधनातील (टीयर १) गुंतवणूक प्रत्येक निर्गमाच्या एकूण ४९ टक्क्याच्या मर्यादबाहेर नसावी आणि प्रत्येक एफआयआयची गुंतवणूक प्रत्येक निर्गमाच्या १० टक्क्याच्या मर्यादेच्या बाहेर नसावी.

बी) सर्व अनिवासी भारतीयांची पर्पेच्युअल डेब्ट साधनातील (टीयर १) गुंतवणूक प्रत्येक निर्गमाच्या २४ टक्क्याच्या मर्यादेच्या बाहेर नसावी आणि एका अनिवासी भारतीयाची गुंतवणूक निर्गमाच्या १० टक्क्याच्या बाहेर नसावी.

सी) एफआयआयजद्वारा डेब्ट कॅपिटल साधनातील(टीयर २) गुंतवणूक सेबीने एफआयआयसाठी ठरवून दिलेल्या मर्यादेच्या आत असेल.

डी) अनिवासीद्वारा डेब्ट कॅपिटल साधनातील (टीयर २) गुंतवणूक अनिवासीद्वारा अन्य डेब्ट साधनातील गुंतवणुकीसाठी अस्तित्वात असलेल्या धोरणानुसार असेल.
निर्गमित करणाऱ्या बँकांनी निर्गम करण्याच्या वेळी वर ठरवून दिलेल्या अटींच्या पूर्ततेची खात्री करून घेणे आवश्यक आहे. बँकिंग प्रचालन आणि विकास विभाग (डीबीओडी), भारतीय रिझर्व्ह बँक यांनी वेळोवेळी अधिसूचित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांच्या पूर्ततेबाबतही त्यांनी खात्री करून घेणे आवश्यक आहे.
एफआयआयज अनिवासी भारतीयांकडून बँकानी टीयर १ भांडवलासाठी पात्र पर्पेच्युअल डेब्ट साधने म्हणून उभ्या केलल्या रकमांचा निर्गमनिहाय तपशील निर्गमाच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत विहीत नमुन्यात रिझर्व्ह बँकेला८ कळविणे आवश्यक आहे.
भारतीय रुपयात उभारलेल्या अप्पर टीयर २ साधनातील एफआयआयजची गुंतवणूक सेबीने कॉर्पोरेट डेब्ट साधनात विहीत केलेल्या मर्यादेच्या बाहेर असेल. तथापि, या साधनातील एफआयआयजची गुंतवणूक यूएस डॉलर ५०० दशलक्षाच्या वेगळ्या मर्यादेअधीन असेल.
एफआयआयज आणि अनिवासी भारतीयांद्वारा या साधनातील स्टॉक एक्स्चेंजच्या जागेतील दुय्यम बाजारातील विक्री खरेदी यांचा तपशील अनुक्रमे परिरक्षक आणि संबोधित बँकानी, एलइसी विवरणपत्राच्या सॉफ्ट कॉपीद्वारे भारतीय रिझर्व्ह बँकेला कळवायची आहे.

८ मुख्य महाव्यवस्थापक, विदेशी विनिमय विभाग, भारतीय रिझर्व्ह बँक, विदेशी गुंतवणूक खंड, मध्यवर्ती कार्यालय, मध्यवर्ती कार्यालय बिल्डिंग, मुंबई- ४०० ००१ यांना संबोधित करून

भाग २

**भारतात स्थावर मालमत्तेचे संपादन आणि हस्तांतरण**

| | |
|---|---|
| **भारतात स्थावर मालमत्तेचे संपादन आणि हस्तांतरण** | भारताबाहेरील निवासी व्यक्ती जी भारताची नागरिक (एनआरआय[९]) आहे, ती खरेदीच्या मार्गाने शेतीची जमीन लागवडीची मालमत्ता फार्म हाऊस या व्यातिरिक्त कोणतीही स्थावर मालमत्ता खरेदी करू शकतो. ती शेतीची जमीन लागवडीची मालमत्ता फार्म हाऊस या व्यतिरिक्त कोणतीही स्थावर मालमत्ता खालील व्यक्तींना हस्तांतरित करू शकते.<br>ए) भारताबाहेरील निवासी व्यक्ती जी भारताची नागरिक आहे किंवा<br>बी) मूळ भारतीय वंशाची भारताबाहेरील निवासी व्यक्ती किंवा<br>सी) भारतातील निवासी व्यक्ती<br>वारसाहक्काच्या मार्गाने संपादन केलेली शेतीची जमीन लागवडीची मालमत्ता फार्म हाऊस ती केवळ भारताची कायम स्वरुपी निवासी असलेल्या व्यक्तीलाच हस्तांतरित करू शकते.<br>मालमत्तेच्या संपादनासाठी प्रदान खालीलमधून करता येईलः<br>१) भारताबाहेरील कोणत्याही ठिकाणाहून सामान्य बँकिंग माध्यमातून आवक वित्तप्रेषणाद्वारे भारतात प्राप्त झालेला निधी किंवा<br>२) विदेशी चलन व्यवस्थापन, १९९९ च्या तरतूदी आणि भारतीय रिझर्व्ह बँकेने वेळोवेळी केलेल्या नियमनांनुसार ठेवलेल्या कोणत्याही अनिवासी खात्यात धारण केलेला निधी.<br>असे प्रदान प्रवासी धनादेश किंवा विदेशी चलनी नोटा किंवा वर नमूद केलेल्या व्यक्ती व अन्य कोणत्याही प्रकारे करता येणार नाही. |
| | भारताबाहेरील निवासी व्यक्ती जी मूळ भारतीय वंशाची (पीआयओ[१०]) आहे शेतीची जमीन लागवडीची मालमत्ता फार्म हाऊस या व्यतिरिक्त कोणतीही स्थावर मालमत्ता संपादित करू शकते. |

**९ हे स्पष्ट करण्यात येत आहे कि भारताबाहेरील निवासी व्याक्ति, जी भारताची नागरिक आहे तिला परिपत्रकाच्या या भागाच्या हेत्वर्थ एनआयआर मानले जाईल.**

**१० भारतीय वंशाची व्याक्ति म्हणजे अशी व्यक्ती (पाकिस्तान किंव बांगलादेश किंवा श्रीलंका किंवा अफगाणिस्तान किंवा चीन किंवा इराण किंवा नेपाळ किंवा भूतानची नागकिरिक नसलेली) जी,**

**(१) कोणत्याही वेळी भारतीय पारपत्र धारक असेल, किंवा**

**(२) जी किंवा जिचे वडील किंवा आजोबा भारतीय राज्यघटनेच्या किंवा नागरिकत्व अधिनियम, १९५५ (१९५५ चा ५७)च्या सुकृतामुळे भारताचे नागरिक होते.**

| | |
|---|---|
| | १. सामान्य बँकिंग माध्यमातून आवक वित्तप्रेषणाच्या मार्गाने प्राप्त झालेल्या निधीतून किंवा त्याच्या एनआरइ एफसीएनआर(बी) एनआरओ खात्यातून वजावटीद्वारे खरेदीच्या मार्गाने.<br>२. भारतातील निवासी व्यक्ती किंवा अनिवासी भारतीय किंवा मूळ भारतीय वंशाच्या व्यक्तीकडून देणगीच्या मार्गाने.<br>भारतातील निवासी व्यक्तीकडून किंवा लागू असलेल्या विदेशी चलन अधिनियमाच्या तरतूदीनुसार किंवा मालमत्ता संपादन करण्याच्या वेळच्या एफइएमए नियमनांच्या तरतूदीनुसार जिने अशी मालमत्ता संपादित केली |

| | |
|---|---|
| | असेल अशा भारताबाहेरील निवासी व्यक्तीकडून वारसाहक्कानं. |
| | एकादा पीआयओ शेतीची जमीन/लागवडीखालील मालमत्ता/फार्म हाऊस या व्यतिरिक्त भारतातील कोणतीही मालमत्ता हस्तांतरित करू शकतो<br>ए) भारतातील निवासी व्यक्तीला विक्रीच्या मार्गाने<br>बी) भारतातील निवासी व्यक्तीला किंवा अनिवासी भारतीयाला किंवा पीआयओला देणगीच्या मार्गाने.<br>एखादा पीआयओ भारतातील शेतीची जमीन लागवडीखालील मालमत्ता फार्म हाऊस भारताची नागरिक असलेल्या भारतातील निवासी व्यक्तीला विक्रीच्या किंवा देणगीच्या मार्गाने किंवा हस्तांतरित करू शकतो. |
| **विदेशी राजदूतावास मुत्सद्दी कॉन्सुलेट जनरल यांच्या द्वारे स्थावर मालमत्तेची खरेदी विक्री** | विदेशी राजदूतावास कॉन्सुलेट तसेच भारतातील मुत्सद्दी कार्मिक यांना भारतात शेतीची जमीन लागवडीची मालमत्ता फार्म हाऊस या व्यतिरिक्त स्थावर मालमत्तेची खरेदी विक्री करण्याची परवानगी आहे, जर (१) अशा खरेदी विक्रीसाठी भारत सरकारच्या विदेश व्यवहार मंत्रालयाकडून निपटारा प्राप्त केला, आणि (२) भारतातील स्थावर मालमत्तेसाठी किंमत सामान्य बँकिंग माध्यामातून विदेशातून वित्तप्रेषित केलेल्या निधीतून प्रदान केली. |
| **अनुज्ञेय कार्य करण्यासाठी स्थावर मालमत्तेचे संपादन** | जेथे जेथे आवश्यक तेथे आवश्यक त्या परवानग्या घेऊन स्थापन केलेल्या विदेशी कंपन्यांच्या भारतातील शाखा, कार्यालय किंवा अन्य व्यवसायाची ठिकाणे, भारतात स्थावर मालमत्ता, जी प्रासंगिक किंवा अशी कार्ये करण्यासाठी आवश्यक आहे, संपादित करण्यासाठी पात्र आहेत, जर लागू असलेल्या सर्व कायद्यांची, नियमांची, नियमनांची किंवा आदेशांची योग्य प्रकारे पूर्तता केली असेल. संबंधित एकक व्यक्तीने असा संपादनाच्या तारखेपासून नव्वद दिवसांच्या आत रिझर्व्ह बँकेकडे आयपीआय प्रपत्रात घोषणापत्र दाखल करणे आवश्यक आहे. अनिवासी सदरहू मालमत्ता तारणगहाण मार्गाने एखाद्या एडी बँकेकडे कोणत्याही ऋणासाठी सुरक्षा म्हणून हस्तांतरित करण्यास पात्र आहे. |
| **विक्रीच्या उत्पन्नाचे प्रत्यावर्तन** | भारतातील शेतीची जमीन लागवडीची मालमत्ता फार्म हाऊस व्यतिरिक्त अन्य स्थावर मालमत्तेच्या एनआरआय पीआयओ द्वारा विक्रीच्या प्रसंगात, अधिकृत डिलर विक्रीच्या उत्पन्नाच्या भारताबाहेरील प्रत्यावर्तनासाठी परवानगी देईल, जर,<br>१) विक्रेत्याने स्थावर मालमत्ता संपादन केली त्यावेळी लागू असलेल्या विदेशी चलन कायद्यांच्या तरतूदीनुसार किंवा एफइएमए नियमनांच्या अनुसार मालमत्ता संपादन केली असेल,<br>२) प्रत्यावर्तित करायची रक्कम (ए) स्थावर मालमत्तेच्या संपादनासाठी प्रदान केलेली रक्कम सामान्य बँकिंग माध्यमातून किंवा विदेशी चलन अनिवासी खात्यातील निधीतून प्राप्त झालेली रक्कम (बी) जेथे मालमत्तेच्या संपादनासाठी असे प्रदान अनिवासी बाह्य खात्यात धारण केलेल्या निधीतून केले असेल तर प्रदान केलेल्या रकमेपैकी, प्रदानाच्या तारखेला असल्याप्रमाणे विदेशी चलनाची सममूल्य,<br>यांच्या बाहेर नसेल.<br>३) निवासी मालमत्तेच्या बाबतीत, विक्रीच्या उत्पन्नाचे प्रत्यावर्तन अशा दोन मालमत्तांपेक्षा अधिक नाही इतके बंधन आहे. |

| | |
|---|---|
| | रुपया निधीतून खरेदी केलेल्या मालमत्तेच्या विक्रीच्या बाबतीत, एडीज एनआरआयजनी पीआयओनी त्यांच्या अनिवासी रुपया (एनआऱओ) खात्यात धारण केलेल्या शिल्लक निधीच्या प्रत्यावर्तनाच्या सुविधेसाठी वित्तप्रेषकाच्या वचनपत्राच्या आणि सीबीडीटीने विहीत केलेल्या नमुन्यातील चार्टर्ड अकाउंटंटचे प्रमाणपत्र हजर करण्याच्या अधीन प्रत्येक आर्थिक वर्षात यूएस डॉलर ५ दशलक्षापर्यंत परवानगी देऊ शकते. |
| **काही देशांच्या नागरिकांद्वारे भारतातील स्थावर मालमत्तेच्या संपादनासाठी किंवा हस्तांतरणासाठी पूर्वानुमति** | पाकिस्तान, बांगलादेश, श्रीलंका, अफगाणिस्तान, चीन, इराण, नेपाळ किंवा भूतान यांचे नागरिक असलेल्या कोणत्याही व्यक्तीने भारतात, पाच वर्षाच्या वर नसलेल्या भाडेपट्ट्याशिवाय अन्य प्रकारे, स्थावर मालमत्ता रिझर्व्ह बँकेच्या पूर्वानुमतिविना संपादित किंवा हस्तांतरित करू नये. भारताबाहेरील निवासी **अभारतीय वंशाच्या विदेशी नागरिकांना**, अशी मालमत्ता भारतातील निवासी असलेल्या व्यक्तीकडून वारसाहक्काने प्राप्त झालेली असल्याखेरीज, भारतात कोणतीही मालमत्ता संपादन करण्याची परवानगी नाही. आरबीआयच्या विशेष मंजूरीने वारसाहक्काच्या मार्गाने भारतात स्थावर मालमत्ता संपादन केलेल्या अभारतीय वंशाच्या विदेशी नागरिकांना आरबीआयच्या पूर्वानुमतिविना अशी मालमत्ता हस्तांतरित करता येणार नाही. |

**भाग ३**

**भारतात शाखा संपर्क प्रकल्प कार्यालये स्थापन करणे**

| | |
|---|---|
| **आरबीआयला अर्ज करणे** | भारताबाहेर अंगीकृत केलेल्या, आणि भारतात संपर्क शाखा कार्यालये स्थापन करू इच्छिणाऱ्या कंपन्यांना, एफएनसी-२ प्रपत्रात खालील कागदपत्रांसह भारतीय रिझर्व्ह बँकेला[11] अर्ज करावा लागेलः<br>• भारतीय राजदूतावासाने नोंदणीच्या देशातील नोटरी पब्लिकने अधिप्रमाणित केलेली अंगीकरणाच्या प्रमाणपत्राची नोंदणीची किंवा संस्थापनेचा समयलेख आणि नियमावली यांची इंग्लीश आवृत्ती.<br>• अर्जदार एककाचे अद्यतन लेखापरिक्षित ताळेबंद पत्रक. |
| **संपर्क कार्यालये** | भारताबाहेर अंगीकृत असलेल्या कंपन्या रिझर्व्ह बँकेच्या विशेष परवानगीने भारतात संपर्क कार्यालये स्थापन करू शकतात. संपर्क कार्यालय(प्रतिनिधी कार्यालय म्हणूनसुध्दा ज्ञात असलेले) केवळ संपर्काची कामे हाती घेऊ शकते म्हणजेच ते विदेशातील मुख्य कार्यालय आणि भारतातील पक्षांच्या मधील संवाद म्हणून काम करू शकते. त्याला भारतात कोणतही व्यावसायिक कार्य हाती घेण्यास किंवा भारतात उत्पन्न मिळविण्याची परवानगी नाही. अशा कार्यालयांचा खर्च संपूर्णपणे भारताबाहेरील मुख्य कार्यालयाकडून येणाऱ्या वित्तप्रेषणातून करण्यात आला पाहिजे. त्यामुळे अशा कार्यालयाची भूमिका, बाजारातील संभाव्य संधींची माहिती गोळा करणे आणि कंपनीच्या उत्पादनांची भारतातील संभाव्य ग्राहकांना माहिती देणे यापुरतीच मर्यादित राहील. अशी कार्यालये स्थापन करण्यासाठी आरंभी ३ वर्षाच्या कालावधीसाठी परवानगी देण्यात येते आणि आरबीआयच्या ज्या विभागीय कार्यालयाच्या अधिकारितेत कार्यालय स्थापन करण्यात आले आहे त्यांच्याकडून ती वेळोवेळी वाढविली जाते. संपर्क कार्यालय भारतात खालील कार्ये हाती घेऊ शकतेः<br>१) भारतात पालक कंपनीचे समूह कंपन्यांचे प्रतिनिधीत्व करणे<br>२) भारतातून भारतात निर्यात आयातीचे प्रवर्तन करणे |

११ भारतीय रिझर्व्ह बँक, विदेशी चलन विभाग, विदेशी गुंतवणूक खंड, मध्यवर्ती कार्यालय, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ यांना संबोधित करून

| | |
|---|---|
| | ३) पालक समूह कंपन्या आणि भारतातील कंपन्या यांच्या दरम्यान तांत्रिक आर्थिक सहयोगाचे प्रवर्तन करणे.<br>४) पालक कंपनी आणि भारतीय कंपन्या यांच्या दरम्यान संवाद वाहिनी म्हणून काम करणे.<br>संपर्क प्रतिनिधी कार्यालयांनी चार्टर्ड अकाउंटंटकडील वार्षिक कार्याचे प्रमाणपत्र आरबीआयच्या विभागीय कार्यालयाकडे दाखल केला पाहिजे. संपर्क कार्यालय केवळ रिझर्व्ह बँकेने परवानगी दिलेली कार्येच हाती घेत आहे याची खात्री करण्यासाठी प्राप्त केले जाते. |
| **विदेशी विमा कंपन्यांची संपर्क कार्यालये** | विदेशी विमा कंपन्या इन्शुरन्स रेग्युलेटरी अँड डेवलपेंट ॲथॉरिटीकडून मंजूरी प्राप्त केल्यानंतर भारतात संपर्क कार्यालये स्थापन करू शकतात. अशा विमा कंपन्याना भारतात कार्यालये स्थापन करण्यासाठी एफइएमए खाली परवानगी देण्यात आली आहे. |

| | |
|---|---|
| **शाखा कार्यालये** | भारताबाहेर अंगीकृत झालेल्या आणि उत्पादन किंवा व्यापारी कार्यात व्यस्त असणाऱ्या कंपन्यांना रिझर्व्ह बँकेच्या विशिष्ट मंजूरीने भारतात शाखा कार्यालये स्थापन करण्यास परवानगी दिलेली आहे. अशा शाखा कार्यालयांना पालक समूह कंपन्यांचे प्रतिनिधीत्व करण्यास आणि भारतात खालील कार्ये हाती घेण्यास परवानगी दिलेली आहे.<br>(१) मालाची आयात निर्यात<br>(२) व्यावसायिक आणि संमंत्रक सेवा पुरविणे.<br>(३) पालक कंपनीचा सहभाग असलेले संशोधन कार्य करणे.<br>(४) भारतीय कंपन्या आणि पालक किंवा समुद्रपार समूह कंपन्यांच्या दरम्यान सहयोगाचे प्रवर्तन करणे.<br>(५) पालक कंपनीचे भारतात प्रतिनिधीत्व करणे आणि भारतातील खरेदी विक्री एजन्ट म्हणून काम करणे.<br>(६) भारतात माहिती तंत्रज्ञान आणि सॉफ्टवेअर विकासाच्या सेवा पुरविणे.<br>(७) पालक समूह कंपन्यानी पुरविलेल्या उत्पादनाला तांत्रिक सहाय्य पुरविणे.<br>(८) विदेशी विमानसेवा नौकानयन कंपनी.<br>कोणत्याही स्वरुपातील किरकोळ व्यापारी कार्याला भारतातील शाखांना परवानगी नाही. |
| | शाखा कार्यालयाला प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कोणतेही उत्पादक, प्रक्रिया कार्य करण्यास परवानगी नाही. शाखा कार्यालयांना चार्टर्ड अकाउंटंटकडील वार्षिक कार्याचे प्रमाणपत्र आरबीआयला सादर केले पाहिजे. शाखा कार्यालयाना त्यांच्या स्वतःच्या वापरासाठी आणि अनुज्ञेय प्रासंगिक कार्ये करण्यासाठी मालमत्ता संपादन करण्यास परवानगी आहे, पण मालमत्ता भाडेपट्ट्याने किंवा भाड्याने देण्यास परवानगी नाही. परंतु, पाकिस्तान, बांगलादेश, श्रीलंका, अफगाणिस्तान, इराण किंवा चीन येथील एककांना शाखा कार्यालयासाठी सुद्धा स्थावर मालमत्ता संपादन करण्यास परवानगी नाही. अशा एककांना केवळ भाडेपट्ट्याने अशी मालमत्ता घेण्यास परवानगी आहे. नेपाळमधील एककांना भारतात केवळ संपर्क कार्यालये स्थापन करण्याची परवानगी आहे. शाखा कार्यालयांनी अर्जित केलेला नफा, लागू असलेल्या करांच्या प्रदानाच्या अधीन, भारतातून मुक्तपणे वित्तप्रेषित करता येईल. |
| **एसइझेडमधील शाखा कार्यालये** | विदेशी कंपन्याना विशेष आर्थिक क्षेत्रात(एसइझेडस) उत्पादक आणि सेवा कार्य हाती घेण्यासाठी शाखा युनीटस् स्थापन करण्यासाठी आरबीआयने सर्वसाधारण परवानगी दिलेली आहे. सर्वसाधारण परवानगी खालील अटींच्या अधीन आहेः<br>१) अशी युनीटस् अशा क्षेत्रात काम करीत आहेत जेथे १०० टक्के एफडीआयला परवानगी आहे,<br>२) अशी युनीटस् कंपन्या अधिनियम(कलम ५९२ ते ६०२) च्या भाग ९ ची पूर्तता करतात,<br>३) अशी युनीटस् स्वतंत्रपणे काम करतात,<br>४) व्यवसाय बंद करण्याच्या आणि बंद केल्यानंतरच्या उत्पन्नाच्या वित्तप्रेषणाच्या बाबतीत, शाखेने आरबीआयच्या मंजूरीच्या प्रतिव्यतिरिक्त खालील कार्यालय बंद करणे- परिच्छेदात नमूद केलेल्या कागदपत्रांसह विदेशी चलनात व्यवहार करणाऱ्या अधिकृत |

| | |
|---|---|
| | डिलरकडे जावे. |
| **बँकांच्या शाखा** | विदेशी बँकांना, त्यांनी जर बँकिंग रेग्युलेशन अधिनियम, १९४९ अधीन आवश्यक ती मंजूरी प्राप्त केलेली असेल तर, एफइएमए खाली आरबीआयच्या मंजुरीची गरज नाही. |
| **प्रकल्प कार्यालये** | रिझर्व्ह बँकेने विदेशी कंपन्याना भारतात प्रकल्प कार्यालये स्थापन करण्यास सर्वसाधारण परवानगी दिलेली आहे, जर भारतातील कंपनीने भारतात प्रकल्पाच्या कार्यवाहीसाठी कंत्राट दिले असेल तर, आणि<br>(ए) प्रकल्पाला थेट विदेशातून आवक वित्तप्रेषणातून निधी पुरवला जात असेल,<br>किंवा<br>(बी) प्रकल्पाला द्विपक्षीय किंवा बहुपक्षीय आंतरराष्ट्रीय एजन्सीकडून निधीचा पुरवठा होत असेल, किंवा<br>(सी) प्रकल्प उचित प्राधीकरणाद्वारे मान्य करण्यात आला असेल, किंवा<br>(डी) भारतातील कंत्राट देणाऱ्या कंपनीला किंवा एककाला सार्वजनिक वित्तीय संस्था किंवा भारतातील बँकेने मुदत कर्ज मंजूर केले असेल.<br>तथापि उक्त निकष पूर्ण होत नसतील तर, विदेशी एककाने मंजूरीसाठी आरबीयकडे जाणे आवश्यक असेल. |
| **विदेशी चलन खाते उघडणे** | भारतातील प्रकल्प कार्यालयांसाठी एडीज बिनव्याजी विदेशी चलन खाते कालील अटींच्या अधीन उघडू शकतातः<br>ए) संबंधित प्रकल्प मंजूरी प्राधीकरणाची आवश्यक ती मंजूरी असलेले भारतातील प्रकल्प कार्यालय, रिझर्व्ह बँकेच्या सर्वसाधारण विशिष्ट परवानगीने उघडलेले असेल,<br>बी) ज्या कंत्राटाखाली प्रकल्प मंजूर करण्यात आला आहे, त्यात विदेशी चलनातील प्रदानासाठी विशिष्ट तरतूद असेल,<br>सी) प्रत्येक प्रकल्पाचे केवळ एक विदेशी चलन खाते असेल,<br>डी) खात्यातूल अनुज्ञेय वजावटी या प्रकल्पाशी संबधित खर्चाच्या असतील आणि जमा प्रकल्प मंजूरी प्राधीकरणाकडून प्राप्त झालेल्या विदेशी चलनाच्या पावत्या आणि विदेशातील पालक समूह कंपनी किंवा द्विपक्षीय बहुपक्षीय आंतरराष्ट्रीय वित्तीय एजन्सीकडून वित्तप्रेषणे असतील.<br>इ) केवळ मान्यताप्राप्त वजावटी आणि जमानाच विदेशी चलन खात्यात परवानगी दिली जात आहे याची खात्री करण्याची जबाबदारी संपूर्णपणे एडीच्या संबधित शाखेवर आहे. त्याशिवाय, खाते एडी बँकांच्या समवर्ती लेखापरिक्षकांच्या १०० टक्के छाननीला पात्र असेल.<br>एफ) विदेशी चलन खाते प्रकल्प पूर्ण झाल्यावर बंद केले पाहिजे. |
| **भारतातील प्रकल्प कार्यालयांद्वारे असतत वित्तप्रेषणे** | प्रकल्प बंद होणे पूर्ण होणे प्रलंबित असताना एडी शाखा प्रकल्प कार्यालयांद्वारे असतत वित्तप्रेषणाला, व्यवहाराच्या प्रमाणिकपणाबाबत त्यांचे समाधान झाले असेल आणि खालीलच्या अधीन परवानगी देऊ शकतीलः<br>ए) आयकर वगैरेसह भारतातील दायित्वांसाठी पुरेशी तरतूद करण्यात आलेली आहे असा अर्थाचे लेखापरिक्षकांचे चार्टर्ड अकाउंटंटचे प्रमाणपत्र प्रकल्प कार्यालयाने सादर केले.<br>बी) प्रकल्प कार्यालयाचे असे वचनपत्र कि वित्तप्रेषण कोणत्याही प्रकारे भारतातीतल प्रकल्पाच्या पूर्ततेला प्रभावित करणार नाही आणि भारतातील दायित्वांच्या पूर्ततेतील कोणतीही तूट विदेशातून आवक वित्तप्रेषणाद्वारे भरून |

| | |
|---|---|
| | काढली जाईल.<br>निधीच्या आंतरप्रकल्प हस्तांतरणासाठी रिझर्व्ह बँकेच्या ज्या विभागीय कार्यालयाच्या अधिकारितेत प्रकल्प कार्यालय स्थित असेल त्याची पूर्वनुमति आवश्यक असेल. |
| **सर्वसाधारण अटी** | विदेशात स्थापन झालेल्या भागीदारी मालकीच्या कन्सर्नसना भारतात शाखा संपर्क कार्यालये स्थापन करण्याची परनवानगी नाही.<br>शाखा संपर्क प्रकल्प कार्यालयांना आरबीआयमध्ये बिनव्याजी चालू खाती उघडण्यास परवानगी आहे. अशा कार्यालयांनी खाती उघडण्यासाठी त्यांच्या अधिकृत डिलरकडे जाणे आवश्यक आहे.<br>संपर्क कार्यालयांच्या मत्तेचे उपकंपन्यांकडे किंवा अन्य संपर्क शाखा कार्यालयांकडे हस्तांतरण आरबीआयच्या मध्यवर्ती कार्यालयाच्या विशिष्ट परवानगीने अनुज्ञेय आहे. |
| **कार्यालये बंद करणे** | संपर्क कार्यालये बंद करण्याच्या वेळी, कंपनीने खालीलप्रमाणे कागदपत्रांसह संबंधित विभागीय कार्यालयाकडे गेले पाहिजे.ः<br>• भारतात कार्यालय स्थापन करण्यासाठी रिझर्व्ह बँकेच्या परवानगीची प्रत,<br>• लेखापरिक्षकाचे प्रमाणपत्र ज्यात,-<br>• वित्तप्रेषणीय रक्कम कशी काढली ती पद्धत दर्शविलेली असावी आणि तिला पुष्टीकारक अर्जदाराच्या मत्तेचे आणि दायित्वांचे विवरणपत्र जोडलेले असावे आणि मत्तेच्या विल्हेवाटीची पद्धत दर्शविलेली असावी,<br>• शाखेच्या कार्यालयाच्या कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान आणि अन्य फायदे यासह भारतातील सर्व दायित्वे पूर्ण केलेली आहेत किंा त्यासाठी पुरेशी तरतूद केली आहे याची पुष्टी केलेली असावी,<br>• भारताबाहेरच्या स्रोतातून अर्जित कोणतेही उत्पन्न (निर्यातीच्या उत्पन्नासह) भारतात प्रत्यावर्तित करायचे राहिलेले नाही याची पुष्टी केलेली असावी,<br>• -वित्तप्रेषणासाठी आयकर अधिकाऱ्यांकडील ना-हरकत किंवा कर निपटारा प्रमाणपत्र,<br>• -अर्जादाराकडून भारतातील कोणत्याही न्यायालयात कोणतीही कायदेशीर कारवाई प्रलंबित नाही आणि वित्तप्रेषणात कोणताही कायदेशीर अडथळा नाही याची पुष्टी.<br>एकदा आरओची मंजूरी प्राप्त झाली कि एडी अधिकांशाच्या वित्तपेरषणासाठी परवानगी देऊ शकतील.<br>शाखा कार्यालय बंद करताना, एककांना मंजूरीसाठी उक्त नमूद केल्याप्रमाणेच कागदपत्रांसह मध्यवर्ती कार्यालयात जावे लागेल. |

भाग - ४

**भागीदारी मालकीच्या कंन्सर्नमध्ये गुंतवणूक**

| | |
|---|---|
| **भागीदारी मालकीच्या कंन्सर्नमध्ये गुंतवणूक** | एखादा अनिवासी भारतीय[१२] किंवा भारताबाहेरील निवासी मूळ भारतीय वंशाची व्यक्ती[१३] भारतातील फर्ममध्ये किंवा मालकीच्या कन्सर्न मध्ये भांडवलाल अंशदानाच्या मार्गाने अप्रत्यावर्तन तत्त्वावर गुंतवणूक करू शकते, जर,<br>१) रक्कम आवक वित्तप्रेषणातून किंवा एडी बँकेकडे ठेवलेल्या एनआरइ एफसीएनआर एनआरओ खात्यातून प्रदान केली असेल.<br>२) फर्म किंवा मालकीची कन्सर्न कोणत्याही शेतीविषयक लागवडीच्या किंवा रियल इस्टेट व्यवसायात (म्हणजेच फायदा मिळविण्याच्या किंवा त्यातून उत्पन्न मिळविण्याच्या हेतूने जमीन किंवा स्थावर मालमत्तेचे व्यवहार करणे यासह) किंवा मुद्रित माध्यमात व्यस्त नसेल.<br>३) गुंतवलेली रक्कम भारताबाहेर प्रत्यावर्तनासाठी पात्र नसावी. |
| **प्रत्यावर्तनाच्या लाभासह गुंतवणूक** | एनआरएयज पीआयओ प्रत्यावर्तनाच्या लाभासह एकमेव मालकीच्या कन्सर्नस भागीदारी फर्ममधील गुंतवणुकीसाठी रिझर्व्ह बँकेची पूर्वानुमति मागू शकतो. भारत सरकारशी संमंत्रणा करून अर्जावर निर्णय घेतला जाईल. |
| **एनआरआयज पीआयओ खेरीज अन्य अनिवासीद्वारा गुंतवणूक** | एनआरआयज/पीआयओ यांच्या खेरीज भारतातबाहेरील निवासी व्यक्ती भारतातील फर्म किंवा मालकीची कन्सर्न किंवा व्यक्तींची कोणतीही संघटना यांच्या भांडवलाला अंशदानाच्या मार्गाने गुंतवणूक करण्यासाठी रिझर्व्ह बँकेला अर्ज करून पूर्वानुमति मागू शकते. भारत सरकारशी संमंत्रणा करून अर्जावर निर्णय घेतला जाईल. |
| **बंधने** | कोणत्याहि शेतीविषयक लागवडीच्या किंवा रियल इस्टेट व्यवसायात (म्हणजेच फायदा मिळविण्याच्या किंवा त्यातून उत्पन्न मिळविण्याच्या हेतूने जमीन किंवा स्थावर मालमत्तेचे व्यवहार करणे यासह) किंवा मुद्रित माध्यमात व्यस्त असलेल्या फर्म किंवा मालकीच्या कन्सर्न मध्ये गुंतवणूक करायला एखाद्या एनआरआय किंवा पीआयओला परवानगी नाही. |

**१२ अनिवासी भारतीय(एनआरआय) म्हणजे भारताबाहेरील निवासी व्यक्ती जी भारताची नागरिक किंवा मूळ भारतीय वंशाची आहे,**

**१३ मूळ भारतीय वंशाच्या व्यक्ती म्हणजे बांगलादेश किंवा पाकिस्तान किंवा श्रीलका याव्यतिरिक्त कोणत्याही देशाचा नागरिक, जर**

**(ए) त्याने कोणत्याही वेळी भारतीय पारपत्र धारण केलेल असेल, किंवा**

**(बी) तो किंवा त्याच्या पालकांपैकी कोणीहि किंवा आजी-आजोबांपैकी कोणीही भारतीय राज्यघटनेमुळे किंवा नागरिकत्व अधिनियम, १९५५ (१९५५ चा ५७) मुळे भारताचे नागरिक होते.**

**सी) व्यक्ती भारतीय नागरिकाची किंवा उपकलम (ए) किंवा (बी) मध्ये संदर्भित व्यक्तीचा जोडीदार असेल.**

**परिशिष्ट १**

**एफडीआय धोरणाखाली मनाई/निर्बंध असलेली क्षेत्रे/कार्ये**

**(अ) भारताबाहेरील निवासी व्यक्तिंकडून गुंतवणुकीसाठी आरबीआयचा स्वयंचलित मार्ग ज्या कार्यांसाठी उपलब्ध नाही त्यांची सूची**

१. पेट्रोलियम क्षेत्र (खाजगी क्षेत्रातील तेल शुध्दीकरण वगळून), नैसर्गिक वायू/एलएनजी पाइपलाइन्स
२. पायाभूत सुविधा आणि सेवा क्षेत्रात गुंतवणूक करणाऱ्या कंपन्या
३. संरक्षण आणि लष्करी उद्योग
४. अणू खनिजे
५. मुद्रित माध्यमे
६. प्रसारण
७. टपाल सेवा
८. कुरियर सेवा
९. उपग्रहांची स्थापना आणि प्रचालन
१०. एकात्मिक नगरांचा विकास
११. चहा क्षेत्र
१२. मत्ता पुनरुभारणी कंपन्या

**(ब) एफडीआयला मनाई आहे अशा कार्यांची किंवा बाबींची सूची**

१. किरकोळ व्यापार
२. अणू उर्जा
३. लॉटरी व्यवसाय
४. जुगार आणि पैजा लावणे
५. गृहनिर्माण आणि रियल इस्टेट व्यवसाय
६. शेती (फुलोत्पादन, बागायत, बियाण्यांचा विकास, पशुपालन, मत्स्यसंवर्धन आणि भाज्यांची लागवड, नियंत्रित परिस्थितीअधीन आळंबी (मश्रूम्स) वगैरे आणि शेती आणि संलग्न क्षेत्राशी संबंधित सेवा वगळून) आणि लागवड **(चहा मळ्यांव्यतिरिक्त)**

**परिशिष्ट - २**

**भारताबाहेरील निवासी व्यक्तीद्वारा गुंतवणुकीवर क्षेत्रीय मर्यादा**

| **क्षेत्रीय** | **गुंतवणूक मर्यादा** | **कार्य/बाबी/अटींचे वर्णन** |
|---|---|---|
| १. खाजगी क्षेत्र बँकिंग | ७४ % | आरबीआयने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांच्या अधीन |
| २. नॉन-बँकिंग वित्तीय कंपन्या | १००% | खालील १९ एनबीएफसी कार्यात एफडीआय/एनआरआय गुंतवणुकीला खाली निर्देशिल्याप्रमाणे स्तरावर परवानगी असेलः<br>**अ) समाविष्ट कार्य**<br>१. मर्चंट बँकिंग<br>२. अंडररायटिंग<br>३. पोर्टफोलिओ मॅनेजमेंट सर्व्हिसेस<br>४. इंन्व्हेस्टमेंट कंसलटंट सर्व्हिसेस<br>५. फाइनॅन्शियल कंसल्टंन्सी<br>६. स्टॉक-ब्रोकिंग<br>७. मत्ता व्यवस्थापन<br>८. व्हेन्चर कॅपिटल<br>९. कस्टोडियल सर्व्हिसेस<br>१०.फॅक्टरिंग<br>११.क्रेडिट रेफरन्स एजन्सीज<br>१२.क्रेडिट रेटिंग एजन्सीज<br>१३.लिझिंग अँड फाईनॅन्स<br>१४.हाऊसिंग फाईनॅन्स<br>१५.फॉरेक्स ब्रोकिंग<br>१६.क्रेडिट कार्ड व्यवसाय<br>१७.मनी चेंजिंग व्यवसाय<br>१८.मायक्रो क्रेडिट<br>१९. ग्रामीण क्रेडिट<br><br>**ब) निधीआधारित एनबीएफसीजसाठी किमान भांडवलीकरणाचे नियम**<br><br>१) ५१% पर्यंत एफडीआयसाठी, यूएस डॉलर ०.५ दशलक्ष ताबडतोब आणायचे |

२) ५१ % च्या वर आणि ७५ % पर्यंत एफडीआयसाठी, युएस डॉलर ५ दशलक्ष ताबडतोब आणायचे

३) एफडीआय जर ७५%च्या वर आणि १०० % पर्यंत असेल तर, यूएस डॉलर ५० दशलक्ष ज्यापैकी डॉलर ७.५ दशलक्ष ताबडतोब आणायचे आणि बाकी २४ महिन्यात

**क) नॉन-फंड आधारित कार्यांसाठी किमान भांडवलीकरणाचे नियम**

विदेशी गुंतवणूक असलेल्या नॉन-फंड आधारित एनबीएफसीजच्या बाबतीत यूएस डॉलर ०.५ दशलक्ष चा किमान भांडवलीकरणाचा नियम लागू आहे.

ड) विदेशी गुंतवणूकदार १००%प्रचालनीय उपकंपन्या भारतीय एककाना त्यांच्या किमान २५ टक्के निर्गुंतवणूकीच्या अटीशिवाय, उक्त ब (३) प्रमाणे यूएस डॉलर ५० दशलक्ष आणण्याच्या अधीन स्थापन करू शकतात. (अतिरिक्त भांडवल आणल्याशिवाय प्रचालन करायच्या उपकंपन्यांच्या संख्येवरील कोणत्याहि निर्बंधांशिवाय).

इ) संयुक्त साहसांचे प्रचालन करणाऱ्या ज्या एनबीएफसीमध्ये ७५%किंवा ७५%हून कमी विदेशी गुंतवणूक आहे त्यांना अन्य एनबीएफसी कार्ये हाती घेण्यासाठी, उपकंपन्यांनी सुध्दा लागू असलेल्या किमान भांडवलाची म्हणजेच उक्त (ब)(१) आणि (ब) (२) पूर्तता करण्याच्या अधीन उपकंपन्या स्थापन करायला परवानगी देण्यात येईल.

फ) भारतीय रिझर्व्ह बॅंकेच्या मार्गदर्शक तत्त्वांच्या पूर्ततेच्या अधीन एनबीएफसी क्षेत्रातील एफडीआय स्वयंचलित मार्गावर घेण्यात येईल. या संबंधात आरबीआय उचित मार्गदर्शक तत्त्वे निर्गमित करील.

| | | |
|---|---|---|
| ३. विमा | २६% | विमा नियामक आणि विकास प्राधीकरण (आयआरडीए) कडून परवाना प्राप्त करण्याधीन विमा क्षेत्रात २६%एफडीआय स्वयंचलित मार्गाने अनुज्ञेय आहे. |
| ४. दूरसंचार | ४९% | १) बेसिक, सेल्युलर, व्हॅल्यु ॲडेड सर्व्हिसेस, आणि उपग्रहाद्वारे ग्लोबल मोबाईल पर्सनल कम्युनिकेशन्स मध्ये, परवाना आणि सुरक्षा आवश्यकता आणि |

कंपन्यानी (ज्या गुंतवणूक करीत आहेत अणि ज्यांच्यात गुंतवणूक केली जात आहे) विदेशी समभागावरील मर्यादेसाठी परवान्याच्या अटी आणि हस्तांतरणासाठी बंधित कालावधीच्या आणि समभाग वाढविण्यासाठी आणि अन्य परवान्याच्या तरतुदींच्या पूर्ततेच्या अधीन एफडीआय ४९%पर्यंत मर्यादित आहे.

२) गेटवेज सहित आयएसपी, रेडिओ पेजिंग आणि एन्ड-टू-एन्ड बँडविड्थ, ४९%टक्क्यांच्या पुढील एफडीआयसाठी आवश्यक असलेल्या सरकारी मंजूरीसहित एफडीआय ७४%पर्यंत मर्यादित आहे. या सेवा परवान्याच्या आणि सुरक्षेच्या आवश्यकतांच्या अधीन असतील.

३) उत्पादक कार्यांसाठी कोणतीहि समभागांची मर्यादा लागू नाही.

४) दूरसंचार क्षेत्रातील खालील कार्यांसाठी १००%एफडीआय अनुज्ञेय आहे.

अ) गेटवेज न पुरविणारे आयएसपी(उपग्रह आणि समुद्राखालील अशा दोन्ही केबल्ससाठी)

ब) डार्क फायबर पुरविणारे इंन्फ्रास्ट्रक्चर प्रोव्हाइडर्स (आयपी प्रवर्ग १)

क) इलेक्ट्रॉनिक मेल, आणि

ड) व्हॉईस मेल

उक्त बाबी खालील अटींच्या अधीन असतीलः

अ) अशा कंपन्या जर जगाच्या अन्य भागात सूचीबध्द असतील तर त्या त्यांच्या समभागांच्या २६ % समभागांची, ५ वर्षात भारतीय जनतेच्या नावे निर्गुंतवणूक करतील या अटीच्या अधीन १००%एफडीआय अनुज्ञेय आहे.

ब) जेथे जेथे आवश्यक असेल तेथे उक्त सेवा परवाना आणि सुरक्षेच्या आवश्यकतांच्या अधीन

| | | |
|---|---|---|
| | | असतील.<br><br>क) ४९ % वरील एफडीआयचे प्रस्ताव एफआयपीबी प्रत्येक प्रकरणानुसार विचारात घेईल. |
| ५. (१) पेट्रोलियम शुध्दीकरण (खाजगी क्षेत्र) | १०० % | खाजगी भारतीय कंपन्यांच्या बाबतीत १०० % पर्यंत एफडीआय अनुज्ञेय आहे. |
| (२) पेट्रोलियम उत्पादनांचे विपणन | १००% | विद्यमान क्षेत्रीय धोरण आणि ताल-विपणन क्षेत्रातील नियामक चौकट यांच्या अधीन |
| (३) लघु आणि मध्यम अशा दोन्ही आकाराच्या क्षेत्रात तेल समन्वेषण | १००% | खालील विषयात सरकारच्या खाजगी सहभागाच्या बाबतीतील धोरणाच्या अधीन आणि प्रमाणे,<br><br>अ) तेलाचे समन्वेषण आणि<br><br>ब) राष्ट्रीय तेल कंपन्यांची संशोधित क्षेत्रे |
| (४)पेट्रोलियम उत्पादने पाइपलाइन्स | १००% | त्यासंबंधातील सरकारी धोरणे आणि नियमनांचा अधीन |
| ६. गृहनिर्माण आणि रियल इस्टेट | १००% | केवळ खाली सुचीबध्द केलेल्या क्षेत्रात एनआरआयजना गुंतवणुकीसाठी परवानगीः<br>अ) सेवाकृत भूखंडांचा विकास आणि बांधलेल्या बांधीव जागांचे बांधकाम<br><br>ब) व्यवसाय केंद्रे आणि कार्यालये यांच्यासह व्यावसायिक आणि निवासी जागांचे बांधकाम समाविष्ट असणाऱ्या रियल इस्टेटमध्ये गुंतवणूक<br><br>क) नगरांचा विकास<br><br>ड) रस्ते आणि पूल अशा दोन्हींचा समावेश असणाऱ्या शहर आणि विभागीय स्तरावरील पायाभूत सुविधा<br><br>इ) बांधकाम साहित्याच्या निर्मितीत गुंतवणूक<br><br>फ) उक्त (अ) ते (इ) मध्ये सहभागी साहसात गुंतवणूक |

| | |
|---|---|
| | ग) एनबीएफसी म्हणून एफडीआयसाठी खुल्या असलेल्या गृहनिर्माण वित्तसंस्थांमध्ये गुंतवणूक |
| ७. कोळसा आणि लिग्नाइट | १) उर्जा प्रकल्प त्याचप्रमाणे कॅप्टिव उपयोगासाठी कोळसा आणि लिग्नाइट खाणी स्थापन करणाऱ्या किंवा प्रचलन करणाऱ्या खाजगी कंपन्याना १०० पर्यंत एफडीआय अनुज्ञेय आहे.<br><br>२) कोळसा प्रक्रिया संयंत्रांच्या स्थापनेसाठी, कंपनी खाणीतून कोळसा काढणार नाही आणि तिच्या कोळसा प्रक्रिया संयंत्रातील वॉश्ड कोळसा किंवा साईझ्ड कोळसा खुल्या बाजारात विकणार नाही आणि ज्या पार्टीज वॉशिंग किंवा साइझिंगसाठी कोळसा प्रक्रिया संयंत्राना कच्चा कोळसा पुरवितात त्यांना वॉश्ड आणि साईज्ड कोळसा पुरवील या अटीच्या अधीन १०० टक्के एफडीआय अनुज्ञेय आहे.<br>३) कॅप्टीव उपयोगासाठी कोळसा किंवा लिग्नाइट खाणीतून काढण्यासाठी किंवा समन्वेषणासाठी<br>७४ % पर्यंत एफडीआय अनुज्ञेय आहे.<br><br>४) उक्त सर्व प्रकरणात, अशी गुंतवणूक पीएसयुच्या समभागाच्या ४९ % च्या बाहेर जाणार नाही या अटीच्या अधीन स्वयंचलित मार्गाखाली ५० टक्क्यांपर्यंत एफडीआय अनुज्ञेय आहे. |
| ८. व्हेंचर कॅपिटल फंड (व्हीसीएफ) आणि व्हेंचर कॅपिटल कंपनी (व्हीसीसी) | ऑफशोअर व्हेंचर कॅपीटल फंडस/कंपन्याना केवळ सेबी नियमनांच्या आणि विशिष्ट क्षेत्रासाठी असलेल्या एफडीआयवरील मर्यादेच्या अधीन स्थानिक व्हेंचर कॅपिटल उपक्रमात तसेच अन्य कंपन्यात स्वयंचलित मार्गाने गुंतवणूक करण्यास परवानगी आहे. |
| ९. व्यापार | ५१ % टक्क्यांपर्यंत एफडीआय असलेल्या व्यापाराला स्वयंचलित मार्गाखाली परवानगी आहे जर तो मुख्यतः निर्यातीसाठी असेल, आणि उपक्रम हा निर्यात गृह/व्यापार गृह/सुपर ट्रेडिंग हाऊस/स्टार ट्रेडींग हाऊस असेल. तथापि, एफआयपीबी मार्गाखालीः<br><br>१) खालील कार्यांसाठी व्यापारी कंपन्यांच्या बाबतीत |

१००%एफडीआय अनुज्ञेय आहेः

अ) निर्यात;

ब) निर्यातीसह मोठी आयात/एक्स-बाँडेड वेअरहाऊस विक्री;

क) कॅश अँड कॅरी घाऊक व्यापार;

ड) अन्य माल आणि सेवांची आयात जर किमान ७५ % त्याच गटाच्या प्रापण आणि विक्रीसाठी असेल आणि तिसऱ्या पक्षाच्या उपयोगासाठी किंवा पुढे हस्तांतरणासाठी/वितरणासाठी/विक्रीसाठी नसेल.

२) एक्झिम धोरणाच्या तरतुदींच्या अधीन खालील प्रकारचा व्यापारहि अनुज्ञेय आहे.

अ) कंपन्याना विक्री पश्चात सेवा पुरविण्यासाठी (जी प्रत्यक्ष व्यापार नाही)

ब) जेव्हींच्या उत्पादनांच्या घाऊक स्तरावरील स्थानिक व्यापारासाठी अशा व्यापारी कंपन्याना परवानगी आहे ज्या भारतात ज्या जेव्हींमधील समभागात त्यांचा सहभाग आहे त्यांच्या वतीने उत्पादित उत्पादनांचे विपणन करू इच्छितात.

क) उच्च-तांत्रिक बाबींचा/विशेष विक्रीपश्चात सेवेची गरज असणाऱ्या बाबींचा व्यापार

ड) सामाजिक क्षेत्रासाठी बाबींचा व्यापार

इ) उच्च-तांत्रिक, वैद्यकीय आणि निदानविषयक बाबींचा व्यापार

फ) लघु उद्योग क्षेत्रातून प्राप्त केलेल्या बाबींचा व्यापार, ज्याखाली पुरविलेले तंत्रज्ञान आणि ठरवून दिलेली गुणात्मक विनिर्दिष्टे, यांच्या आधारावर कंपनी तिच्या ब्रँड नावाखाली त्या बाबींचे विपणन करू शकते

| | | |
|---|---|---|
| | | ग) स्थानिक स्रोतातून निर्यातीसाठी उत्पादने प्राप्त करणे<br><br>ह) ज्यांच्या निर्मितीसाठी कंपनीकडे मान्यता आहे अशा बाबींचे चाचणी विपणन, जर अशी चाचणी विपणनाची सुविधा दोन वर्षांच्या कालावधीसाठी असेल, आणि निर्मिती सुविधा स्थापन करण्यासाठी चाचणी विपणनाबरोबरच गुंतवणुकीला सुरुवात केली जाईल.<br><br>य) इ-कॉमर्स कार्यासाठी, अशा कंपन्या जगातील अन्य भागात सूचीबध्द असतील तर त्यानी ५ वर्षात त्यांचे २५ टक्के समभाग भारतीय जनतेच्या नावे करण्याच्या अटीच्या अधीन, १००%पर्यंत एफडीआयला परवानगी असेल. **अशा कंपन्या केवळ बिझिनेस टु बिझिनेस (बी२बी) इ-कॉमर्स मध्ये कार्यरत राहतील आणि किरकोळ व्यापारात नाही.** |
| १०. उर्जा | १०० % | एफडीआय अनुज्ञेय अणु भट्टी विद्युत संयंत्रांव्यतिरिक्त विद्युत निर्मिती, पारेषण आणि वितरणाशी संबंधित प्रकल्पांच्या बाबतीत १०० % एफडीआयला परवानगी आहे. प्रकल्प खर्च आणि थेट विदेशी गुंतवणुकीच्या राशीवर कोणतीहि मर्यादा नाही. |
| ११. ड्रग्स आणि फार्मास्युटीकल्स | १००% | ड्रग्स आणि फार्मास्युटीकल्स यांच्या निर्मितीसाठी, कार्य ‘सक्तीचा परवाना आकर्षित करीत नसेल आणि त्यात रिकॉम्बिनंट डीएनए तंत्रज्ञान आणि विशिष्ट पेशी/पेशीबंध लक्ष्यीत संयुगांचा उपयोग करावा लागत नसेल तर १००%एफडीआयला परवानगी आहे. परवानायोग्य ड्रग्स आणि फार्मास्युटीकल्स आणि रिकॉम्बिनंट डीएनए तंत्रज्ञान आणि विशिष्ट पेशी/पेशीबंध लक्ष्यीत संयुगांद्वारे निर्मित बल्क ड्रग्सच्या निर्मितीसाठी एफडीआय प्रस्तावाना सरकारच्या पूर्वानुमतिची गरज असेल. |
| १२. रस्ते आणि महामार्ग, पोर्टस आणि हार्बर्स | १००% | रस्ते, महामार्ग, वाहनांसाठी पूल, टोल रस्ते, वाहतूकीचे बोगदे, पोर्टस आणि हार्बर्स यांच्या उभारणी आणि देखभालीसाठी प्रकल्पात. |

| | | |
|---|---|---|
| १३. हॉटेल आणि पर्यटन | १०० % | हॉटेल्स या शब्दात रेस्टॉरंटस, बीच रिसॉर्टस आणि पर्यटकाना राहण्याची जागा आणि/किंवा केटरिंग आणि फुड सुविधा पुरविणाऱ्या अन्य पर्यटन संकुलांचा समावेश आहे. पर्यटनाशी संबंधित उद्योगात पर्यटन एजन्सीज, सहल प्रचालन एजन्सीज आणि पर्यटक वाहतूक प्रचालन एजन्सीज, पर्यटकाना सांस्कृतिक, साहसी आणि वन्यजीवनाचा अनुभव देणाऱ्या सुविधा, भू, हवाई आणि जल वाहतूक सुविधा, आरामदायक, करमणूक, मनोरंजन, क्रिडा आणि आरोग्य युनीटस पुरविणारी युनीटस, आणि अधिवेशने/परिषदा युनीटस आणि संघटना यांचा समावेश आहे.<br>विदेशी तंत्रज्ञान करारासाठी, स्वयंचलित मान्यता मंजूर करण्यात येते जर<br>१) प्रस्तावाच्या भांडवली खर्चापैकी ३% पर्यंत तंत्रज्ञान आणि संमंत्रणेसाठी प्रदान करण्यात येणार असेल<br>२) एकूण उलाढालीच्या ३% पर्यंत फ्रॅन्चायसिंग आणि विपणन/प्रसिध्दी सहाय्य शुल्क म्हणून देय आहे.<br>ढोबळ प्रचालनीय नफ्यापैकी १०% पर्यंत प्रोत्साहन शुल्कासह व्यवस्थापन शुल्क म्हणून देय आहे. |
| १४. खाणकाम | ७४ % | हिरे आणि मौल्यवान रत्नांच्या समन्वेषणासाठी आणि खाणीतून काढण्यासाठी स्वयंचलित मार्गाखाली ७४ % पर्यंत एफडीआय अनुज्ञेय आहे. |
| | १०० % | २) सोने आणि चांदी आणि हिरे आणि मौल्यवान रत्ने यांच्या व्यतिरिक्त अन्य खनिजे खाणीतून काढण्यासाठी आणि समन्वेषणासाठी, मेटलर्जी आणि प्रक्रियेसाठी स्वयंचलित मार्गाखाली १०० % एफडीआय अनुज्ञेय आहे.<br><br>३) प्रसिध्दी सूचना १८ (१९९८ मालिका) दिनांक १४/१२/९८, खाणकाम क्षेत्राचा संबंध आहे त्या बाबतीत, अर्जदाराने असे घोषणापत्र दिले कि त्याच क्षेत्रासाठी आणि / किंवा विशिष्ट खनिजासाठी त्याचे विद्यमान कोणतेही संयुक्त साहस नाही तर १००% मालकीच्या उपकंपन्या स्थापन करण्यासाठी लागू असणार नाही. |

| | | |
|---|---|---|
| १५. जाहिरात क्षेत्र | १०० % | स्वयंचलित मार्गाखाली १०० % पर्यंत एफडीआय अनुज्ञेय आहे. |
| १६. चित्रपट | १०० % | चित्रपट क्षेत्र (संबंधित सेवा/उत्पादनांसहित चित्रपट निर्मिती, प्रदर्शन आणि वितरण)<br><br>प्रवेश-स्तरावरील कोणत्याहि अटीविना १०० % एफडीआय स्वयंचलित मार्गाखाली अनुज्ञेय |
| १७. विमानतळ | ७४ % | ७४% पुढे सरकारी मान्यता आवश्यक |
| १८. मोठ्या प्रमाणावरील जलद वाहतूक यंत्रणा | १०० % | सर्व महानगरात संबंधित रियल इस्टेट विकासासहित मोठ्या प्रमाणवरील जलद वाहतूक यंत्रणेसाठी स्वयंचलित मार्गाखाली १०० % एफडीआय अनुज्ञेय |
| १९. प्रदूषण नियंत्रण आणि व्यवस्थापन | १००% | प्रदूषण नियंत्रक यंत्रणेच्या एकात्मिकतेसाठी प्रदूषण नियंत्रक उपकरणांची निर्मिती आणि संमंत्रणा दोहोंसाठी स्वयंचलित मार्गाखाली १०० % एफडीआय अनुज्ञेय |
| २०. विशेष आर्थिक क्षेत्रे | १०० % | खालील अपवाद वगळता सर्व उत्पादक कार्यांसाठीः<br>१) शस्त्रे आणि दारूगोळा, स्फोटके आणि संरक्षण उपकरणांशी संबंधित बाबी, संरक्षक विमाने आणि युध्दनौका,<br>२) अण्विक मूलद्रव्ये, नार्कोटिक्स आणि सायकोट्रॉपिक मूलद्रव्ये आणि धोकादायक रसायने<br>३) अल्कोहोलिक पेयांचे उर्ध्वपातन आणि गाळणे, आणि<br>४) सिगारेटस/सिगारस आणि तंबाखू उत्पादनांचे पर्याय |
| २१. अन्य कोणतेही क्षेत्र/कार्य | १०० % | परिशिष्ट अ मध्ये समाविष्ट नसल्यास, |
| २२. हवाई वाहतूक सेवा (स्थानिक हवाईसेवा) | एनआरआयजसाठी १०० % आणि इतरांसाठी ४९ % | विदेशी हवाई सेवांच्या प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष सहभागाला परवानगी नाही. |
| २३. ऩगर, गृहनिर्माण, तयार | १०० % | गुंतवणूक खालील अटींच्या अधीन असेलः |

पायाभूत सुविधा आणि बांधकाम-विकास प्रकल्प. या क्षेत्रात गृहनिर्माण, व्यावसायिक जागा, हॉटेल्स, शैक्षणिक संस्था, मनोरंजनाच्या सुविधा, शहर आणि विभागीय स्तरावरील पायाभूत सुविधा समाविष्ट असतील पण ती मर्यादा नसेल.

(अ) प्रत्येक प्रकल्पाखाली विकसित करायचे किमान क्षेत्र खालीलप्रमाणे असेलः

(१) सेवाकृत भूखंड विकासाच्या बाबतीत — १० हेक्टर्स

(२) उभारणी-विकास प्रकल्पांच्या बाबतीत — ५०,००० चौ.मीटर्स

(३) संयुक्त प्रकल्पांच्या बाबतीत उक्त दोन अटींपैकी कोणतीहि एक

(ब) गुंतवणूक खालील अटींच्या अधीन असेलः

(१) संपूर्ण मालकीच्या उपकंपन्यांसाठी यूएस डॉलर १० दशलक्षांचे आणि भारतीय भागीदारांबरोबर संयुक्त साहसांसाठी यूएस डॉलर ५ दशलक्षांचे किमान भांडवलीकरण. कंपनीचा व्यवसाय सुरू झाल्यापासून सहा महिन्यांच्या आत निधी आणावा लागेल.

(२ ) किमान भांडवलीकरणाच्या पूर्ततेनंतर तीन वर्षाच्या कालावधीपूर्वी मूळ गुंतवणूक प्रत्यावर्तित करता येणार नाही. तथापि, गुंतवणूकदाराला एफआयबीपी मार्फत सरकारच्या पूर्व मान्यतेने आधी बाहेर पडण्यास परवानगी दिली जाईल.

(क) किमान ५०%प्रकल्प संविधिक निपटारा प्राप्त झाल्यापासून पाच वर्षाच्या कालावधीत विकसित केला पाहिजे. गुंतवणूकदाराला अविकसित भूखंड विकण्याची परवानगी देण्यात येणार नाही.

(ड) प्रकल्प लागू असलेल्या बांधकाम नियंत्रक नियमने, उपविधी, नियम आणि राज्य सरकारची/महापालिकेची/संबंधित स्थानिक संस्थेची अन्य नियमने यात घालून दिलेल्या अटी आणि प्रमाणकांनुसार असला पाहिजे.

(इ) गुंतवणूकदार इमारत/आराखडा योजना, अंतर्गत आणि आजूबाजूचे क्षेत्राचा विकास आणि अन्य पायाभूत सुविधा, विकास, बाह्य विकास आणि अन्य आकारांचे प्रदान यासहित सर्व आवश्यक मान्यता प्राप्त करण्यास आणि लागू असलेल्या राज्य सरकारच्या/महापालिकेच्या/संबंधित स्थानिक

संस्थेच्या नियमांत/उपविधीत/नियमनांत विहीत केलेल्या अन्य आवश्यकतांची पूर्तता करण्यासाठी जबाबदार असेल.

(फ) संबंधित राज्य सरकार/महापालिका/स्थानिक संस्था, ज्या बांधकाम/विकास योजना मंजूर करतात, त्या विकासकाने उक्त अटीपूर्ण करण्याचे संनियंत्रण करतील.

**टीपः** या मार्गदर्शक तत्त्वांच्या हेत्वर्थ, ‘‘अविकसित भूखंड’’ म्हणजे जेथे रस्ते, पाणी पुरवठा, रस्त्यावरील दिवे, गटारे, मलनिःसारण आणि विहीत नियमनांनुसार लागू असल्याप्रमाणे अन्य सोयी उपलब्ध केलेल्या नाहीत. गुंतवणूकदाराने या पायाभूत सुविधा पुरविणे आणि त्याला सेवाकृत गृहनिर्माण भूखंड वाटपासाठी परवानगी देण्याआधी संबंधित स्थानिक संस्थेकडून/सेवा एजन्सीकडून पूर्तता प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक आहे.

**परिशिष्ट - ३**

**भारतातील निवासी व्यक्तीद्वारा भारताबाहेरील निवासी व्यक्तीला आणि भारताबाहेरील निवासी व्यक्तीद्वारा भारतातील निवासी व्यक्तीला विक्रीच्या मार्गाने समभागांचे/परिवर्तनीय कर्जरोख्यांचे हस्तांतरण करण्यासाठी अटी आणि शर्ती.**

**१.१** वित्तीय क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या कंपनी व्यतिरिक्त अन्य भारतीय कंपनीचे समभाग/परिवर्तनीय कर्जरोखे विक्रीच्या मार्गाने हस्तांतरित करण्याच्या संबंधात किंमत ठरविणे, कागदपत्र तयार करणे, प्रदाने/प्राप्ती आणि वित्तप्रेषणाशी संबंधित चिंतांकडे लक्ष देण्याच्या दृष्टीने अशा व्यवहारात गुंतलेल्या पक्षानी खाली दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांची पूर्तता करावी.

**१.२ व्यवहारात गुंतलेले पक्ष आहेत** (अ) विक्रेता (निवासी/अनिवासी), (ब) खरेदीदार (निवासी/अनिवासी), (क) विक्रेत्याचे आणि/किंवा खरेदीदाराचे उचित प्रकारे अधिकृत एजंट, (ड) अधिकृत डिलर बँक (एडी) शाखा आणि (इ) भारतीय कंपनी, तिच्या नोंदवह्यात मालकीचे हस्तांतरण नोंदविण्यासाठी.

**२. किंमत ठरविण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे**

**२.१** पुढील प्रकारच्या व्यवहारांसाठी खाली नमूद केलेली किंमत ठरविण्याची मार्गदर्शक तत्त्वे लागू आहेतः

१. भारतातील निवासी व्यक्तीद्वारा भारताबाहेरील निवासी व्यक्तीला खाजगी व्यवस्थेखाली विक्रीच्या मार्गाने समभागांचे हस्तांतरण

२. भारताबाहेरील निवासी व्यक्तीद्वारा भारतातील निवासी व्यक्तीला खाजगी व्यवस्थेखाली विक्रीच्या मार्गाने समभागांचे हस्तांतरण

**२.२ निवासीद्वारा अनिवासीला** (म्हणजेच पूर्वश्रमींच्या ओसीबी, विदेशी नागरिक, एनआरआय, एफआयआय व्यतिरिक्त अंगीकृत अनिवासी एककाला) **हस्तांतरण**
निवासीद्वारा अनिवासीला विक्रीच्या मार्गाने हस्तांतरित केलेल्या समभागांची किंमत खालीलपेक्षा कमी नसेल.
(अ) समभाग स्टॉक मार्केटवर सूचीबध्द असतील तर, बाजारातील चालू किंमत,
(ब) असूचीबध्द समभाग़ांच्या बाबतीत, पूर्वाश्रमींच्या कंट्रोलर ऑफ कॅपिटल इश्शूज नी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार चार्टर्ड अकाउंटंटने केलेले समभागांचे उचित मूल्यांकन.
प्रति समभाग काढण्यात आलेली किंमत चार्टर्ड अकाउंटंटने प्रमाणित केलेली असावी.

**२.३ अनिवासीद्वारा** (म्हणजेच अंगीकृत अनिवासी एकक, पूर्वाश्रमींची ओसीबी, विदेशी नागरिक, एनआरआय, एफआयआय द्वारा) **निवासीला हस्तांतरण**

अनिवासीद्वारा निवासीला समभागांची विक्री अधिसूचना क्र. एफइएमए २०/२०००-आरबी दिनांक मे ३, २००० च्या नियमन १० बी (२) नुसार असेल, जे खालील प्रमाणे आहेः

***(अ) जेथे भारतीय कंपनीचे समभाग स्टॉक एक्स्चेंजवर विकले जातात,***

१) विक्री स्टॉक मार्केटवर चालू असलेल्या बाजारी किंमतीला केली जाईल आणि भारतीय प्रतीभूती आणि विनिमय मंडळाकडे नोंदणीकृत असलेल्या किंवा स्टॉक एक्स्चेंजकडे नोंदणीकृत असलेल्या स्टॉक ब्रोकरमार्फत प्रभावी केली जाईल;

२) जर हस्तांतरण कलम (१) मध्ये नमूद केलेल्या व्यतिरिक्त असेल, तर अर्ज केल्याच्या तारखेच्या आधीच्या आठवड्यासाठी सरासरी दरसूची (दैनिक उच्चतर आणि निम्नतरची सरासरी) विचारात घेऊन ५ टक्के फरकाने किंमत काढण्यात येईल. तथापि, जेथे, समभाग विदेशी सहयोगीद्वारे किंवा भारतीय कंपनीच्या विदेशी प्रवर्तकाद्वारे निवासी प्रवर्तकाच्या नावे व्यवस्थापकीय नियंत्रण सोपविण्याच्या हेतूने भारतातील विद्यमान प्रवर्तकाला विकण्यात येत आहेत, विक्रीचा प्रस्ताव अशा किंमतीला विचारात घेण्यात येईल जी उक्तप्रमाणे काढलेल्या किंमतीच्या वर २५ टक्के मर्यादेपर्यंत अधिक असू शकेल.

***(ब) जेथे भारतीय कंपनीचे समभाग स्टॉक एक्स्चेंजवर सूचिबध्द नाहीत किंवा ज्यांचा कमी व्यवहार होतो***

१) हस्तांतरणासाठी देय असलेली रक्कम प्रति विक्रेता प्रति कंपनी रु. २० लाखांपेक्षा अधिक नसेल तर, विक्रेता अणि खरेदीदार यानी परस्परात मान्य केलेल्या किंमतीवर, सध्या अस्पष्ट असलेल्या मूल्यांकनाच्या पध्दतीच्या आधारावर, ज्या कंपनीचे समभाग हस्तांतरणासाठी प्रस्तावित आहेत त्या भारतीय कंपनीच्या संविधिक लेखापरिक्षकांकडील समभागांच्या मूल्यांकनाबाबत प्रमाणपत्र सादर केल्यावर, आणि
२) हस्तांतरणासाठी देय असलेली रक्कम प्रति विक्रेता प्रति कंपनी रु. २० लाखांपेक्षा अधिक असेल तर, विक्रेत्याच्या पसंतीने खालील पैकी कोणत्याहि एका पध्दतीने काढलेल्या किंमतीवरः

अ) प्रति समभाग वित्तलब्धीच्या आधारावरील किंमत (प्राइस अर्निंग (पी/इ)पटीशी जोडलेली इपीएस) किंवा पुस्तकी मूल्याच्या पटीशी जोडलेल्या नक्त मत्ता मूल्याच्या(एनएव्ही) आधारावरील किंमत, यापैकी जी उच्चतम असेल,

किंवा

ब) रिझर्व्ह बँकेने ठरवून दिल्याप्रमाणे छोट्या संचात बाजारात चालू असलेली किंमत जेणेकरून संपूर्ण समभाग धारणा स्क्रीन आधारित ट्रेडिंग पध्दतीद्वारे कामकाजाच्या पाच दिवसांच्या आत विकली जाईल

किंवा

क) जेथे समभाग कोणत्याहि स्टॉक मार्केटवर सूचीबध्द नाहीत, कंपनीच्या संविधिक लेखापरिक्षाकांद्वारे एक आणि दुसरे चार्टर्ड अकाउंटंट किंवा भारतीय प्रतीभूती आणि विनिमय मंडळ यांच्याकडे नोंदणीकृत असलेल्या प्रवर्ग १ मधील मर्चंट बँकरद्वारा अशा दोन स्वतंत्र मूल्यांकनांपैकी जे कमी आहे त्यानुसार.

**स्पष्टिकरणः**

१. एखाद्या समभागातील, भारतातील मुख्य स्टॉक एक्स्चेंजेसवरील, ज्या महिन्यात अर्ज केला आहे त्याआधीच्या सहा दिनदर्शिका महिन्यातील वार्षिकीकृत ट्रेडिंग उलाढ़ाल, सुचिबध्द स्टॉकपेक्षा २  टक्क्याहून (समभागांच्या संख्येने) कमी असेल तर तो समभाग कमी विकला जातो असे मानले जाते.

२) प्रति समभाग नक्त मत्ता मूल्य काढण्यासाठी, पुढे आणलेले किरकोळ खर्च, संचित तोटा, एकूण बाह्य दायित्वे, पुनर्मूल्यांकन निधी आणि राखीव भांडवल (रोख मिळालेले अर्थसहाय्य वगळून) एकूण मत्तेतून वजा करावे आणि अशा प्रकारे काढलेल्या नक्त अंकाला निर्गमित केलेल्या आणि पूर्ण भरणा झालेल्या समभागांच्या संख्येने भागावे. दुसरा पर्याय म्हणजे, अमूर्त मत्ता समभाग भांडवल आणि राखीव निधी (पुनर्मूल्यांकन निधी वगळून) मधून वजा करावी आणि अशा प्रकारे काढलेल्या अंकाला निर्गमित केलेल्या आणि पूर्ण भरणा झालेल्या समभागांच्या संख्येने भागावे. अशा प्रकारे काढलेली एनएव्ही ज्या महिन्यात अर्ज केला त्या महिन्याच्या लगेचच्या आधीच्या दिनदर्शिका महिन्यातील बॉम्बे स्टॉक एक्स्चेंज राष्ट्रिय निर्देशांकाची सरासरी बीव्ही पटसह उपयोगात आणावी आणि बीव्ही पटीत ४० टक्के डिस्काउंट द्यावा.

३) प्रति समभाग वित्तलब्धीच्या आधारावर किंमत काढण्यासाठी, कंपनीच्या अद्यतन ताळेबंद पत्रकात असल्याप्रमाणे प्रति समभाग वित्तलब्धी ज्या महिन्यात अर्ज केला त्या महिन्याच्या लगेचच्या आधीच्या दिनदर्शिका महिन्यातील बॉम्बे स्टॉक एक्स्चेंज राष्ट्रिय निर्देशांकाच्या सरासरी किंमत वित्तलब्धी पटीसह उपयोग करावा आणि किंमत वित्तलब्धीत ४० टक्के डिस्काउंट द्यावा.

### ३. पक्षांच्या जबाबदाऱ्या/कर्तव्ये

एफइएमए अधीन संबधित नियमनांची पूर्तता केली जात आहे आणि समभागांच्या हस्तांतरणानंतर, सरकारने निश्चीत केलेल्या संबंधित व्यक्तीगत मर्यादा /क्षेत्रीय मर्यादा/ विदेशी समभाग सहभाग मर्यादा यांचे उल्लंघन होत नाही  याची खात्री करून घेणे ही व्यवहारात गुंतलेल्या सर्व पक्षांची जबाबदारी आहे. व्यवहारांची पूर्तता लागू असलेल्या, काही असल्यास, करांच्या प्रदानाच्या अधीन असेल.

### ४. विक्रीच्या उत्पन्नाचे प्रदान आणि वित्तप्रेषण/क्रेडिटसाठी पध्दती

४.१ भारताबाहेरील निवासी व्यक्तिने खरेदी केलेल्या समभागांच्या संबंधातील विक्रीची रक्कम सामान्य बँकिंग वाहिन्यांमार्फत भारतात वित्तप्रेषित केली जाईल. जर खरेदीदार विदेशी वित्तीय संस्था (एफआयआय) असेल तर, प्रदान तिच्या विशेष अनिवासी रुपया खात्यातून वजा करून करावे. खरेदीदार जर एनआरआय असेल तर, प्रदान त्याच्या एनआरइ/एफसीएनआर(बी) खात्यातून वजा करून करावे. तथापि, जर एनआरआयने अ-प्रत्यावर्तन तत्त्वावर समभाग

संपादन केले असतील, तर रक्कम सामान्य बँकिंग वाहिन्यांद्वारे वित्तप्रेषीत करावी किंवा एनआरइ/एफसीनआर(बी)/एनआरओ खात्यात धारण केलेल्या निधीतून प्रदान करावी.

४.२ भारताबाहेरील निवासी व्यक्तीने विकलेल्या समभागांच्या विक्रीचे उत्पन्न (करांच्या नक्त) भारताबाहेर वित्तप्रेषीत करता येईल. एफआयआयच्या बाबतीत विक्रीचे उत्पन्न तिच्या विशेष अनिवासी रुपया खात्यात जमा करता येईल. एनआरआयच्या बाबतीत जर विकलेले समभाग प्रत्यावर्तन तत्त्वावर धारण केलेले असतील, विक्रीचे उत्पन्न (करांच्या नक्त) त्याच्या एनआरइ/एफसीएनआर (बी) खात्यात जमा करता येईल आणि विकलेले समभाग जर
अ-प्रत्यावर्तन तत्त्वावर धारण केलेले असतील तर, विक्रीचे उत्पन्न कर प्रदानाच्या अधीन त्याच्या एनआरओ (चालू) खात्यात जमा करता येईल.

४.३ ओसीबीद्वारा विकण्यात आलेल्या समभागांच्या विक्रीचे उत्पन्न (करांच्या नक्त) समभाग जर प्रत्यावर्तन तत्त्वावर धारण केलेले असतील तर थेट भारताबाहेर वित्तप्रेषित करता येईल आणि विकलेले समभाग जर अ-प्रत्यावर्तन तत्त्वावर धारण केलेले असतील तर विक्रीचे उत्पन्न, ज्या ओसीबीज़ची खाती आरबीआयने गोठवली आहेत त्यांचा अपवाद वगळता, तिच्या एनआरओ (चालू) खात्यात जमा करता येईल.

**५. कागदपत्र तयार करणे**

जोडलेल्या नमुना टीसी-टीआरएस (चार प्रतीत) मध्ये घोषणापत्र प्राप्त करण्याव्यतिरिक्त, एडी शाखेने खालील कागदपत्रे प्राप्त करण्यासाठी आणि दफ्तरी ठेवण्यासाठी व्यवस्था करावीः

**५.१ भारतातील निवासी व्यक्तीद्वारे समभागांच्या विक्रीसाठी**

१. विक्रेता आणि खरेदीदार किंवा त्यांच्या उचित प्रकारे नियुक्त केलेल्या एजंटने उचित प्रकारे सही केलेले मान्यता पत्र ज्यात हस्तांतरणाचा पुढील तपशील दर्शविला असेल; हस्तांतरित करायच्या समभागांची संख्या, ज्या गुंतवणूकदार कंपनीचे समभाग हस्तांतरित करायचे आहेत तिचे नाव आणि ज्या किंमतीला समभाग हस्तांतरित करायचे आहेत ती किंमत. जर कोणताहि औपचारिक करार केलेला नसेल तर, या संबंधात देवाण-घेवाण करण्यात आलेली पत्रे दफ्तरी ठेवावीत.

२. जेथे मान्यता पत्रावर त्यांच्या उचित प्रकारे नियुक्त एजंटने सही केली असेल, तेथे एजंटला समभागांच्या खरेदी/विक्रीचा अधिकार देणाऱ्या विक्रेत्याने/खरेदीदाराने निष्पादित केलेले मुखत्यार पत्र दस्ताऐवज.

३. भारताबाहेरील निवासी व्यक्तीद्वारा समभागांचे संपादन केल्यानंतर, प्रवर्ग-निहाय(म्हणजेच एनआरआयज /ओसीबीज /विदेशी नागरिक /अंगीकृत अनिवासी एकके/ एफआयआयज) निवासी आणि अनिवासीचा समभागातील सहभाग आणि जेथे क्षेत्रीय मर्यादा विहीत केली आहे तेथे विक्रेत्याने/खरेदीदाराने किंवा त्यांच्या उचित प्रकारे नियुक्त केलेल्या एजंटने कंपनीकडून प्राप्त केलेल्या पूर्ण भरणा झालेल्या भांडवलाची टक्केवारी दर्शविणारा गुंतवणूक स्वीकारणाऱ्या कंपनीच्या समभाग धारणेचा नमुना.

४. समभागांचे उचित मूल्य दर्शविणारे चार्टर्ड अकाउंटंटकडील प्रमाणपत्र.

५. स्टॉक एक्स्चेंजवर विक्री करण्यात आली आसेल तर दलालाची नोट.
६. खरेदीदार एफडीआय धोरणाखाली आणि विद्यमान क्षेत्रीय मर्यादेखाली समभाग/परिवर्तनीय कर्जरोखे संपादन करण्यास पात्र आहे आणि किंमत ठरविण्याच्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करण्यात आले आहे अशा प्रभावाचे खरेदीदाराचे वचनपत्र.

७. सेबीने विहीत केलेल्या स्वतंत्र एफआयआय/उपखाते मर्यादेचे उल्लंघन झालेले नाही अशा प्रभावाचे एफआयआय/उपखात्याकडील वचनपत्र

**५.२ भारताबाहेरील निवासी व्यक्तीद्वारे समभागांच्या विक्रीसाठी**

१. विक्रेता आणि खरेदीदार किंवा त्यांच्या उचित प्रकारे नियुक्त केलेल्या एजंटने उचित प्रकारे सही केलेले मान्यता पत्र ज्यात हस्तांतरणाचा पुढील तपशील दर्शविला असेल; हस्तांतरित करायच्या समभागांची संख्या, ज्या गुंतवणूकदार कंपनीचे समभाग हस्तांतरित करायचे आहेत तिचे नाव आणि ज्या किंमतीला समभाग हस्तांतरित करायचे आहेत ती किंमत.

२. जेथे मान्यता पत्रावर त्यांच्या उचित प्रकारे नियुक्त एजंटने सही केली असेल, तेथे एजंटला समभागांच्या खरेदी/विक्रीचा अधिकार देणाऱ्या विक्रेत्याने/खरेदीदाराने निष्पादित केलेले मुखत्यार पत्र दस्ताऐवज. जर कोणताहि औपचारिक करार केलेला नसेल तर, या संबंधात देवाण-घेवाण करण्यात आलेली पत्रे दफ्तरी ठेवावीत.

३. विक्रेते जर एनआरआयज/ओसीबीज असतील, त्यानी प्रत्यावर्तन/अ-प्रत्यावर्तन तत्त्वावर धारण केलेल्या समभागांचा पुरावा देणाऱ्या आरबीआयच्या मंजूरीच्या प्रती. विक्रीचे उत्पन्न लागू असेल त्याप्रमाणे एनआरइ/एनआरओ खात्यात जमा केले जाईल.

४. समभागांचे उचित मूल्य दर्शविणारे चार्टर्ड अकाउंटंटकडील प्रमाणपत्र.

५. आयकर अधिकारी/चार्टर्ड अकाउंटंटकडील ना-हरकत/कर निपटारा प्रमाणपत्र.

६. किंमत ठरविण्याच्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करण्यात आले आहे अशा प्रभावाचे खरेदीदाराकडील वचनपत्र.

**६. अहवाल देण्याच्या आवश्यकता**

**६.१** या हेत्वर्थ अधिकृत डिलर्स असे विशिष्ट व्यवहार हाताळण्यासाठी शाखांची नियुक्ती करू शकतात. व्यवहार सुरळितपणे पार पडतील याची खात्री करण्यासाठी या शाखांमध्ये या हेतूने प्रशिक्षण दिलेल्या पुरेशा कर्मचाऱ्यांची नियुक्ती करता येईल. या शाखांतील कामात समन्वय राखण्यासाठी आणि या व्यवहारांचा अहवाल रिझर्व्ह बँकेला देण्याची खात्री करण्यासाठी सुध्दा एडी बँका नोडल कार्यालयाची नियुक्ती करू शकतील.

**६.२** हस्तांतरण जेव्हा खाजगी व्यवस्थेतून असेल तेव्हा, व्यवहाराच्या पूर्ततेनंतर, हस्तांतरिती/त्याच्या उचित प्रकारे नियुक्त एजंटने एडी शाखेकडील हस्तांतरितीकडून वित्तप्रेषण प्राप्त झाले आहे/हस्तांतरितीने प्रदान केले आहे अशा टीसी-टीआरएस नमुन्यातील प्रमाणपत्रासह

गुंतवणूकदार कंपनीला त्यांच्या नोंदवह्यात हस्तांतरणाची नोंद करण्यासाठी भेटावे. एडी बँकेकडून प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर, कंपनीने तिच्या नोंदवह्यात हस्तांतरणाची नोंद करावी.
**६.३** अशा हस्तांतरणापोटी प्रत्यक्ष आवक आणि जावक एडी बँकानी सामान्य पद्धतीने आर-रिटर्नसमध्ये कळवावी.

**६.४** या व्यतिरिक्त एडी बँकानी त्यांच्या घटकांकडून/ग्राहकांकडून विक्रीद्वारे समभागांच्या हस्तांतरणाच्या संबंधात केलेल्या/प्राप्त झालेल्या वित्तप्रेषणाच्या खाती आवक आणि जावक विवरणपत्रासह प्राप्त झालेल्या टीसी-टीआरएस नमुन्याच्या दोन प्रती, आयबीडी/एफइडी/किंवा बँकेने या हेतूने नियुक्त केलेल्या नोडल कार्यालयाला, जोडलेल्या नमुन्यात (जो एमएस-एक्सेल फॉर्मेटमध्ये तयार करायचा आहे) सादर कराव्यात. त्यानंतर आयबीडी/एफइडी किंवा बँकेचे नोडल कार्यालय त्यांच्या सर्व बँकानी कळविलेल्या व्यवहारांच्या संबंधात एकत्रित मासिक विवरणपत्र त्यांच्या शाखांकडून प्राप्त झालेल्या एफसी-टीआरएस नमुन्यासह विदेशी विनिमय विभाग, रिझर्व्ह बँक, विदेशी गुंतवणूक विभाग, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई याना सॉफ्ट कॉपीत (एमएस-एक्सेल मध्ये) fdidata@rbi.org.in या इ-मेलद्वारा सादर करतील.

**६.५** खाजगी व्यवस्थेखाली एफआयआयजनी खरेदी केलेले/विकलेले समभाग त्यांच्या विशेष अनिवासी रुपया खात्यात डेबिट/क्रेडिट द्वारा असतील. त्यामुळे व्यवहारसुध्दा संबंधित एफआयआयच्या नियुक्त बँकेने एलइसी एफआयआय मध्ये कळवावा.

**६.६** पोर्टफोलिओ इन्व्हेस्टमेंट योजनेखाली एनआरआयज, ओसीबीजनी खरेदी केलेले भारतीय कंपन्यांचे समभाग खाजगी व्यवस्थेखालील विक्रीच्या मार्गाने हस्तांतरित करता येणार नाहीत.

**६.७** एडी बँकेकडून विवरणपत्र प्राप्त झाल्यानंतर, रिझर्व्ह बँक आवश्यक असल्यास हस्तांतरक/हस्तांतरिती किंवा त्यांचे एजंट यांच्याकडून आवश्यक असलेला अतिरिक्त तपशील मागवील किंवा तसा आदेश देईल.

**परिशिष्ट – ४**

**भारतातील निवासी व्याक्तिने देणगीच्या मार्गाने भारताबाहेरील निवासी व्यक्तीला समभागांचे हस्तांतरण करण्यासाठी सादर करायची कागदपत्रे**

१. हस्तांतरक(दाता) आणि हस्तांतरिती (स्वीकारणारा) यांची नावे आणि पत्ते

२. हस्तांतरक आणि हस्तांतरिती यांच्यातील नाते

३. देणगी देण्याची कारणे

४. सरकारी दिनांकित प्रतिभूती आणि राजकोषपत्रे आणि रोख्यांच्या बाबतीत, अशा प्रतिभूतींच्या बाजारी मूल्याबाबत चार्टर्ड अकाउंटंटने निर्गमित केलेले प्रमाणपत्र.

५. स्थानिक म्युच्युअल फंड आणि मनी मार्केट म्युच्युअल फंडाच्या युनिटसच्या बाबतीत, अशा प्रतिभूतींच्या नक्त मत्ता मूल्याबाबत, निर्गमन करणाऱ्याकडील प्रमाणपत्र.

६. समभाग आणि कर्जरोख्यांच्या बाबतीत, अशा प्रतिभूतींच्या मूल्याबाबत भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळ यांनी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार सुचीबध्द आणि असुचीबध्द कंपन्यांसाठी अनुक्रमे चार्टर्ड अकाउंटंटचे किंवा पूर्वाश्रमींच्या सीसीआयचे प्रमाणपत्र.

७. संबंधित भारतीय कंपनीचे असे प्रमाणित करणारे प्रमाणपत्र कि निवासीकडून अनिवासीकडे करायचे प्रस्तावित समभागांचे/परिवर्तनीय कर्जरोख्यांचे देणगीच्या मार्गाने हस्तांतरण लागू असलेल्या क्षेत्रीय मर्यादेचे/कंपनीतील एफडीआयच्या मर्यादेचे उल्लंघन करणार नाही आणि असे कि अनिवासी हस्तांतरितीने धारण करायच्या प्रस्तावित समभागांची/परिवर्तनीय कर्जरोख्यांची संख्या कंपनीच्या पूर्ण भरणा झालेल्या भांडवलाच्या ५ टक्क्यांच्या वर जाणार नाही.[१४]

[१४]एपी (डिआयआर मालिका) परिपत्रक क्र. ०८ दिनांक ऑगस्ट २५, २००५

**परिशिष्ट - ५**

**कंपन्या अधिनियम, १९५६ च्या कलम ६ मध्ये दिल्याप्रमाणे 'नातेवाईक' ची व्याख्या.**

- एखादी व्यक्ती नातेवाईक आहे असे मानले जाईल जर, आणि तरचः

(अ) ते हिंदू अविभक्त कुटुंबाचे सदस्य असतील; किंवा
(ब) ते पति आणि पत्नी असतील; किंवा
(क) परिशिष्ट १ ए (खालीलप्रमाणे) मध्ये दर्शविलेल्या पध्दतीने एकाचे दुसऱ्याशी नाते असेल

१. वडिल
२. आई (सापत्न आईसहित)
३. मुलगा (सापत्न मुलासहित)
४. मुलाची पत्नी
५. मुलगी (सापत्न मुलीसहित)
६. वडिलांचे वडिल
७. वडिलांची आई
८. आईची आई
९. आईचे वडिल
१०. मुलाचा मुलगा
११. मुलाच्या मुलाची पत्नी
१२. मुलाची मुलगी
१३. मुलाच्या मुलीचा पति
१४. मुलीचा पति
१५. मुलीचा मुलगा
१६. मुलीच्या मुलाची पत्नी
१७. मुलीची मुलगी
१८. मुलीच्या मुलीचा पति
१९. भाऊ (सापत्न भावासहित)
२०. भावाची पत्नी
२१. बहिण (सापत्न बहिणीसहित)
२२. बहिणीचा पति

पृष्ठ क्र. ६० ते ७०

**जोडपत्र – ६**
**एफसी-जीपीआर**

**भाग – १**

*(कंपनीमध्ये नवीन गुंतवणुक केली गेल्यावर, हे घोषणापत्र करणाऱ्या कंपनीचे पंजीकृत कार्यालय आरबीआयच्या ज्या प्रादेशिक कार्यालयाचे अधिकारक्षेत्राखाली येते त्या कार्यालयाकडे त्या कंपनीने कंपनीच्या अधिकृत डीलर वर्ग – १ च्यामार्फत पुढील कागदपत्रांसह भरावा )*

(१) भारताबाहेर राहणाऱ्या व्यक्तींकडून गुंतवणूक स्विकारणाऱ्या कंपनीच्या कंपनी सेक्रेटरीने दिलेले प्रमाणपत्र.

(२) भारताबाहेर राहणाऱ्या व्यक्तींना दिलेल्या समभागांचे मूल्य कसे काढण्यात आले त्याची रीत दर्शविणारे, वैज्ञानिक लेखापरीक्षक किंवा चार्टर्ड अकऊंटंट्चे प्रमाणपत्र ( सूचनापत्र क्र. फेमा २०/२००० - आरबी दि.मे ३,
२००० च्या शेड्यूल १ मधील खंड ९ ब मध्ये निर्देश केल्याप्रमाणे )

पॅन क्रमांक | | | | | | | | | | | | |

समभाग दिल्याचा / हस्तांतरण केल्याचा दिनांक | | | | | | | | |

| क्रमांक | तपशील | ( ब्लॉक अक्षरात ) |
| --- | --- | --- |

| | | |
|---|---|---|
| १. | नाव<br><br>पत्ता<br><br>राज्य<br><br>रजिस्ट्र ऑफ कंपनीने दिलेला पंजीकरण क्रमांक<br><br>आधीच अस्तितवात असलेली किंवा नवीन कंपनी<br>( लागू नसेल ते खोडा )<br><br>अस्तितवात असलेली कंपनी असल्यास एफडीआयसाठी<br>आरबीआय द्वारा दिला गेलेला पंजीकरण क्रमांक | |

| | | |
|---|---|---|
| | फॅक्स<br><br><br><br>टेलिफोन नं.<br><br><br><br>ई-मेल | |

| | | |
|---|---|---|
| २. | मुख्य व्यावसायिक कामकाजाची माहिती<br><br>एन आय सी कोड | |

| | | |
|---|---|---|
| | प्रकल्पाची जागा आणि जेथे प्रकल्प आहे त्या जिल्ह्याचा एनाआयसी कोड | |

| | | |
|---|---|---|
| ३. | एफडीआयच्या धोरणानुसार परवानगी असलेल्या एफडीआयची टक्केवारी<br><br>**विदेशी सहकाऱ्याची सविस्तर माहिती** | |

| | | |
|---|---|---|
| | नाव<br><br>पत्ता<br><br>देश<br><br>घटना (तपशील घ्यावा,विदेशी नागरिक/विदेशी कंपनी/ एफव्हीसीआय/एफआयआय/एनआरआय/पीआयओ/इतर) | |

| | |
|---|---|
| ४. | समभाग/ दिले गेलेले (प्रचलित) परिवर्तनीय कर्ज रोखे |
| अ. | प्रचालनाचा प्रकार व दिनांक<br><br>प्रचालनाचा प्रकार<br>प्रचालनाचा दिनांक<br>समभागांची/ परिवर्तनीय कर्जरोख्यांची संख्या<br>१.<br>आय पी ओ / एफ पी ओ<br><br>२.<br>अधिमान्य वाटप (प्रेफरेन्शियल ऍलॉटमेंट )<br><br>३.<br>हक्क<br><br>४.<br>अधिलाभांश ( बोनस )<br><br>५.<br>ईसीबीचे रुपांतरण<br><br>६.<br>स्वामित्वधनाचे रुपांतरण<br>(एक रकमी प्रदानासह) |

| | |
|---|---|
| | ७.<br>ई एस ओ पी<br><br>८.<br>इतर (कृपया तपशील द्यावा.)<br><br><br><br><br>एकूण |

| (ब | दिल्या गेलेल्या सुरक्षेचा प्रकार | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | सुरक्षेचा प्रकार | संख्या | परिणती (मॅच्युरिटी) | दर्शनी मूल्य | अति समभाग प्रचालनाचे मूल्य | अंतःप्रवाहाची (इनफ्लो)रक्कम |
| | इक्विटी | | | | | |
| | परिवर्तनीय कर्जरोखे (सीडी) | | | | | |
| | (अ) सक्तीचे सीडी | | | | | |
| | (ब) ऐच्छिक सीडी | | | | | |
| | (क) अंशतः(पार्शल) सीडी | | | | | |
| | अधिमानित (प्रेफरन्स) समभाग (पी एस) | | | | | |
| | (अ) परिवर्तनीय पी एस | | | | | |
| | (ब) अपरिवर्तनीय पी एस | | | | | |
| | व्हीसीएफची एकके | | | | | |
| | इतर | | | | | |
| | एकूण | | | | | |

(१) प्रचालनाचे मूल्य हे दर्शनी मूल्यापेक्षा अधिक असल्यास कृपया मिळालेल्या अधिमूल्याचा (प्रिमियम) तपशील घ्यावा.
(२) जर हे प्रचालन ( इश्यु ) ईसीबीच्या किंवा स्वामित्वमूल्याच्या विरुध्द असेल तर, रुपांतरणाच्या तारखेला थकित येणे (आऊटस्टँडिंग) असलेली रक्कम प्रमाणित करण्याबाबत प्रमाणपत्र देण्यात यावे.

| (क) | अधिमूल्याचा तपशील | रक्कम |
|---|---|---|
| | नियंत्रण अधिमूल्य (कंट्रोल प्रिमियम) | |
| | पूर्ण न केल्याबाबत (नॉन कंप्लीशन) शुल्क | |
| | इतर | |

| | | |
|---|---|---|
| | एकूण | |

**कृपया प्रकाराबद्दल तपशील द्यावा.**

| | | |
|---|---|---|
| (ड) | अनिवासियांना देण्यात आलेल्या समभागांमुळे आलेला **एकूण अंतःप्रवाह** (इनफ्लो) (रुपयांमध्ये) (अधिमूल्य असल्यास त्यासह)<br>(१) एडी मार्फत केलेले प्रेषण :<br>(२) --- ह्या बँकेद्वारा एनआरई/एफसीएनआर खात्यातून वजा (डेबिट)<br>(३) इतर<br>वरील (१) बाबत आरबीआयला कळविण्याची तारीख ही, सूचनापत्र क्र. फेमा २०/२००० - आरबी दिनांक मे ३, २००० च्या खंड ९ (१) ए (१) अनुसार त्यातील वेळोवेळी केलेल्या सुधारणांनुसार असेल | |
| (ई) | **दिलेल्या समभागांच्या उचित मूल्याचे प्रकटन** | |
| | आम्ही एक लिस्टेड कंपनी असून, प्रचालनाच्या तारखेला एका समभागांचे बाजार-मूल्य ---- एवढे आहे. | |
| | आम्ही शेअर बाजारात नोंद नसलेली (अनलिस्टेड) कंपनी आहोत आणि समभागाचे रास्त-मूल्य----एवढे आहे. | |

समभाग देण्यापूर्वी (कृपया लागू असेल त्याप्रमाणे द्यावे)

| (५) | प्रचालनानंतरची समभागधारणांची संरचना (पॅटर्न) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | इक्विटी | | | अधिमान समभाग प्रेफरन्स शेअर/परिवर्तनीय कर्जरोखे कन्व्हर्टिबल डिबेंचर्स | | |
| | | समभागांची संख्या | रक्कम (दर्शनी मूल्य) रु. | % | समभागांची संख्या | रक्कम (दर्शनी मूल्य) रु. | % |
| (अ) | अनिवासी | | | | | | |
| | विदेशी नागरिक | | | | | | |
| | विदेशी कंपन्या | | | | | | |
| | एफ आय आय | | | | | | |
| | एफ व्ही सी आय | | | | | | |
| | एन आर आय/पी आय ओ | | | | | | |
| | पोट बेरीज | | | | | | |
| | निवासी | | | | | | |
| | एकूण बेरीज | | | | | | |

भारतीय कंपनीच्या अधिकृत प्रतिनिधीने दाखल करावयाचे घोषणापत्र

आम्ही येथे घोषित करतो की

(१) सूचनापत्र क्र. फेमा २०/२००० आर बी दि.मे ३, २००० मध्ये वेळोवेळी केलेल्या सुधारणांनुसार असलेल्या एफ डी आय योजनेखाली घालून दिलेल्या समभाग प्रचालनाच्या कार्यरिती मान्य करीत आहोत.

भारतीय कंपनीच्या अधिकृत प्रतिनिधीने दाखल करायचे घोषणापत्रः
आम्ही याद्वारे घोषित करतो किः
१. वेळोवेळी सुधारल्याप्रमाणे अधिसूचना क्र. एफइएमए २० २०००-आरबी दिनांक ३ मे २००० मध्ये दर्शविल्याप्रमाणे एफडीआय योजनेखाली ठरवून दिलेल्या समभागांच्या निर्गमासाठी कार्यपद्धतीची आम्ही पूर्तता करतो
२. गुंतवणूक आरबीआयच्या स्वयंचलित मार्गाखाली अनुज्ञेय असलेल्या क्षेत्रीय धोरणाच्या मर्यादेच्या आत आहे आणि आम्ही स्वयंचलित मार्गाखाली गुंतवणुकीसाठी ठरवून दिलेल्या पुढे दिलेल्या अटींची पूर्तता करतो (जे लागू नाही ते खोडा),
ए) ज्या विदेशी एककांना-(व्यक्तीव्यतिरिक्त) समभाग निर्गमित केले आहेत त्यांचा भारतात त्याच क्षेत्रात संयुक्त साहस किंवा तंत्रज्ञान हस्तांतरण किंवा व्यापारी चिन्ह करार आहे (२००५ मालिका दिनांक जानेवारी १२, २००५ च्या प्रेस नोटमधील अटींची पूर्तता केली आहे.)
किंवा
बी) ज्या विदेशी एककांना-(व्यक्तीव्यतिरिक्त) समभाग निर्गमित केले आहेत त्यांचा भारतात त्याच क्षेत्रात कोणताही संयुक्त साहस किंवा तंत्रज्ञान हस्तांतरण किंवा व्यापारी चिन्ह करार नाही.
सी) आम्ही एसएसआय युनीट आहोत नाही आणि पूर्ण भरणा झालेल्या भांडवलाच्या २४ च्या गुंतवणुकीवरील मर्यादेचे पालन केले आहे/आवश्यक मंजूऱ्या प्राप्त केल्या आहेत.
डी) समभाग राइट्स तत्त्वावर निर्गमित केले आहेत आणि समभाग अनिवासींना अशा किंमतीला निर्गमित केले आहेत जी निवासींना ज्या किंमतीला समभाग निर्गमित केले त्यापेक्षा कमी नाही.
किंवा
इ) निर्गमित केलेले समभाग बोनस समभाग आहेत.
किंवा
एफ) भारतातील न्यायालयाने उचित प्रकारे मंजूर केलेल्या दोन किंवा अधिक कंपन्यांच्या एकत्रीकरणाच्या किंवा विलीनीकरणाच्या भारतीय कंपनीच्या एकत्रीकरण रद्द कररून किंवा अन्य प्रकारे पुनर्उभारणीच्या योजनेखाली निर्गमित केलेल आहेत.
किंवा
जी) समभाग इएमओपी खाली निर्गमित केले आहेत आणि या निर्गमाबाबतच्या अटींची पूर्तता केली आहे.
३. एसआयए एफआयपीबी मंजूरी क्र. ---------- दिनांक ------------नुसार समभाग निर्गमित करण्यात आले आहेत.

**(सहीखालील लागू नसेल ते खोडा)**

(अर्जदाराची सही)-------------------------------------------(ठळक अक्षरात नाव):--------------------------------------------(स्वाक्षरीकर्त्याचा हुद्दा):--------- ------------------------स्थानः---------------------------तारीखः-------------

**गुंतवणूक स्वीकारणाऱ्या कंपनीच्या कंपनी सेक्रेटरीने दाखल करायचे प्रमाणपत्र**

*(अधिसूचना क्र. एफइएमए २० २०००-आरबी दिनांक मे ३, २००० ला परिशिष्ट १ च्या परिच्छेद ९(१) (बी) (१) नुसार)*

उपरोक्त तपशीलाच्या बाबतीत आम्ही प्रमाणित करतो कि,

१. कंपन्या अधिनियम, १९५६ च्या सर्व गरजा पूर्ण केलेल्या आहेत

२. सरकारी मंजूरीच्या अटी आणि शर्ती, काही असल्यास, पूर्ण केल्या आहेत.

३. या नियमनांखाली समभाग निर्गमित करण्यास कंपनी पात्र आहे.

४. अधिसूचना क्र. एफइएमए २० २०००-आरबी दिनांक मे ३, २००० ला परिशिष्ट १ च्या परिच्छेद ९(१) (बी) (१) नुसार किमतीच्या रकमेच्या प्राप्तीचा पुरावा देणारी भारतातील एडी प्रवर्ग -१ बँकांद्वारे द्वारे निर्गमित करण्यात आलेली सर्व मूळ प्रमाणपत्रे कंपनीकडे आहेत.

(कंपनी सेक्रेटरीचे नाव आणि सही)

(मोहर)

**एफ सी – जी पी आर**

**विभाग - ब**

(१) हा मागील वित्तीय वर्षामध्ये ( एप्रिल ते मार्च ) भारतीय कंपनीमध्ये, थेट/पोर्टफोलियो/ पुनर्गुंतवणूक आणि/इतर ह्या रीतींनी केलेल्या सर्व गुंतवणुकीबाबतचा वार्षिक अहवाल आहे व तो दर वर्षी ३० जून पर्यंत सादर करावयाचा आहे. म्हणजे, ३० जून २००७ पर्यंत सादर केलेला विभाग ब मधील अहवाल हा एप्रिल २००६ ते मार्च २००७ ह्या वित्तीय वर्षामध्ये केलेल्या गुंतवणुकीसंबंधी असेल

(२) संचालक, आंतरराष्ट्रीय जमाखर्च ताळेबंद संख्याशास्त्र विभाग, संख्याशास्त्रीय विश्लेषण व संगणक सेवा, भारतीय रिझर्व्ह बँक, सी ९, ८ वा मजला, बांद्रा – कुर्ला कॉंप्लेक्स८-, बांद्रा (पू), मुंबई -४०० ०५१ टेलीफोन २६५७१२६५, २६५७२५१३,
ह्यांना हा सादर करण्यात यावा.

---

पॅन क्रमांक | | | | | | | | | | | | | | |

तारीख | | | | | | | | | | | | | | |

| क्र. | तपशील | ब्लॉक अक्षरात |
|---|---|---|
| १. | नाव | |
| | पत्ता | |
| | राज्य | |
| | रजिस्ट्रार ऑफ कंपनीज द्वारा दिला गेलेला पंजीकरण क्रमांक | |

२. संपर्क व्यक्तीचे नाव
टेलिफोन ------- ई.मेल.----------
फॅक्स ------- वेबसाईट (असल्यास)

३. खाते बंद केल्याचा दिनाकः -

४. आधी दिलेल्या माहितीसंबंधाने काही बदल असल्यास ( कंपनीच्या नावात बदल/ जागेमधील/ व्यवसाय  कार्यक्रमामधील बदल )

प्रपत्र एफसी-जीपीआर(भाग-बी)

| ५. थेट विदेशी गुंतवणूक (एफडीआय) | | | | |
|---|---|---|---|---|
| | रक्कम लाख रुपयात | | | |
| | भारतातील विदेशी दायित्व | | भारताबाहेरील विदेशी मत्ता | |
| | **आधीच्या** वर्षी मार्च अखेरीला असल्याप्रमाणे थकित | **चालू** वर्षी मार्च अखेरीला असल्याप्रमाणे थकित | **आधीच्या** वर्षी मार्च अखेरीला असल्याप्रमाणे थकित | **चालू** वर्षी मार्च अखेरीला असल्याप्रमाणे थकित |
| **५.० समभाग भांडवल** | | | | |
| ५.१ अन्य भांडवल $ | | | | |
| ५.२ वर्षातील निर्गुंतवणूक | | | | |
| ५.३ वर्षात ठेवून घेतलेती वित्तलब्धी | | | | |
| **६.पोर्टफोलिओ आणि अन्य गुंतवणुकी (पीआयएस)**<br>(कृपया येथे वर एफडीआयखाली नमूद केलेल्या व्यतिरिक्त थकित गुंतवणूक दाखवा) | | | | |
| रक्कम लाख रुपयात | | | | |
| | भारतातील विदेशी दायित्वे | | भारताबाहेरील विदेशी मत्ता | |
| | **आधीच्या** वर्षी मार्च अखेरीला असल्याप्रमाणे थकित | **चालू** वर्षी मार्च अखेरीला असल्याप्रमाणे थकित | **आधीच्या** वर्षी मार्च अखेरीला असल्याप्रमाणे थकित | **चालू** वर्षी मार्च अखेरीला असल्याप्रमाणे थकित |
| ६.० समभाग प्रतिभूती | | | | |
| ६.१ ऋण प्रतिभूती | | | | |
| ६.१.१ रोखे आणि नोटा | | | | |
| ६.१.२ मनी मार्केट साधने | | | | |
| ६.२ वर्षात भारतातील निर्गुंतवणूक | | | | |
| **७. आर्थिक डेरिव्हेटिव्हज्** (नोशनल मूल्य) | | | | |
| **८. अन्य गुंतवणूक** | | | | |
| ८.१ व्यापारी क्रेडीट | | | | |
| ८.१.१ अल्प मुदत | | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८.१.२ दीर्घ मुदत | | | | |
| ८.२ कर्जे | **खालील टीप[@] पहा** | | | |
| ८.३ अन्य | | | | |
| ८.३.१ अल्प मुदत | | | | |
| ८.३.२ दीर्घ मुदत | | | | |

कृपया अहवालाच्या तारखेला जे **अनिवासी गुंतवणूकदार(थेट गुंतवणूकदार) तुमच्या कंपनीचे <u>१०% किंवा अधिक</u>** सामान्य समभाग धारण करीत होते त्यांची थकित गुंतवणूक येथे द्या.

.[##] कृपया येथे अहवालाच्या तारखेला देशाबाहेरील अशा प्रत्येक अनिवासी उद्योगातील तुमच्या गुंतवणुकीची माहिती द्या ज्यात **तुमची कंपनी** १० **<u>%</u>** अधिक सामान्य समभाग धारण करते.
**मार्च-अखेर बाजारातील एक्स्चेंज दराचा उपयोग करा.**

[$] अनिवासी थेट गुंतवणुकदार आणि गुंतवणुक केलेल्या /माहिती अहवाल देणाऱ्या कंपनी यामधील इतर भांडवली व्यवहार ह्यात पुढील गोष्टींचा समावेश होतो --
१. परदेशातील गुंतवणुकदारांकडून लघुमुदतीचे कर्ज
२. परदेशातील गुंतवणुकदारांकडून दीर्घमुदतीचे कर्ज
३. व्यापारी पत / कर्ज
४. पुरवठा करणाराची पत / कर्ज
५. वित्तविषयक भाडे कराराने देणे
६. नियंत्रक हप्ता
७. समभागांचे प्रचालन नसलेल्या व्यवहारांच्या बाबतीत बिनचढाओढीचे (नॉन कॉंपिटिशन) शुल्क
८. तांत्रिक हस्तांतरण, कारखाना व यंत्रसंच, नावलौकिक, उद्योग विकास आणि ह्यासारख्या बाबींसाठी / विरुध्द समभागांचे विना-रोख रक्कम मिळविणे.
९. त्या वर्षात स्थावर मालमत्तेमध्ये केलेली गुंतवणुक

[@]**टीपः** तुमच्या कंपनीने प्राप्त केलेल्या सर्व कर्जांचा तपशील आरबीआयचा विदेशी विनियम विभाग अधिकृत डिलरमार्फत इसीबी विवरणपत्रातून स्वतंत्रपणे गोळा करतो, तुमच्या कंपनीने प्राप्त केलेल्या कर्जाचा तपशील भरण्याची गरज नाही. तथापि, तुमच्या कंपनीने भारताबाहेरील डब्ल्यूएसओ जेव्हीजना दिलेली बाह्य ऋणे कळवावीत.

प्रपत्र एफसी-जीपीआर (भाग-बी)

| | | |
|---|---|---|
| ९. | वर्षात कामाला लावलेले कर्मचारी | |
| | प्रत्यक्ष | |
| | अप्रत्यक्ष | |
| | एकूण | |

अर्जदाराची सही :------------------------------------------------------------------------

ठळक अक्षरात नाव :---------------------------------------------------------------------

स्वाक्षरीकर्त्याचा हुद्दा :-------------------------------------

स्थानः तारीखः

**( कंपनीच्या अधिकृत स्वाक्षरीकर्त्याने सही करावी)**

**परिशिष्ट- ७**

**प्रपत्र एफसी-टीआरएस**

**विक्रीच्या मार्गाने निवासीकडून अनिवासीकडे अनिवासीकडून निवासीकडे समभागांच्या हस्तांतरणाबाबत घोषणापत्र**

(एडी शाखेला चार प्रतीत सादर करायचे)

**खालील कागदपत्रे जोडली आहेत (परिशिष्टाचा परिच्छेद ५ पहा)**

भारतातील निवासी व्यक्तीद्वारे विक्रीसाठी

(१) विक्रेता आणि खरेदीदार किंवा त्यांच्या उचित प्रकारे नियुक्त एजन्टद्वारा उचित प्रकारे सही केलेले मान्यता पत्र आणि नंतरच्या बाबतीत मुखत्यार पत्र कागदपत्र

(२) भारताबाहेरील व्यक्तीद्वारे समभागांच्या संपादनानंतर गुंतवणूक स्वीकारणाऱ्या कंपनीच्या समभागांचे प्रमाण

(३) चार्टर्ड अकाउंटंटकडील समभागांचे उचित मूल्य दर्शविणारे प्रमाणपत्र

(४) विक्री स्टॉक एक्स्चेंजवर केली असेल तर स्टॉक ब्रोकरच्या टीपेची प्रत

(५) खरेदीदाराकडील अशा प्रभावाचे वचनपत्र कि तो एफडीआय धोरण आणि विद्यमान क्षेत्रीय मर्यादेच्या अधीन समभाग परिवर्तनीय कर्जरोखे धारण करण्यास पात्र आहे आणि किमतीच्या बाबतीतील मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करण्यात आले आहे.

(६) एफआयआय उपखात्याकडील अशा प्रभावाचे वचनपत्र कि सेबीने विहीत केलेल्या प्रत्येक एफआयआय उपखात्याच्या मर्यादेचा भंग झालेला नाही.

भारताबाहेरील निवासी व्याक्तिद्वारा समभागांच्या विक्रीच्या बाबतीत अतिरिक्त कागदपत्रे

(७) विक्रेते एनआरआयज ओसीबीज असतील तर, त्यानी प्रत्यावर्तन अप्रत्यावर्तन तत्त्वावर धारण केलेल्या समभागांचा पुरावा देणाऱ्या आरबीआयच्या मंजूरीच्या प्रती.

(८) आयकर अधिकारी चार्टर्ड अकाउंटंटकडील ना-हरकत कर निपटारा प्रमाणपत्र.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. | **कंपनीचे नाव** | | | | |
| | पत्ता (इमेल, दूरध्वनि क्र. आणि फॅक्स क्र. सहित) | | | | |
| | कार्य | | | | |
| | एनआयसी संकेत | | | | |
| | | | | | |
| २. | **स्वयंचलित मार्गाखाली एफडीआय अनुज्ञेय आहे काय** | | | | |
| | एफडीआय धोरणाखाली क्षेत्रीय मर्यादा | | | | |
| | | | | | |
| ३. | **व्यवहाराचे स्वरुप** | | | | |
| | निवासीकडून अनिवासीकडे हस्तांतरण | | | | |
| | अनिवासीकडून निवासीकडे हस्तांतरण | | | | |
| | | | | | |
| ४. | **खरेदीदाराचे नाव** | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | **प्रवर्ग**<br>(कृपया योग्य प्रवर्गावर खूण करा) | व्यक्ती | कंपनी | एफआयआय | अन्य |
| | कंपनी एफआयआयच्या बाबतीत कंपनीची रचना म्हणजे मर्यादित कंपनी, नोंदणीकृत भागीदारी वगैरे | | | | |
| | अंगीकरणाची तारीख आणि स्थान | | | | |
| | खरेदीदाराचा पत्ता (इमेल, दूरध्वनि क्र., फॅक्स क्र. सह) | | | | |
| ६ | **आधीच्या रिझर्व्ह बॅंकेच्या/एफआयपीबीच्या मंजूरीचा तपशील** | | | | |
| ७ | **हस्तांतरित करायच्या समभागांच्या / परिवर्तनीय कर्जरोख्यांच्या बाबतीतील तपशील** | | | | |
| | व्यवहाराची तारीख | समभागांची संख्या | दर्शनी मूल्य | हस्तांतरणासाठी वाटाघाटीने ठरविलेली किंमत | विक्रीची रक्कम |
| ८ | **कंपनीतील विदेशी गुंतवणूक** | | | | |
| | | समभागांची संख्या | टक्केवारी | | |
| | हस्तांतरणापूर्वी | | | | |
| | हस्तांतरणानंतर | | | | |
| | | | | | |
| ९ | **समभाग स्टॉक एक्स्चेंजवर सूचीबद्ध आहेत काय** | | | | |
| | जर तसे असेल तर, स्टॉक एक्स्चेंजचे नाव | | | | |
| | स्टॉक एक्स्चेंजवर जाहीर केलेली किंमत | | | | |
| | **समभाग असूचीबद्ध आहेत काय** | | | | |
| | मूल्यांकनाच्या मार्गदर्शक तत्त्वांप्रमाणे किंमत | | | | |
| | चार्टर्ड अकाउंटंटच्या मूल्यांकन अहवालाप्रमाणे किंमत | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | सीएचे प्रमाणपत्र जोडायचे आहे | | | | |

**हस्तांतरक हस्तांतरितीने द्यायचे घोषणापत्र**
**मी आम्ही याद्वारे घोषित करतो किः**

(१) वर दिलेला तपशील माझ्या आमच्या उत्तम माहितीप्रमाणे आणि विश्वासाप्रमाणे सत्य आणि बरोबर आहे.
(२) मी आम्ही एफइआरए एफइएमए नियमनांखाली प्रत्यवर्तन अप्रत्यावर्तन तत्त्वावर एफडीआय धोरणानुसार समभाग धारण करीत होतो.
(३) मी आम्ही एफडीआय धोरणानुसार समभाग संपादन करण्यास पात्र आहोत. हे हस्तांतरण आर्थिक क्षेत्रात किंवा जेथे सर्वसाधारण परवानगी उपलब्ध नाही अशा क्षेत्रात व्यस्त असणाऱ्या कंपनीच्या समभागांशी संबधित नाही.
(४) एफडीआय धोरणाखालील क्षेत्रीय मर्यादा आणि किंमत ठरविण्याच्या बाबतीतील मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करण्यात आले आहे.

**घोषणा करणाऱ्याची किंवा**
**त्याच्या अधिकृत एजन्टची सही**
**तारीखः**

**टीप**
निवासीकडून अनिवासीकडे समभागांच्या हस्तांतरणाच्या बाबतीत घोषणापत्रावर अनिवासी खरेदीदाराने सही केली पाहिजे
आणि
अनिवासीकडून निवासीकडे समबागांच्या हस्तांतरणाच्या बाबतीत घोषणापत्रावर अनिवासी विक्रेत्याने सही केली पाहिजे.

**एडी शाखेद्वारा प्रमाणपत्र**
असे प्रमाणित करण्यात येत आहे कि अर्ज सर्व बाबतीत परिपूर्ण आहे
व्यवहाराची प्राप्ती प्रदान एफइएमए नियमनांप्रमाणे रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्त्वांप्रमाणे आहे.

सही

अधिकाऱ्याचे नाव आणि हुद्दा

एडी शाखेचे नाव

एडी शाखा संकेत

तारीखः

**परिशिष्ट ८**

**जीडीआर एडीआर च्या निर्गमाची व्यवस्था करणाऱ्या भारतीय कंपनीने दाखल करायचे विवरणपत्र**

**(अधिसूचना क्र. २० २०००-आरबी दिनांक मे ३, २००० ला परिशिष्ट १ च्या परिच्छेद ४(२) संदर्भ घ्यावा)**

**सूचनाः प्रपत्र पूर्ण भरावे आणि भारतीय रिझर्व्ह बँक, विदेशी गुंतवणूक खंड, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई येथे सादर करावे.**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | कंपनीचे नाव | | |
| २. | नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता | | |
| ३. | पत्रव्यवहारासाठी पत्ता | | |
| ४. | विद्यमान व्यवसाय(कृपया ज्या कार्यात कंपनी मुख्यत्वे व्यस्त आहे तिचा एनआयसी संकेत द्यावा) | | |
| ५. | ज्या हेतूने जीडीआरस् एडीआरस् उभारण्यात आली आहे त्याचा तपशील. जर निधी समुद्रपार गुंतवणुकीसाठी तैनात केला असेल तर त्याचा तपशील | | |
| ६. | विदेशातील डिपॉझिटरीचे नाव आणि पत्ता | | |
| ७. | लीड मॅनेजर गुंतवणूक मर्चट बँकरचे नाव आणि पत्ता | | |
| ८. | निर्गमाच्या उपव्यवस्थापकाचे नाव आणि पत्ता | | |
| ९. | भारतीय परिरक्षकाचे नाव आमि पत्ता | | |
| १०. | एफआयपीबी मंजूरीचा तपशील (जर जीडीआरस् स्वयंचलित मार्गाखाली निर्गमित करण्यात येत असतील तर कृपया संबंधित एनआयसी संकेत नमूद करा) | | |
| ११. | विदेशी गुंतवणुकीसाठी एकूण मर्यादा लागू आहे काय, असल्यास, तपशील द्या. | | |
| १२. | समभाग भांडवलाचा तपशील | <u>निर्गमापूर्वी</u> | <u>निर्गमानंतर</u> |
| | (ए) अधिकृत भांडवल | | |
| | (बी) निर्गमित आणि पूर्ण भरणा झालेले भांडवल | | |
| | (१) भारतातील निवासी व्यक्तीने धारण केलेले | | |
| | (२) एफआयआयज एनआरआयज पीआयओज ओसीबीज | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | व्यतिरिक्त अन्य विदेशी गुंतवणूकदारांनी धारण केलेले(पूर्ण भरमा झालेल्या भांडवलाच्या १० टक्क्याहून अधिक धारण करणाऱ्या विदेशी गुंतवणूकदारांची आणि त्यापैकी प्रत्येकाने धारण केलेल्या समभागांच्या संख्येची सूची पुरवावी) | | |
| | | (३) | एनआरआयज पीआयओज ओसीबीजनी धारण केलेल्या | | |
| | | (४) | एफआयआयजनी धारण केलेल्या | | |
| | | अनिवासीनी धारण केलेले एकूण समभाग | | | |
| | (सी) | अनिवासीनी धारण केलेल्या समभागांची एकूण पूर्ण भरणा झालेल्या भांडवलाशी टक्केवारी | | | |
| १३. | निर्गम खाजगी प्लेसमेंट तत्त्वावर होता काय, असल्यास, गुंतवणूकदारांचा आणि त्यांच्यापैकी प्रत्येकाला निर्गमित केलेल्या एडीआरस् जीडीआरसचा तपशील द्या. | | | | |
| १४. | निर्गमित केलेल्या जीडीआरस् एडीआरस् ची संख्या | | | | |
| १५. | जीडीआरस् एडीआरस् चे त्याखालील समभागांशी प्रमाण | | | | |
| १६. | निर्गमाशी संबधित खर्च | | | | |
| | (ए) | मर्चंट बँकर्स लीड मॅनेजर्सना देय असलेले शुल्क | | | |
| | | (१) | रक्कम (यूएस डॉलर वगैरे मध्ये) | | |
| | | (२) | एकूण निर्गमाशी रकमेची टक्केवारी | | |
| | (बी) | अन्य खर्च | | | |
| १७. | निधी विदेशात ठेवला आहे काय, असल्यास बँकेचे नाव आणि पत्ता | | | | |
| १८. | सूचीबद्धतेच्या व्यवस्थेचा तपशील | | | | |
| | स्टॉक एक्स्चेंजचे नाव | | | | |
| | व्यापार सुरू झाल्याची तारीख | | | | |
| १९. | एडीआरस जीडीआरस् निर्गम सुरू केल्याची तारीख | | | | |
| २०. | उभारलेली रक्कम (यूएस डॉलर मध्ये) | | | | |

<table>
<tr><td>२१.</td><td>प्रत्यावर्तित केलेली रक्कम (यूएस डॉलर मध्ये)</td><td></td></tr>
<tr><td colspan="3"></td></tr>
<tr><td colspan="3">प्रमाणित करण्यात येते कि भारत सरकारने आणि भारतीय रिझर्व्ह बँकेने ठरवून दिलेल्या सर्व अटींची पूर्तता करण्यात आली आहे.</td></tr>
<tr><td colspan="2"></td><td></td></tr>
<tr><td colspan="2">चार्टर्ड अकाउंटंट</td><td>कंपनीचा अधिकृत स्वाक्षरीकर्ता</td></tr>
</table>

**परिशिष्ट ९**

| | | |
|---|---|---|
| **त्रैमासिक विवरणपत्र** | | |
| (अधिसूचना क्र. एफइएमए २० २०००-आरबी दिनांक मे ३, २००० ला परिशिष्ट १ च्या परिच्छेद ४(३) चा संदर्भ घ्यावा) | | |
| भारतीय रिझर्व्ह बँक, विदेशी गुंतवणूक विभाग, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई याना सादर करायचे) | | |
| | | |
| १. | कंपनीचे नाव | |
| २. | पत्ता | |
| ३. | जीडीआर एडीआर निर्गम चालू केल्याची तारीख | |
| ४. | निर्गमित केलेल्या जीडीआर एडीआरची एकूण संख्या | |
| ५. | उभारलेली एकूण रक्कम | |
| ६. | तिमाहीच्या समाप्तीपर्यंत अर्जित केलेले एकूण व्याज | |
| ७. | निर्गमाचा खर्च आणि कमिशन वगैरे | |
| ८. | प्रत्यावर्तित रक्कम | |
| ९. | विदेशात ठेवलेली शिल्लक – तपशील | |
| | (१) बँकेतील ठेवी | |
| | (२) ट्रेझरी बिल्स | |
| | (३) अन्य (कृपया विनिर्दिष्टीत करा) | |
| १०. | अजून थकित असलेल्या जीडीआरची संख्या | |
| ११. | तिमाहीच्या अखेरीला कंपनीच्या समभागाची किंमत | |
| १२. | तिमाहीच्या अखेरीला असल्याप्रमाणे समुद्रपार स्टॉक एक्स्चेंजेसवर जीडीआरला दिलेली किंमत | |
| | | |
| प्रमाणित करण्यात येते कि एडीआरस जीडीआरस मार्फत उभारलेला निधी स्टॉक मार्केट किंवा रियल इस्टेटमध्ये गुंतविलेला नाही. | | |
| | | |
| चार्टर्ड अकाउंटंट | कंपनीचा अधिकृत स्वाक्षरीकर्ता | |

**परिशिष्ट**

**विदेशी गुंतवणूक/भारतात स्थावर मालमत्तेचे संपादन/भारतात शाखा, संपर्क आणि प्रकल्प कार्यालयांची स्थापना आणि मालकीच्या/भागीदारी फर्मसमध्ये गुंतवणूक यावरील महापरिपत्रकात एकत्रित केलेल्या परिपत्रकांची/अधिसूचनांची सूची**

| अनु.क्र. | अधिसूचना | तारीख |
|---|---|---|
| १. | क्र. एफइएमए ३२/२०००-आरबी | डिसेंबर २६, २००० |
| २. | क्र. एफइएमए ३५/२००१-आरबी | फेब्रुवारी १६, २००१ |
| ३. | क्र. एफइएमए ४१/२००१-आरबी | मार्च २, २००१ |
| ४. | क्र. एफइएमए ४५/२००१-आरबी | सप्टेंबर २०, २००१ |
| ५. | क्र. एफइएमए ४६/२००१-आरबी | नोव्हेंबर २९, २००१ |
| ६. | क्र. एफइएमए ५०/२००२-आरबी | फेब्रुवारी २०, २००२ |
| ७. | क्र. एफइएमए ५५/२००२-आरबी | मार्च ७, २००२ |
| ८. | क्र. एफइएमए ६२/२००२-आरबी | मे १३, २००२ |
| ९. | क्र. एफइएमए ६४/२००२-आरबी | जून २९, २००२ |
| १०. | क्र. एफइएमए ६५/२००२-आरबी | जून २९, २००२ |
| ११. | क्र. एफइएमए ७६/२००२-आरबी | नोव्हेंबर १२, २००२ |
| १२. | क्र. एफइएमए ८५/२००३-आरबी | जानेवारी १७, २००३ |
| १३. | क्र. एफइएमए ९३/२००३-आरबी | जून ९, २००३ |
| १४. | क्र. एफइएमए ९४/२००३-आरबी | जून १८, २००३ |
| १५. | क्र. एफइएमए १००/२००३-आरबी | ऑक्टोबर ३, २००३ |
| १६. | क्र. एफइएमए १०१/२००३-आरबी | ऑक्टोबर ३, २००३ |
| १७. | क्र. एफइएमए १०६/२००३-आरबी | ऑक्टोबर २७, २००३ |
| १८. | क्र. एफइएमए १०८/२००३-आरबी | जानेवारी १, २००४ |
| १९. | क्र. एफइएमए १११/२००४-आरबी | मार्च ६, २००४ |
| २०. | क्र. एफइएमए ११८/२००४-आरबी | जून २९, २००४ |
| २१. | क्र. एफइएमए १२२/२००४-आरबी | ऑगस्ट ३०, २००४ |
| २२. | क्र. एफइएमए १२५/२००४-आरबी | नोव्हेंबर २७, २००४ |
| २३. | क्र. एफइएमए १३०/२००५-आरबी | मार्च १७, २००५ |
| २४. | क्र. एफइएमए १३१/२००५-आरबी | मार्च १७, २००५ |
| २५. | क्र. एफइएमए १३८/२००५-आरबी | जुलै २२, २००५ |
| २६. | क्र. एफइएमए १३६/२००५-आरबी | जुलै १९, २००५ |
| २७. | क्र. एफइएमए १३७/२००५-आरबी | जुलै २२, २००५ |
| २८. | क्र. एफइएमए १३८/२००५-आरबी | जुलै २२, २००५ |
| २९. | क्र. एफइएमए १४९/२००६५-आरबी | जून ९, २००६ |

**परिपत्रके**

| अनु.क्र. | परिपत्रके | तारीख |
|---|---|---|
| १. | ए.पी.डीआयआर (मालिका) परिपत्रक क्र.१४ | सप्टेंबर २६. २००० |
| २. | ए.पी.डीआयआर (मालिका) परिपत्रक क्र.२४ | जानेवारी ६, २००१ |
| ३. | ए.पी.डीआयआर (मालिका) परिपत्रक क्र.२६ | फेब्रुवारी २२, २००१ |
| ४. | ए.पी.डीआयआर (मालिका) परिपत्रक क्र.३२ | एप्रिल २८, २००१ |
| ५. | ए.पी.डीआयआर (मालिका) परिपत्रक क्र.१३ | नोव्हेंबर २९, २००१ |
| ६. | ए.पी.डीआयआर (मालिका) परिपत्रक क्र.२१ | फेब्रुवारी १३, २००२ |
| ७. | ए.पी.डीआयआर (मालिका) परिपत्रक क्र.२९ | मार्च ११, २००२ |
| ८. | ए.पी.डीआयआर (मालिका) परिपत्रक क्र.१ | जुलै २, २००२ |
| ९. | ए.पी.डीआयआर (मालिका) परिपत्रक क्र.५ | जुलै १५, २००२ |
| १०. | ए.पी.डीआयआर (मालिका) परिपत्रक क्र.१९ | सप्टेंबर १२, २००२ |
| ११. | ए.पी.डीआयआर (मालिका) परिपत्रक क्र.३५ | नोव्हेंबर १, २००२ |
| १२. | ए.पी.डीआयआर (मालिका) परिपत्रक क्र.४५ | नोव्हेंबर १२, २००२ |
| १३. | ए.पी.डीआयआर (मालिका) परिपत्रक क्र.४६ | नोव्हेंबर १२, २००२ |
| १४. | ए.पी.डीआयआर (मालिका) परिपत्रक क्र.५२ | नोव्हेंबर २३, २००२ |
| १५. | ए.पी.डीआयआर (मालिका) परिपत्रक क्र.५६ | नोव्हेंबर २६, २००२ |
| १६. | ए.पी.डीआयआर (मालिका) परिपत्रक क्र.६७ | जानेवारी १३, २००३ |
| १७. | ए.पी.डीआयआर (मालिका) परिपत्रक क्र.६८ | जानेवारी १३, २००३ |
| १८. | ए.पी.डीआयआर (मालिका) परिपत्रक क्र.६९ | जानेवारी १३, २००३ |
| १९. | ए.पी.डीआयआर (मालिका) परिपत्रक क्र.७५ | फेब्रुवारी ३, २००३ |
| २०. | ए.पी.डीआयआर (मालिका) परिपत्रक क्र.८८ | मार्च २७, २००३ |
| २१. | ए.पी.डीआयआर (मालिका) परिपत्रक क्र.१०१ | मे ५, २००३ |
| २२. | ए.पी.डीआयआर (मालिका) परिपत्रक क्र.१० | ऑगस्ट २०, २००३ |
| २३. | ए.पी.डीआयआर (मालिका) परिपत्रक क्र.१३ | सप्टेंबर १, २००३ |
| २४. | ए.पी.डीआयआर (मालिका) परिपत्रक क्र.१४ | सप्टेंबर १६, २००३ |
| २५. | ए.पी.डीआयआर (मालिका) परिपत्रक क्र.१९ | सप्टेंबर २३, २००३ |
| २६. | ए.पी.डीआयआर (मालिका) परिपत्रक क्र.२८ | ऑक्टोबर १७, २००३ |
| २७. | ए.पी.डीआयआर (मालिका) परिपत्रक क्र.३५ | नोव्हेंबर १४, २००३ |
| २८ | ए.पी.डीआयआर (मालिका) परिपत्रक क्र.३८ | डिसेंबर ३, २००३ |
| २९. | ए.पी.डीआयआर (मालिका) परिपत्रक क्र.३९ | डिसेंबर ३, २००३ |
| ३०. | ए.पी.डीआयआर (मालिका) परिपत्रक क्र.४३ | डिसेंबर ८. २००३ |
| ३१. | ए.पी.डीआयआर (मालिका) परिपत्रक क्र.४४ | डिसेंबर ८, २००३ |
| ३२. | ए.पी.डीआयआर (मालिका) परिपत्रक क्र.५३ | डिसेंबर १७, २००३ |
| ३३. | ए.पी.डीआयआर (मालिका) परिपत्रक क्र.५४ | डिसेंबर २०, २००३ |
| ३४. | ए.पी.डीआयआर (मालिका) परिपत्रक क्र.६३ | फेब्रुवारी ३, २००४ |
| ३५. | ए.पी.डीआयआर (मालिका) परिपत्रक क्र.६७ | फेब्रुवारी ६, २००४ |
| ३६. | ए.पी.डीआयआर (मालिका) परिपत्रक क्र.८९ | एप्रिल २४, २००४ |
| ३७. | ए.पी.डीआयआर (मालिका) परिपत्रक क्र.११ | सप्टेंबर १३, २००४ |
| ३८. | ए.पी.डीआयआर (मालिका) परिपत्रक क्र.१३ | ऑक्टोबर १, २००४ |

| | | |
|---|---|---|
| ३९. | ए.पी.डीआयआर (मालिका) परिपत्रक क्र.१५ | ऑक्टोबर १, २००४ |
| ४०. | ए.पी.डीआयआर (मालिका) परिपत्रक क्र.१६ | ऑक्टोबर ४, २००४ |
| ४१. | ए.पी.डीआयआर (मालिका) परिपत्रक क्र.३९ | एप्रिल २५, २००५ |
| ४२. | ए.पी.डीआयआर (मालिका) परिपत्रक क्र.४४ | मे १७, २००५ |
| ४३. | ए.पी.डीआयआर (मालिका) परिपत्रक क्र.०४ | जुलै २९, २००५ |
| ४४. | ए.पी.डीआयआर (मालिका) परिपत्रक क्र.०६ | ऑगस्ट ११, २००५ |
| ४५. | ए.पी.डीआयआर (मालिका) परिपत्रक क्र.०७ | ऑगस्ट १७, २००५ |
| ४६. | ए.पी.डीआयआर (मालिका) परिपत्रक क्र.०८ | ऑगस्ट २५, २००५ |
| ४७. | ए.पी.डीआयआर (मालिका) परिपत्रक क्र.१० | ऑगस्ट ३०, २००५ |
| ४८. | ए.पी.डीआयआर (मालिका) परिपत्रक क्र.११ | सप्टेंबर ०५, २००५ |
| ४९. | ए.पी.डीआयआर (मालिका) परिपत्रक क्र.१६ | नोव्हेंबर ११, २००५ |
| ५०. | ए.पी.डीआयआर (मालिका) परिपत्रक क्र. २४ | जानेवारी २५, २००६ |
| ५१. | ए.पी.डीआयआर (मालिका) परिपत्रक क्र. ४ | जुलै २८, २००६ |
| ५२. | ए.पी.डीआयआर (मालिका) परिपत्रक क्र. २४ | ऑगस्ट १६, २००६ |
| ५३. | ए.पी.डीआयआर (मालिका) परिपत्रक क्र. २४ | नोव्हेंबर १६, २००६ |
| ५४. | ए.पी.डीआयआर (मालिका) परिपत्रक क्र. २४ | डिसेंबर २२, २००६ |
| ५५. | ए.पी.डीआयआर (मालिका) परिपत्रक क्र. २४ | फेब्रुवारी ८, २००७ |
| ५६ | ए.पी.डीआयआर (मालिका) परिपत्रक क्र. २४ | एप्रिल २०, २००७ |
| ५७. | ए.पी.डीआयआर (मालिका) परिपत्रक क्र. २४ | मे २४, २००७ |
| ५८. | ए.पी.डीआयआर (मालिका) परिपत्रक क्र. २४ | मे ३१, २००७ |
| ५९ | ए.पी.डीआयआर (मालिका) परिपत्रक क्र. २४ | जून ८, २००७ |
| ६० | ए.पी.डीआयआर (मालिका) परिपत्रक क्र. २४ | जून ८, २००७ |